# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०१/२०१९** **दिनांक ०८.०१.२०१९**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दि.०८.०१.२०१९ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी १२.३० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/४८१४/२०१८, दि.३१.१२.२०१८ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार मंगळवार दि.०८.०१.२०१९ दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०३. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य ०४. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती उपाध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम तसेच समिती सदस्य मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह व मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

मा.श्री.रविंद्र मिर्लेकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०८.०१.२०१९ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस माझ्यासकट शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०१.०० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक १३.१२.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.०१** **दिनांक १३.१२.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१. निर्णय क्र.७९०- श्री साईबाबा संस्थानच्या कायम कर्मचाऱ्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ज्या सुविधा/ उपचार उपलब्ध होत नाहीत त्यासाठी बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार / शस्त्रक्रियेसाठी पाठवितांना अपेक्षित खर्चापोटी रक्कम रु. एक लाख पावेतो अग्रीम रक्कम देण्यास मान्यता देण्यात आली. सदर रक्कम देतांना कर्मचाऱ्यावरील करावयाच्या उपचार/ शस्त्रक्रियेसाठी अपेक्षीत खर्चाचा अंदाज वैद्यकीय संचालक व संबधीत विभागाच्या तज्ञ डॉक्टरांनी प्रमाणीत करुन द्यावा. व त्यानुसार रक्कम रु. एक लाख पावेतो अग्रीम रक्कम द्यावी. यासाठी आवश्यक नियमावली करुन व्यवस्थापन समिती समोर मान्यतेसाठी सादर करावी.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**श्री साईबाबा संस्थानच्या कायम कर्मचाऱ्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ज्या सुविधा/ उपचार उपलब्ध होत नाहीत, त्यासाठी रुग्णालयातील डॉक्टरांचे सल्ल्याने बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार / शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात येतात. याकामी उपचार/ शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम संबधीत कर्मचाऱ्यास संस्थानमार्फत आदा करण्यात येते. सध्या विविध विमा कंपन्यामार्फत मेडीक्लेम पॉलीस व्दारे उपचार/शस्त्रक्रियेसाठी कॅशलेस सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. त्याच प्रमाणे संस्थानचे कायम कर्मचाऱ्यांसाठी रु.३ लाख पावेतोची कॅशलेस मेडीक्लेम विमा पॉलीसी घेतल्यास कर्मचाऱ्यांना सुविधा उपलब्ध होईल. तसेच त्यांना आगाऊ खर्च करावा लागणार नाही. त्याशिवाय संस्थानला कर्मचाऱ्यांवरील उपचारांसाठीचा खर्च करावा लागणार नाही. सदर वस्तुस्थिती विचारात घेता संस्थानमधील कायम कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु.३ लाख पावेतोचा कॅशलेस मेडिक्लेम विमा काढण्यास मान्यता देण्यात आली.**

**सदर मेडीक्लेम पॉलीसीकरीता ई-निविदा प्रक्रिया मार्च-२०१९ अखेर पुर्ण करण्यात यावी. तोपर्यंत पुर्वीप्रमाणेच कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.०२** **सन २०१९-२० करीता संस्थानचे विविध विभागांसाठी किराणा माल व कॅन्टीन विभागाकरीता दुध खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येण्याऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधिल तरतूदः- महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील कलम २१(१)(घ) साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

व्यवस्थापन समितीचा ठरावः- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८८

प्रस्ताविकः-संस्थानचे श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी सन २०१९-२० करीता आवश्यक किराणा माल व कॅन्टीन विभागासाठी दूध खरेदीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेन्वये भांडार विभागास प्राप्त झालेला आहे. उपरोक्त सर्व प्राप्त प्रस्ताव भांडार विभागामार्फत एकत्रित करुन सन २०१९-२० करिता किराणा माल व दुध खरेदीचा एकत्रित प्रस्ताव तयार केलेला आहे. श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती व मंदिर या विभागांनी गाईचे शुद्ध तुपाचे खरेदी करीता प्रशासकीय मान्यतेन्वये प्रस्ताव दिलेले आहेत. तथापि, गाईचे शुद्ध तुपाची खरेदी प्रक्रिया स्वतंत्रपणे सुरु असल्याने त्याचा या प्रस्तावात समावेश केलेला नाही. तसेच मंदिर विभागाने किराणा मालाचे खरेदी प्रस्तावात गॅस सिलेंडरचा समावेश केलेला आहे, मात्र सदर प्रस्ताव फक्त किराणा मालाचे खरेदीकरीता असल्याने यात गॅस सिलेंडरचा समावेश करता येणार नाही.

यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८८ नुसार सन २०१८-१९ चे किराणा माल व दुध खरेदी करिता एकूण रु. ५०,०२,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास कोटी दोन लाख मात्र) पर्यंतचे खर्चास व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली होती. किराणा माल व दुधासाठी माहे एप्रिल २०१८ ते ऑक्टोबर २०१८ अखेर रु.१८,७६,७०,०००/- (अक्षरी रुपये अठरा कोटी शहात्तर लाख सत्तर हजार मात्र) इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे, तसेच माहे नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९ या कालावधीसाठी अंदाजे रु.१४,६६,५९,०००/- (अक्षरी रुपये चौदा कोटी सहासष्ठलाख एकोनसाठ हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित असल्याचे संबंधीत विभागांनी प्रस्तावात नमुद केलेले आहे. याबाबतची सविस्तर माहिती "परिशिष्ठ अ" म्हणून यासोबत सादर केलेली आहे.

श्री साई प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर या विभागांनी कळविलेल्या मागणी/ प्रस्तावानुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता किराणा माल व दुधाचे खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ३६,९२,३५,०००/- (अक्षरी रुपये छत्तीस कोटी ब्यान्नव लाख पस्तीस हजार मात्र) पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. संबंधीत विभागांनी दिलेल्या माहिती/ प्रस्तावाच्या आधारे खरेदी करावयाची संख्या व दर निश्चित करणेत आलेले आहेत, ते सोबतच्या परिशिष्ठासह सादर केले आहेत.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः- तरी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती, कॅन्टीन व मंदिर या विभागांसाठी आवश्यक किराणा माल व कॅन्टीन विभागाकरीता दूध इ. खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३६,९२,३५,०००/- (अक्षरी रुपये छत्तीस कोटी ब्यान्नव लाख पस्तीस हजार मात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय/ प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती, कॅन्टीन व मंदिर या विभागांसाठी आवश्यक किराणा माल व कॅन्टीन विभागाकरीता दूध इत्यादी खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३६,९२,३५,०००/- (अक्षरी रुपये छत्तीस कोटी ब्यान्नव लाख पस्तीस हजार मात्र) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-भांडार विभाग/खरेदी विभाग)**

---

**विषय नं.०३** **संस्थानचे निधीतून उभारणी करावयाच्या नियोजित घनकचरा प्रक्रिया प्रकल्पातील शिर्डी नगरपंचायत यांचे वापरासाठी करावयाच्या १x१० टीपीडी क्षमतेचा Biomethanation Plant वगळता उर्वरित कामांसाठी पहिल्या टप्प्यात ई-निविदा मागविणे व सदर प्रकल्पाचे यशस्वीतेनंतर दुसऱ्या टप्प्यात शिर्डी नगरपंचायत यांच्या वापरासाठी १x१० टीपीडी क्षमतेचा Biomethanation Plant साठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम -२००४ मधिल संबंधित तरतुदी–**

१. कलम १७ (२) खंड (झ) नुसार विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्यप्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी समिती करील.

२. कलम २१(२) (दोन) नुसार स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीसाठी वाढ होण्यासाठी सहाय्य करणेची तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय -

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५९.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५९.

प्रस्तावना- शिर्डी येथे श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे गर्दीत दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या गर्दीचे अनुषंगाने राहाता व शिर्डी परिसरातील निघणाऱ्या व जमा होणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी संयुक्त घनकचरा प्रकल्प राबविण्यात आला होता. सदरहू कामास महाराष्ट्र शासनाचे जा.क्रं सांसवि/२०११/५३८/प्र.क्र.६९/पुन.१२/का.१६ दि.२३/०२/२०१५ रोजीचे निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या प्लांटमध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करणेचे काम सध्या स्थानिक ग्रामस्थांच्या विरोधामुळे बंद आहे. त्यामुळे संस्थानचा निघणारा कचरा हा संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे हद्दीत गट नं. १८२ मध्ये खड्डे घेऊन टाकण्यात येत आहे.

त्यामुळे संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे वापरासाठी घनकचरा प्रकल्प उभारणीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.४५९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करणेत आला आहे.

“श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचा प्रत्येकी १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. याकामी संस्थानचे गट नं.१८२ मधील जागेमध्ये प्रथमत: संस्थानसाठी Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचा १०TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावे व हा प्रकल्प यशस्वी झाल्यास शिर्डी नगपंचायतीचे मालकीच्या जागेमध्ये, त्यांचेसाठी संस्थानमार्फत १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावे. सदर प्रकल्पाकरीता लॅण्डफीलची आवश्यकता नसल्याने लॅण्डफीलची व्यवस्था करण्यात येऊ नये. लॅण्डफील व्यतिरिक्त इतर सिव्हील कामे व युनिटस् उभारणीसाठी येणारा भांडवली खर्च तसेच दैनंदिन देखभालीसाठी प्रथम वर्षाकरीता अपेक्षित असलेला आवर्ती खर्च मिळून येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत आली.

सदर प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्याचा समावेश ई- निविदेत करण्यात यावा व शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी सदरहू प्रकल्प उभारणी करतेवेळी त्यांचेबरोबरील करारनाम्यामध्ये, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सदर प्रकल्पास अनुदान प्राप्त करुन घेणेची कार्यवाही करावी व अनुदान प्राप्त झालेनंतर सदरहू अनुदान संस्थानकडे वर्ग करावे, या बाबीचा समावेश करणेत यावा. तसेच दि.२८.११.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५६ अन्वये सुक्या कचऱ्यातील प्लास्टीक श्रेडींग करणेकरीता शेड उभारणीकामी व दि.२०.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९९२ अन्वये मौजे शिंगवे येथिल नियोजित घनकचरा प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायत यांना निधी उपलब्ध करुन देणेचे प्रस्ताव रद्द करण्यात येत असून, याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना अवगत करणेत यावे, असे ठरले.”

त्यानंतर साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र.४५९ संमत करणेत आलेला आहे.

‘श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून १० TPD क्षमतेचे घनकचरा प्रक्रिया युनिट उभारणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रातील जाहीरातीव्दारे विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत आल्या होत्या, प्राप्त झालेल्या ई-निविदापैकी पात्र ठेकेदार Organic Recycling system Pvt. Ltd., New Mumbai यांनी सादर केलेल्या निविदेतील दरांनुसार १० TPD क्षमतेचे ०२ Biomethanation Plant, ०५ TPD क्षमतेचे Bailing machine तसेच निमगांव को-हाळे येथील गट नं.१८२ मधील बायोगॅस प्लॅन्ट ते प्रसादालय किचन पर्यंत जी.आय.पाईप लाईन टाकणे व प्रकल्पाचे एक वर्षाचे देखभाल दुरुस्ती करीता रु.४,४१,२१,०००/- तसेच पुढील ०४ वर्षाचे देखभाल दुरुस्तीसाठी रक्कम रु.२,७६,००,०००/- मात्र असे एकत्रीत रक्कम रु.७,१७,२१,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०५१/०८ अन्वये कार्यादेश देणेबाबत निर्णय झालेला आहे.

श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून उपरोक्त घनकचरा प्रकल्प उभारणेकरीता विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासनयांचे प्रशासकीय मान्यता घेणेसाठी जा.क्र.५१३१/२०१८ दि.२६/१२/२०१७ अन्वये प्रस्ताव शासनाला सादर करणेत आला होता. मात्र प्रशासकीय मान्यता देणेपुर्वी सदर प्रकल्पाचे अंदाजपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक मान्यता घेणेचे निर्देश शासनाने दिले आहे. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी झालेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन प्रथम अंदाजपत्रक तयार करावे.अंदाजपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक मान्यता घेऊन शासनास मान्यतेसाठी सादर करावे. शासनाची मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी असे ठरले.”

उपरोक्त निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी १० TPD क्षमतेचे ०२ Biomethanation Plant, ०५ TPD क्षमतेचे Bailing Machine तसेच निमगांव को-हाळे येथील

गट नं.१८२ मधील बायोगॅस प्लॅन्ट ते प्रसादालय किचन पर्यंत जी.आय.पाईप लाईन टाकणे व प्रकल्पाचे एक वर्षाचे देखभाल दुरुस्ती आणि प्रीस्ट्रेस प्रीकास्ट कॉक्रींट कुंपन, गेट, ५.५ मीटर रुंदीचा डांबीरीकरणासह रस्ता विकसित करणे व सी.डी. वर्क करणेकरीता एकुण रक्कम रु.५,१७,७९,००३/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांचे तांत्रिक मान्यतेसाठी जा.क्र.३१९९/२०१८ दि.०१/१०/२०१८ रोजी सादर करणेत आले.

मा.मुख्यअभियंता,मजिप्रा, नाशिक यांनी जा.क्र./मुअ/नाशिक/चिशां/१६७३/२०१८ दि.१७/१०/२०१८ रोजीच्या पत्राने रु.४,३५,३५,९४६/- निव्वळ किंमतीच्या Biomethanation प्रक्रिया प्रकल्पाच्या खालील अंदाजपत्रकाला तांत्रिक मंजुरी प्रदान केली आहे.

| Sr. No. | PARTICULARS | Amount |
|---|---|---|
| A | Design, Supply, Erection, Testing & Commissioning of 2 X10 TPD capacityBiomethanation Plant (Fabricated in steel structure Or in combination of civil work and steel structure) The rates are inclusive of GST. | |
| | Biomethanation Plant 2 X10 TPD capacity | 3,52,00,000.00 |
| | Bailing Machine1 x 5 TPD capacity | 16,00,000.00 |
| | G.I. Pipe Line (Gas Plant to Sai Prasadalaya) | 12,75,000.00 |
| B | Construction of Approach Road for Solid Waste Management Plant from Nandurkhi-NimgaonKorhale (VR 110) K.M. 0/000 to 0/225 | 26,32,167.00 |
| C | Construction of Precast Compound at Gat no.182 for Solid Waste Management Plant. | 22,43,678.00 |
| | Total A+B+C : | 4,29,50,845.00 |
| | GST12% for (B+C) : | 5,85,101.00 |
| | **Total Estimated Cost Rs.:** | **4,35,35,946.00** |

उपरोक्त अंदाजपत्रकात शिर्डी नगरपंचायत करीता 10 TPD क्षमतेचा Biomethanation Plant करणेची तरतुद आहे. त्यासाठी रक्कम रु.१,७६,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरहू तांत्रिक मंजूरी प्राप्त अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मंबई यांचेकडे संस्थानचे जा. क्र.३७४३, दि.२४/१०/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

विभागाचा अभिप्राय- मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५९ अन्वये याकामी संस्थानचे गट नं.१८२ मधील जागेमध्ये प्रथमत: संस्थानसाठी १० TPD क्षमतेचा ०१ Biomethanation Plant उभारणेत यावा व हा प्रकल्प यशस्वी झाल्यास शिर्डी नगरपंचायतीचे मालकीच्या जागेमध्ये त्यांचेसाठी संस्थानमार्फत १० TPD क्षमतेचा ०१ Biomethanation Plant उभारणेत यावा, असे ठरले आहे. सदर प्रकल्पाचे वर नमूद अंदाजपत्रकामध्ये अंदाजे रु.१६ लक्ष किंमतीचे ०१ नग बेलींग मशिनचा समावेश आहे. तथापी, शिर्डी नगरपंचायत यांचे वापरासाठी त्यांचे जागेत करावयाचे Biomethanation plant साठी स्वतंत्र बेलींग मशिनची आवश्यकता लागेल. त्यानुसार शिर्डी नगरपंचायत यांचे वापराकरीता त्यांचे मालकीचे जागेत करावयाचे १० TPD क्षमतेचे Biomethanation Plant करीता खालील प्रमाणे खर्च येईल.

| | | |
|---|---|---|
| 01 | Biomethanation plant 1 x 10 TPD Capacity | Rs.1.76 Cr. |
| 02 | Bailing machine 1 x 05 TPD Capacity | Rs.0.16 Cr. |
| | Total | Rs.1.92 Cr. |

तथापी, वर नमूद रु.४,३५,३५,९४६/- खर्चाच्या अदांजपत्रकात फक्त एकच Bailing machine चा समावेश आहे. त्यामुळे शिर्डी नगरपंचायत यांचे वापरासाठी अजून एक Bailing machine खरेदी करावयाचे झाल्यास त्यासाठी सदर अंदाजपत्रकात रु.१६ लक्ष इतक्या जादा अंदाजीत रकमेची तरतूद करुन त्यानुसार अंदाजपत्रक सुधारीत करावे लागेल. या प्रमाणे सुधारित अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची पुन्हा तांत्रिक मान्यता घेवून शासनाकडे सुधारीत प्रस्ताव सादर करावा लागेल. त्यामध्ये कालापव्यय होऊन प्रकल्पास विलंब होण्याची शक्यता आहे. त्यासाठी सध्या फक्त संस्थानचे वापरासाठी करावयाचा १० टिपीडी क्षमतेचा एक Biomethanation Plant, ०५ TPD क्षमतेचे ०१ Bailing

Machine, जी.आय.पाईप लाईन, प्रीस्ट्रेस प्रीकास्ट कॉक्रींट कुंपन, गेट, ५.५ मीटर रुंदीचा डांबीरीकरणासह रस्ता विकसित करणे व सी.डी. वर्क करणे या कामांसाठी ई-निविदा मागवून काम सुरु करणे उचीत होईल. या प्रकल्पाचे यशस्वीतेबाबत निरीक्षणाअंती शिर्डी नगरपंचायत यांचे वापरासाठी करावयाचे १० टिपीडी क्षमेतेच्या Biomethanation Plant बाबत निर्णय घेता येईल. तसेच दरम्यान शिर्डी नगरपंचायत यांचेकडून त्यांचे वापरासाठी नियोजित प्लान्टची आवश्यकता, उपलब्ध जागा इ.तपशिल मागविता येईल.

प्रस्ताव– तरी वर नमूद रु.४,३५,३५,९४६/- मात्रचे खर्चाचे प्रस्तावास शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेनंतर सदर अंदाजपत्रकातील शिर्डी नगरपंचायत यांचे वापरासाठी करावयाच्या १x १० टीपीडी क्षमतेचा Biomethanation Plant वगळता उर्वरित कामांसाठी पहिल्या टप्यात ई-निविदा मागविणे व सदर प्रकल्पाचे यशस्वीतेनंतर दुस-या टप्यात शिर्डी नगरपंचायत यांच्या वापरासाठी १x१० टीपीडी क्षमतेच्या Biomethanation Plant साठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी अद्ययावत Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) तंत्रज्ञानावर आधारित प्रत्येकी १० TPD क्षमतेचे दोन घनकचरा प्रक्रिया युनिटस् संस्थानचे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.१८२ या जागेमध्ये उभारणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच प्रथम १० टिपीडी क्षमतेच्या एक Biomethanation Plant साठी कार्यादेश देण्यात यावा व सदर प्रकल्पाचे यशस्वीतेबाबत खात्री झालेनंतर दुसऱ्या १० टिपीडी क्षमतेच्या Biomethanation Plant साठी कार्यारंभ आदेश देण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०४** **संस्थान मालकीच्या साईधर्मशाळा गट नं.१७२ मधुन ड्रेनेज लाईन करणेसाठी परवानगी मिळणेकरीता ग्रामपंचायत कार्यालय, निमगाव कोऱ्हाळे यांचे विनंतीपत्राबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :

अधिनियमाचे कलम १७ मधील (३) विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा आधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही. विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही.

**प्रस्तावना**ः ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव को-हाळे यांनी मा. अध्यक्ष सो. यांना अग्रेशित केलेल्या दि.१४/०२/२०१८ रोजीचे पत्राव्दारे,"संस्थान मालकीचे गट नं.१७२ मधील साईआश्रम धर्मशाळा वाहनतळ पार्किंग मधून आर.सी.सी गटार नेणेकामी आपणाकडून परवानगी मिळावी व सदरचे काम करतांना वाहनतळावरील काही नुकसान झाल्यास त्याची दुरुस्ती करण्याची शाश्वती देणेकामी ग्रामपंचायत आपणास हमीपत्र देण्यास तयार आहे, असे कळवून सदर पत्राबरोबर जोडलेल्या ग्रामसभेच्या दि.२६/०१/२०१८ च्या ठराव क्रं. ०६ मध्ये आर.सी.सी गटार हे श्री साईबाबा संस्थान यांच्या मालकीच्या साईआश्रम धर्मशाळा मधील उत्तर बाजूस असलेल्या पार्किंग क्षेत्रातून करावे लागणार आहे सदरचे काम करतांना होणा-या नुकसानीची जबाबदारी ग्रामपंचायतीची असून नादुरुस्त झालेले काम ग्रामपंचायत करण्यास तयार असेल. त्यास ही सभा मंजुरी व मान्यता देत आहे, असे नमूद केले आहे.

याबाबत मा. ना. श्री राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेता महाराष्ट्र विधानसभा यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेशित केलेल्या दि.१२/०६/२०१८ व दि.२३/११/२०१८ रोजीचे पत्रांव्दारे, "मौजे निमगांव को-हाळे, ता. राहाता हद्दीतील निमगांववाडी, यमुनानगरमध्ये ग्रामनिधीमधून करावयाच्या ११०० मिटर ड्रेनेज लाईन पैकी ५०० मिटर ड्रेनेज लाईन संस्थानचे साईआश्रम धर्मशाळेच्या पार्किंगमधून जात असलेने सदर ड्रेनेज लाईन करण्यास ग्रामपंचायत कार्यालय निमंगाव को-हाळे यांना परवानगी देऊन सहकार्य करावे ही विनंती, असे कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्रायः उपरोक्त विषयांकित संदर्भ क्रं. ०१ व ०२ चे पत्रास अनुसरुन मा. सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय निमगांव को-हाळे यांना दि.१० ऑगष्ट, २०१८ रोजीचे पत्राव्दारे, "सदर ड्रेनेज लाईनचे

काम संस्थान मालकीचे साईधर्मशाळा गट नं. १७२ मधून करावयाचे झाल्यास त्याचा ड्रेनेज लाईन रेखांकन आराखडा, तो कुठे जोडणार, ड्रेनेज लाईनची एकूण प्रस्तावित लांबी, पाईपचा व्यास, इन्स्पेकशन चेंबर्सची ठिकाणे, आवश्यक तो स्लोप इ. माहिती नकाशासह इकडील कार्यालयाकडे सादर करावी. सदर माहिती प्राप्त झालेनंतर योग्य तो निर्णय घेता येईल, असे कळविले होते.

परंतु ग्रामपंचायत कार्यालय निमगांव को-हाळे यांनी अद्यापपर्यंत नमूद कामाबाबत कोणत्याही प्रकारची माहिती इकडील कार्यालयास सादर केलेली नाही.

तथापि सदर ड्रेनेज लाईनचे काम करणेस खालिल अटी व शर्तीवर परवानगी देता येईल.

१) प्रस्तावित ड्रेनेज लाईनचा रेखांकन नकाशा, ड्रेनेज लाईनची संस्थान हद्दीतून जाणारी लांबी, पाईपचा व्यास, इन्स्पेक्शन चेंबर्सचे ठिकाण इ. तपशिल काम सुरु करणेपुर्वी संस्थानकडे सादर करणेत यावा.

२) ड्रेनेज लाईनचे कामामुळे संस्थान हद्दीतील निघणारे पेव्हींग ब्लॉक पूर्ववत बसवून देणे, फुटणारे पेव्हींग ब्लॉक नव्याने बसवून देणे व इतर कुठलेही नुकसान झाल्यास ते ग्रामपंचायत खर्चाने पूर्ववत करुन देण्यात यावे.

३) काम पूर्ण झालेनंतर सदरहू ड्रेनेज लाईनची दुरुस्ती व देखभाल ग्रामपंचायत यांनी स्वखर्चाने करावी.

४) भविष्यात, सदरहू ड्रेनेज लाईन चोकअप व ओव्हर फ्लो होणार नाही तसेच त्यामुळे संस्थान परिसरात अस्वच्छता व दुर्गंधी निर्माण होणार नाही याची दक्षता ग्रामपंचायतीने घ्यावी.

५) भविष्यात संस्थानचे विकास प्रकल्पास सदर ड्रेनेज लाईनमुळे अडचण निर्माण झाल्यास ग्रामपंचायत यांचेमार्फत ती स्वखर्चाने हलविणेत यावी.

६) सदर ड्रेनेज लाईनचे कामासाठी शासनाचे इतर विभागाच्या आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी ग्रामपंचायत यांची राहिल.

७) वरीलप्रमाणे अटी व शर्ती मान्य असलेबाबत ग्रामपंचायतीचा ठराव करुन तो संस्थानला उपलब्ध करणेत यावा.

प्रस्तावः- तरी ग्रामपंचायत कार्यालय निमगांव को-हाळे यांना संस्थानचे साईधर्मशाळा पार्किंगमधून ड्रेनेज लाईन टाकणेसाठी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा ग्रामपंचायत ठराव उपलब्ध करुन घेऊन काम करणेस परवानगी देणेबाबत सदरहू प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीच्या साईधर्मशाळा गट नं.१७२ मधुन ड्रेनेज लाईन करणेसाठी ग्रामपंचायत कार्यालय निमगांव को-हाळे यांचेकडून ड्रेनेजची साईज व नकाशा यासह सविस्तर प्रस्ताव मागवून प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०५** **स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना संस्थानचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील वापरास दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- यापूर्वी स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील क्षेत्र १६२.८८ चौमी. इतके दि.११/११/२०१६ ते दि.१०/११/२०१७ या कालावधीकरीता लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरास दिलेली होती. तदनंतर जागा वापराची पुढील मुदत दि.११/११/२०१७ ते दि.१०/१०/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेपूढे सादर करणेत आलेला होता. त्यात निर्णय क्रं.९६ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, "स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना स.नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील क्षेत्र १६२.८८ चौमी.जागा दि.११/११/२०१७ ते दि.१०/१०/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन रु.९९,०००/- मात्र दरमहा मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन शासनाचे पूर्वपरवानगीने मुदतवाढ देण्यात यावी," असे ठरले.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/६७४१/२०१८ दि.१६/०३/२०१८ अन्वये मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेत येवून त्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही

किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे. तदनुषंगाने स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना यापूर्वी उपरोक्त जागा दि.११/११/२०१६ ते दि.१०/११/२०१७ या एक वर्षाचे कालावधीकरीता वापरास दिलेली असून सदरची मुदत दि.११/११/२०१७ ते दि.१०/१०/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधी करीता वाढवून देण्याचे प्रस्तावित आहे. परिणामी सदरचा कालावधी सलग एक वर्षापेक्षा जास्त होत असलेने उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीचे सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहील्या मजल्यावरील १६२.८८ चौमी.जागा दि.११/११/२०१७ ते दि.१०/१०/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी मासिक परवाना फी रु.९९,०००/- मात्र भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देणेकामी व कायदेशीर करारनामा करुन घेणेकामी मान्यता मिळणेसाठी विनंती करण्यात आली.

त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्रं.सासंवि-१०१८/६२१/प्र.क्र.८९/ का.१६ दि.१५/१०/२०१८ अन्वये साईनाथछाया इमारतीतील स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे वापरात असलेल्या १६२.८८ चौमी.जागेस दि.११/११/२०१७ ते दि.१०/१०/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी रु.९९,०००/- मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देण्यात येत आहे असेबाबत इकडेस कळविलेले आहे. तदनुसार उक्त कालावधीचा लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा दि.२६/१०/२०१८ रोजी करणेत आलेला आहे.

उक्त जागा वापराची मुदत दि.१०/१०/२०१८ रोजी संपुष्टात आलेली असलेने सदर जागेच्या वापराची पुढील मुदत वाढवून मिळणेकामी मा.शाखाधिकारी,स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१७/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील १६२.८८ चौमी. या स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे वापरास असलेल्या जागेच्या वापराची पुढील दि.११/१०/२०१८ ते दि.१०/०९/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.९९,०००/-+१०% रु.९,९००/- अशी एकूण रक्कम रु. १,०८,९००/- (अक्षरी रु.एक लाख आठ हजार नऊशे मात्र) इतके दरमहा मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार उक्त ११ महिन्यांसाठीची मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील १६२.८८ चौमी. या स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे वापरास असलेल्या जागेच्या वापराची पुढील दि.११/१०/२०१८ ते दि.१०/०९/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.९९,०००/-+१०% रु.९,९००/- अशी एकूण रक्कम रु. १,०८,९००/- (अक्षरी रु.एक लाख आठ हजार नऊशे मात्र) इतके दरमहा मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार उक्त ११ महिन्यांसाठीची मुदतवाढ देणेकामी व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील १६२.८८ चौ.मी. जागा स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना दि.११/१०/२०१८ ते दि.१०/०९/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी वापरास देणेकामी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.९९,०००/-+१०% (रु.९,९००/-) अशी एकूण रक्कम रु.१,०८,९००/- इतके दरमहा मासिक भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देणेस व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०६** **बँक ऑफ बडोदा, शाखा साकुरी, बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा-शिर्डी, सेंट्रल बँक ऑफ इंडिया,शाखा-शिर्डी ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, शाखा-शिर्डी या चार राष्ट्रीयकृत बँकांना संस्थान परिसरात ए.टी.एम.सुविधा सुरु करणेकामी संस्थान मालकीची जागा वापरास देणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियमातील तरतूद-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- संस्थानचे लेखाशाखा विभागाने त्यांचेकडील पत्र क्रं.एसएसएस/वशी-लेखा/९९०/२०१८ दि.०६/०७/२०१८ अन्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत सध्या श्री साई समाधी शताब्दी वर्ष महोत्सव साजरा करण्यात येत असून, शताब्दी उत्सवादरम्यान श्रीं च्या दर्शनासाठी मोठया प्रमाणात साईभक्तांची गर्दी होत आहे. संस्थानच्या आवारात साईभक्तांच्या सुविधेसाठी राष्ट्रीयकृत बँकांची एटीएम सुविधा सुरु करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला होता. त्या अनुषंगाने लेखाशाखा विभागाकडून संस्थानची सर्व निवासस्थाने, साईनाथ रुग्णालय, साईबाबा रुग्णालय, प्रसादालय येथील विभाग प्रमुख यांना एटीएमसाठी जागा उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आली होती.संस्थानचे बचत खाते असलेल्या सर्व राष्ट्रीयकृत बँकांना पत्र पाठवून संस्थान परिसरामध्ये एटीएम मशीन सुरु करणेबाबतचा प्रस्ताव लेखाशाखा विभागाकडे जमा करणेबाबत कळविले होते. त्यास अनुसरुन १) बँक ऑफ बडोदा,साकुरी २) बँक ऑफ महाराष्ट्र,शिर्डी ३) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी ४) ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी या बँकांचे प्रस्ताव लेखाशाखा विभागाकडे प्राप्त झालेले आहेत. तथापि संस्थान परिसरामध्ये ए.टी.एम.मशिन सुरु करणे असल्याने आणि संस्थान मालमत्तेसंबंधीचे संपूर्ण कामकाज मालमत्ता विभागामार्फत होत असल्याने बँकांना जागा देतांना सर्व कायदेशीर पुर्तता (करारनामा,जागेचे भाडे,जागा देणेचा कालावधी तसेच संस्थान मालमत्ता भाडयाने देता येईल का? वगैरे) हे मालमत्ता विभागामार्फत करावे लागणार आहे. जेणेकरुन याबाबत लेखापरिक्षणामध्ये मुद्दे उपस्थित होणार नाहीत," असेबाबत मालमत्ता विभागास कळविले आहे.

संस्थानचे लेखाशाखेकडून प्राप्त झालेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील नमूद केलेल्या परिशिष्टांमधील रकाना २ मधील बॅंकांनी त्यांचे बॅंकेचे ए.टी.एम.चालविणेसाठी रकाना ३ मधील जागांपैकी जागा वापरास मिळणेकामी सुचित केलेले आहे. तदनुषंगाने संस्थानचे विविध विभागांनी सदर बॅंकांना रकाना ४ मध्ये दर्शविलेल्या जागा वापरास देणेकामी अभिप्रायासह प्रस्तावित केलेले आहे.

परिशिष्ट

| अ.क्र | बँकेचे नाव | बँकेने ए.टी.एम.साठी संस्थान परिसरात जागा वापरासाठी सुचित केलेली ठिकाणे. | संस्थानचे संबंधीत विभागाने त्यांचे अभिप्रायासह प्रस्तावित केलेली ठिकाणे. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | बँक ऑफ बडोदा, शाखा साकुरी | १) साईबाबा हॉस्पीटल परिसरात.<br>२) साईआश्रम परिसरात (१००० रुम्स) च्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ.<br>३) संस्थानचे साईनाथछाया इमारतीत<br>४) साईनाथ भोजनालय (साईप्रसादालय)<br>५) द्वारावती भक्तनिवास.<br>६) साईबाबा भक्तनिवास (५०० रुम्स) | सदर बँकेस साईबाबा भक्तनिवासस्थानचे (५०० रुम) मुख्य प्रवेशद्वाराजवळ असणारी खोली प्रस्तुतकामी उपयुक्त ठरेल असेबाबत प्र.अधिक्षक,साईबाबा भक्तनिवासस्थान यांनी त्यांचे कडील पत्र क्रं.०३/२२९ दि.१९/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय सादर केलेला असल्याने साईबाबा भक्तनिवासस्थानचे मुख्य प्रवेशद्वाराजवळ असणारी खोली बँक ऑफ बडोदा,शाखा साकुरी यांना ए.टी.एम.साठी जागा देणेबाबत विचार करता येईल. |
| २) | बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा शिर्डी | संस्थान परिसरात कुठेही. | सदर बँकेस द्वारावती भक्तनिवास इमारतीचे दर्शनी भागातील एका गाळयामध्ये (वाहन पार्कींग) ए.टी.एम.साठी जागा उपलब्ध करुन देता येईल,असेबाबत अभिप्राय प्र.अधिक्षक,द्वारावती भक्तनिवास यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.२६२ दि.१०/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविलेप्रमाणे बँक ऑफ महाराष्ट्र,शाखा शिर्डी यांना सदर ठिकाणी ए.टी.एम.साठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत विचार करता येईल. |
| ३) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी | साईबाबा हॉस्पिटल परिसरात मेडीकल जवळच्या कॅन्टीन विभागात. | सेंट्रल बँक ऑफ इंडीया,शिर्डी यांनी मागणी केल्याप्रमाणे साईबाबा हॉस्पिटलमध्ये कॅन्टीन विभागात ए.टी.एम.बसविणे योग्य राहील, असेबाबत अभिप्राय प्र.वैद्यकिय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.एसएसएसटी/एसएसएसबीएच/ वित्त-१०८/२०१७ दि.१८/०९/२०१७ अन्वये कळविलेवरुन उक्त जागा बँकेस ए.टी.एम.साठी देणेबाबत विचार करता येईल. |
| ४) | ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स,शाखा शिर्डी | १) साईबाबा हॉस्पिटल परिसरात.<br>२) साईआश्रम निवासस्थान १००० रुम्सच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ. | साईआश्रम भक्तनिवास प्रशासकीय इमारतीचे आऊटगेटजवळ आतील बाजूस जागा उपलब्ध होईल,असेबाबत प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास यांनी त्यांचेकडील पत्र जा.नं.२०१७/१८-१८७ दि २०/०९/२०१७ अन्वये अभिप्राय सादर केलेले आहे. सदर अभिप्रायावरुन ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स यांना ए.टी.एम. साठी उक्त ठिकाणी जागा उपलब्ध करुन देणेबाबत विचार करता येईल. |

विभागाचा अभिप्राय:- संस्थानचे संबंधीत विभागांनी सादर केलेल्या अभिप्रायाप्रमाणे व प्रस्तावाप्रमाणे उपरोक्त परिशिष्टातील रकाना रकाना ४ मध्ये दर्शविलेल्या जागा रकाना २ मधील बँकांना त्यांच्या ए.टी.एम.साठी ११ महिन्यांचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडेदराने अथवा संस्थान निश्चित करील त्या मासिक भाडेदराने यापैकी जे जास्त असेल त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन जागा वापरास देता येईल व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव– उपरोक्त प्रस्तावातील परिशिष्टामधील रकाना २ मध्ये दर्शविलेल्या बँकांना रकाना ४ मध्ये प्रस्तावित केलेल्या ठिकाणच्या जागा त्यांचे बँकेच्या ए.टी.एम.साठी ११ महिन्यांचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या मासिक भाडेदराने अथवा संस्थान निश्चित करील त्या मासिक भाडेदराने यापैकी जे जास्त असेल त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन जागा वापरास देण्याच्या व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्याच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.०६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, बँक ऑफ बडोदा, शाखा-साकुरी, बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा-शिर्डी, सेंट्रल बँक ऑफ इंडिया,शाखा-शिर्डी, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, शाखा-शिर्डी या चार राष्ट्रीयकृत बँकांना संस्थान परिसरात ए.टी.एम.सुविधा सुरु करणेकामी ११ महिन्यांचे कालावधीसाठी खालील ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

| **अ.क्र** | **बँकेचे नाव** | **ए.टी.एम.साठी संस्थान परिसरात जागा वापरासाठी ठिकाण.** |
|---|---|---|
| **१** | **बँक ऑफ बडोदा, शाखा साकुरी** | **साईबाबा भक्तनिवास (५०० रुम)** |
| **२** | **बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा शिर्डी** | **व्दारावती भक्तनिवास** |
| **३** | **सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी** | **श्री साईबाबा हॉस्पिटल** |
| **४** | **ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शाखा शिर्डी** | **साईआश्रम निवासस्थान (१००० रुम)** |

**तसेच सदर जागेसाठी आकारावयाची दरमहा भाडे रक्कम सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून निश्चीत करुन घेण्यात यावी, असे ठरले. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित करण्यात आलेली मासिक भाडेदराची रक्कम व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिन्यांचे कालावधीसाठी जागा वापरास देण्यास व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.०७ श्रींचे म्युझियम हॉलमधील बाबांनी हाताळलेल्या वस्तुंचे जतन करणे संदर्भात संवर्धन प्रक्रिया करणेकामी तज्ञांचे शिर्डी भेटीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद – अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही

प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. तृयातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

प्रस्तावना– उपरोक्त विषयांकीत छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, मुंबई चे संचालक मा.एस.मुखर्जी व त्यांचे सहकारी श्री.ओमकार कडू यांनी दि.२७/०२/२०१७ रोजी शिर्डी येथे येऊन म्युझियम हॉलची पहाणी करुन अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार श्रींचे म्युझियम हॉलमधील बाबांनी हाताळलेल्या वस्तू जतन करणे संदर्भात संवर्धन प्रक्रीया करणेबाबत इकडील विभागामार्फत सदरहू प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेत विषय क्रं.०५ निणर्य क्रं. ४६२ अन्वये “ यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानचे म्युझियम हॉलमध्ये ठेवण्यात आलेल्या, साईबाबांनी वापरलेल्या /हाताळलेल्या वस्तू अनमोल असुन त्यांचे व्यवस्थीत संगोपन करावयाला हवे, असे समितीचे मत झाले. सबब प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, तज्ञांचे अहवालानुसार म्युझियम हॉल अद्ययावत करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. ” असा निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये तज्ञांचे अहवालानुसार म्युझियम हॉल अद्ययावत करणे असल्याने, श्रींनी हाताळलेले वस्तूंवर तज्ञांमार्फत संवर्धन प्रक्रिया करणे संदर्भात सदरचा विषय संवेदनशील आहे.

विभागाचा अभिप्राय- श्रींनी हाताळलेल्या संग्रहालयातील वस्तूंवर संवर्धन प्रक्रिया करणेसाठी छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्राहालय, मुंबई येथील आलेल्या अधिकारींचे ताब्यात सदरच्या वस्तू न देता त्या संग्रहालयामध्ये अथवा मंदिराचे पहिल्या माळयावर उपलब्ध करुन देता येईल. यावेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने वस्तु संग्रहालयामध्ये आवश्यकता पडल्यास काही भागांमध्ये साईभक्तांना प्रवेश बंद करावा लागेल. तसेच सदरच्या वस्तू मौल्यवान असल्याने मा.व्यवस्थापन समिती सदस्य तसेच संरक्षण अधिकारी, संबंधीत विभागप्रमूख, कॅमेरामॅन (व्हिडिओ शुटींगसह) व इतर संरक्षण पहारेकरींसह उपस्थित रहाणे आवश्यक वाटते. तसेच श्रींचे म्युझियम हॉलमधील बाबांनी हाताळलेल्या वस्तु जतन करणे संदर्भात संवर्धन प्रक्रिया करणेकामी छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय, मुंबई यांचेमार्फत आलेल्या तज्ञ संचालकांची संस्थानमार्फत निवास व भोजन, दर्शन, आरती व्यवस्था तसेच त्यांना मुंबईहून जाणे-येणेची व्यवस्था मोफत करावी लागेल, असे नम्र मत आहे. सदरचा विषय संवेदनशील असलेने सदरच्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच म्युझियम हॉलमधील वस्तुंचे संवर्धन प्रक्रीया करणेचे कालावधीत मा.व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित राहाणे आवश्यक वाटते, असे मत आहे.

प्रस्ताव – सदरचे संग्रहालयातील बाबांनी हाताळलेल्या वस्तू जतन करणेकामी त्यावर संवर्धन प्रक्रीया करणेकरीता मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयाचे तज्ञांना शिर्डी येथे बोलविणेस तसेच त्यांची निवास, भोजन, दर्शन, आरती इत्यादी व्यवस्था व मुंबई येथुन घेऊन येणे, कामपुर्ण झालेनंतर मुंबई येथे सोडविणेसाठी वाहन व्यवस्था मोफत (विनामुल्य) करणेस मान्यता असावी. तसेच तज्ञांचा अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करणेसाठी सदरहू विषयांवर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे म्युझियम हॉलमधील बाबांनी हाताळलेल्या वस्तुंचे जतन करणे संदर्भात मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयाचे तज्ञांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**विषय नं.०८** **पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय, सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रक्कम रु.२,२६,००,०००/- आर्थिक सहाय्य देणेचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** पंडीत दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांनी इमारत बांधकाम रु. १.२३ कोटी व शालेय साहित्य घेण्यासाठी रु. ४८.००लक्ष असे एकूण रक्कम रु १.७१ कोटीची मागणी त्यांचे पत्र जा.क्रं. पं.दी.ऊ.शि.सं/२०१७-२०१८/११ दिनांक १९.०४.२०१७ नुसार केली होती त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे

**अ. इमारत बांधकाम खर्च :-**

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | इमारत बांधकाम खर्च | रु. २,२२,००,०००/- |
| २ | इमारत बांधकाम निधीतून केलेला खर्च | रु. ९९,००,०००/- |
| ३ | उर्वरीत बांधकामसाठी लागणारी एकूण रक्कम | **रु. १,२३,००,०००/-** |

**ब. शालेय साहित्य खरेदीसाठी लागणारा खर्च :-**

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांसाठी नवीन ६०० बाके | रु. १५,००,०००/- |
| २ | क्रिडा साहित्य | रु. १०,००,०००/- |
| ३ | ग्रंथालय | रु. ३,००,०००/- |
| ४ | सुसज्ज प्रयोगशाळा | रु. ५,००,०००/- |
| ५ | संगणक, लॅब व फर्निचर | रु. १५,००,०००/- |
| ६ | एकूण | ४८,००,०००/- |
| एकूण | **अ + ब रु. १,२३,००,०००+४८,००,०००/-** | **१,७१,००,०००/-** |

अशी एकूण रक्कम रु.१.७१कोटी मात्र मिळणेबाबत विनंती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना केली होती. त्यावर मा. व्यवस्थापन समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय :- दि.०८.९.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७५३ अन्वये चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि. ०१ आक्टोंबर पासून प्रारंभ होत आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि. ३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु. ३०२३ कोटी मात्रच्या कृती आराखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे व साईभक्तांना पायाभुत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणात खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभुमीवर पंडीत दिनदयाल उपाध्याय यांचे शिक्षण संस्थेस इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रु. १.७१ कोटी मात्र आर्थिक सहाय्य करणे उचित होणार नाही. सबब समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा.असा निर्णय झालेला आहे.

संस्थेने सादर केलेला नविन प्रस्ताव:- आता पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद यांनी दि.०५.०६.२०१८ रोजी रक्कम रु. २.२६ कोटी मात्र अनुदानासाठी फेर प्रस्ताव सादर केला असून, मा. श्री चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात येत आहे.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेच्या रामचंद्र नाईक विद्यालय, स्पंदन नगर सिडको एन – ४ (दक्षिण) औरंगाबाद येथील शाळेच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी व शालेय साहित्य खरेदी करून शाळा सर्व सुविधायुक्त करण्यासाठी निधीची मागणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी यांचेकडे केलेली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

**अ. इमारत बांधकाम खर्च :-**

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | इमारत बांधकाम खर्च शासन मंजूरीनुसार | रु. २,५५,००,०००/- |
| २ | इमारत बांधकाम निधीतून केलेला खर्च | रु. ९९,००,०००/- |
| ३ | उर्वरीत बांधकामसाठी लागणारी एकूण रक्कम | **रु. १,५६,००,०००/-** |

**ब. शालेय साहित्य खरेदीसाठी लागणारा खर्च :-**

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांसाठी नवीन ६०० बाके | रु. १८,००,०००/- |
| २ | क्रिडा साहित्य | रु. १२,००,०००/- |
| ३ | ग्रंथालय सर्व साहित्यासह | रु. ७,००,०००/- |
| ४ | सुसज्ज प्रयोगशाळा साहित्यासह | रु. ८,००,०००/- |
| ५ | संगणक, लॅब व फर्निचर | रु. २५,००,०००/- |
| ६ | एकूण | ७०,००,०००/- |

**क. मागणी :-**

| | | |
|---|---|---|
| एकूण | **अ + ब रु. १,५६,००,०००+७०,००,०००/-** | **२,२६,००,०००/-** |

| | |
|---|---|
| एकूण प्रकल्प खर्च अ + ब | **रु.२,५५,००,०००+७०,००,००० = ३,२५,००,०००/-** |

अशी मागणी केली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- उपरोक्त नव्याने प्राप्त झालेला प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०.०६.२०१८ रोजीचे सभेत सादर केला असता, त्यावर निर्णय क्रं. ४१८ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, पंडीत दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकामासाठी रु. १.५६ कोटी व शालेय साहित्यासाठी रक्कम रु. ७० लक्ष अशी एकूण रु. २.२६ कोटी आर्थिक सहाय्य देणेबाबतचा प्रस्ताव मान्य केल्यास इतरही खाजगी संस्था अशाप्रकारे आर्थिक सहाय्य मिळणेबाबत मागणी करतील. यास्तव सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला. मात्र छाननी समितीचे दि. ०६.१०.२०१८ रोजी यावर आयत्या वेळी चर्चा करण्यात येऊन निर्णय क्रं. ४६ अन्वये चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

मा. छाननी समितीचा निर्णय:- पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय, सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रक्कम रु.२,२६,००,०००/- आर्थिक सहाय्य मागणीचा नव्याने प्राप्त प्रस्ताव चर्चेला घेण्यात आला. व्यवस्थापन समितीच्या दि.३०.०६.२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४१८ याचेही अवलोकन करण्यात आले.

छाननी समिती सभासदांचे एकमताने असे मत झाले की, संबधीत शिक्षण संस्थान निरपेक्षपणे शैक्षणिक वातावरणात योग्य वाढ व्हावी व राष्ट्रीय विचारसरणीचा प्रसार विद्यार्थ्यामध्ये प्रतिबिंबीत व्हावा या दिशेने कार्य करीत आहे.

दि.०५.०६.२०१८ रोजी संस्थेने शाळेच्या इमारत बांधकाम व साहित्यासाठी म्हणून रकमेची मागणी केली आहे. सर्वांसाठी गुणात्मक शिक्षण हा संकल्प संस्थेचा दिसत असुन समाजातील सामान्य घटकांसाठी दर्जेदार शिक्षणव्यवस्था निर्माण करण्यासाठी संस्था प्रयत्न करीत आहे. संस्थेला दि.२६.०३.२०१५ औरंगाबाद महानगर पालीका यांनी शाळेकरीता बांधकाम परवानगी दिली आहे.

वरील संस्थेच्या नोंदणी पुस्तकाचे विवरण पाहता संस्थेचे उद्देश व व्यवस्थापन यांची सांगड संस्थेच्या ताळेबंदात दिसुन येते. म्हणून छाननी समितीने एकमताने वरील संस्थेस मागणीप्रमाणे रक्कम रु.२.२६ कोटी रक्कम देण्याचे प्रस्तावास सहमती दर्शविली आहे. सदरील प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेत ठेवण्यात यावा व शासनाकडे पाठविणेत यावा. संस्थेचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर संबधीत संस्थेला साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवथा, शिर्डी यांचेमार्फत आर्थिक मदत झालेबाबतचा इमारतीच्या एका बाजुस श्री साईबाबा संस्थान यांचेमार्फत आर्थिक सहाय्य असा उल्लेख करावा लागेल. संस्थेच्या प्रवेशव्दार/दर्शनीभागावर साईबाबांचे ३x४ फुट आकाराचे फोटो लावणे क्रमप्राप्त होईल. असे ठरले.

उपरोक्त प्रस्तावास छाननी समितीचे निर्णयाप्रमाणे व्यवस्थापन समितीचे सभेसमारे प्रस्ताव सादर केला असता, मा. व्यवस्थापन समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय :- दि. १३.१२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७३० अन्वये सविस्तर चर्चा होऊन पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद या संस्थेची व ते चालवित असलेल्या शाळेची सविस्तर माहिती घ्यावी, सदर संस्था देणगी घेते काय? विद्यार्थ्यांकडून फी घेतली जाते काय, या संस्थेमार्फत कोणकोणते सामाजिक उपक्रम राबविले जातात, लाभार्थी कोणत्या आर्थिक स्तरातील आहेत, याबाबत सविस्तर माहिती घेऊन फेरप्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा, असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय नुसार जा. न.एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/४६५७/२०१८ दि.२२.१२.२०१८ अन्वये माहिती मागविली असता पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांनी जा. क्र./पंदीउशिसं/२०१८-१९ दि. २६.१२.२०१८ रोजी खालीलप्रमाणे माहिती सादर केली आहे.

| अ.न | माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था सिडको, औरंगाबाद या संस्थेची व ते चालवित असलेल्या शाळेची सविस्तर माहिती द्यावी. | पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था सिडको, औरंगाबाद या संस्थेची व ते चालवत असलेल्या शाळांची यादी सदर प्रस्तावात नमूद आहे. सदर संस्थेचे मुख्यालय, औरंगाबाद येथे असून संस्था एकूण ३० शाळा, कॉलेजेस व वस्तीगृह चालवत आहे. |
| २ | सदर संस्था देणगी घेते का? | समाजातील दानशून व सेवाभावी संस्थाकडून देगणी घेतली जाते. |
| ३ | विद्यार्थ्यांकडून किती फी घेतली जाते? | रामचंद्र नाईक विद्यालय हे जून १९९६ पासून सुरू झालेले असून सध्या १००टक्के अनुदानित आहे त्यामुळे नियमानुसार विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी घेतली जात नाही. |
| ४ | संस्थेमार्फत कोणकोणते सामाजिक उपक्रम राबविले जातात? | संस्थेचे उद्देश हे शैक्षणीक व सामाजिक स्वरुपाचे आहेत. संस्थेने समाजातील सर्व स्तरातील मुलां-मुलींसाठी पुर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्च शिक्षण कला, विज्ञान, वाणिज्य, योग-प्राणायाम, शारीरिक शिक्षण, संगणक, व्यवसाय शिक्षण, अध्यापनाचे शिक्षण व प्रशिक्षण इ. |

| | | |
|---|---|---|
| ५ | लाभार्थी कोणत्या आर्थिक स्तरातील आहेत? | संस्थेच्या शाळा व महाविद्यालय प्रामुख्याने ग्रामीण भागात आहेत. संस्था आर्थिक दुर्बल घटकाच्या वस्तीतील कामगारांची, गरीबांची, मागासवर्गीयांच्या विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता प्रधान शिक्षण प्रदान करीत आहे. |
| ६ | संस्थेने (शाळेला/विद्यालयाला) नविन इमारत किंवा असलेल्या इमारतीत सुधारणा आवश्यक असल्याबाबत संस्थेच्या अध्यक्ष/ सचिव यांचे प्रमाणपत्र. | शाळेच्या वरील दोन मजल्याचे काम अपूर्ण आहे. प्रमाणपत्र सादर केले आहे. |
| ७ | संस्थेने उपसंचालक, शिक्षण विभाग यांना अगोदर सादर केलेल्या जमा खर्चाचा तपशील. | जमा खर्चाचा हिशोब जोडला आहे मात्र शिक्षण विभाग अशा प्रकारची माहिती मागत नाही. |
| ८ | आर्थिक वर्ष सन २०१७-१८ या वर्षाचा लेखापरिक्षण अहवालाची प्रत. | सादर केला आहे. |
| ९ | संस्थेला शासनाकडून अनुदान मिळते किंवा नाही याबाबतचे प्रमाणपत्र. | संस्थेला शासनाकडून केवळ वेतन दिले जाते. इतर कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. |
| १० | संस्थेच्या मालमत्तेविषयी किंमतीसह यादी, याबाबत धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदवहीचा साक्षांकित उतारा इ. | मा. धर्मादाय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांच्याकडील नोंदवही साक्षांकित प्रत जोडली आहे. |

उपरोक्त प्रमाणे माहिती संस्थेने सादर केली आहे.

विभागाचा अभिप्राय :-

१) मा. व्यवस्थापन समितीने ज्या कारणास्तव दि. ०८.०९.२०१७ च्या सभेतील निर्णय क्रं. ७५३ नुसार प्रस्ताव अमान्य केलेला आहे, त्या बाबींची उद्दीष्ठ पुर्ती अद्याप झालेली नाही. अशातच या संस्थेला मदत केल्यास ही बाब संयुक्तीक होणार नाही असे वाटते.

२) संस्थेने यापूर्वी दिनांक १९.०४.२०१७ च्या प्रस्तावानुसार रु. १.७१ कोटीची मागणी केली होती आता मात्र सुधारीत मागणी रु. २.२६ कोटी केलेली आहे.

३) संस्थचे एक महाविद्यालय, सहा कनिष्ठ महाविद्यालय, नऊ माध्यमिक विद्यालय, चार प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, चार पुर्व प्राथमिक विद्यालय, दोन आश्रम शाळा, दोन वस्तीगृह आहेत. संस्थेच्या अनेक शाखा आहेत. प्रस्तावात नमूद माहितीनुसार सदरची शिक्षणसंस्था मोठी व सक्षम दिसते.

४) अनुदान मागणी ज्या विद्यालयाच्या इमारतीसाठी केली आहे ती शाळा औरंगाबाद शहरात आहे. एकंदरीत शहरात शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणा-या अनेक अनुदानित व विना अनुदानित शैक्षणीक संस्था कार्यरत आहेत.

अशाप्रकारे शैक्षणीक क्षेत्रात काम करणा-या अनेक शिक्षण संस्था कार्यरत असून त्याही अशाच प्रकारची मागणी करतील, त्यामुळे अनुदान देणे उचित होणार नाही.

प्रस्ताव:- पंडीत दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्या साठी रक्कम रु.२,२६,००,०००/- आर्थिक सहाय्य देणेचे प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद या संस्थेचे उद्देश हे शैक्षणीक व सामाजिक स्वरुपाचे आहेत. संस्थेने समाजातील सर्व स्तरातील मुलां-मुलींसाठी पुर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्च शिक्षण कला, विज्ञान, वाणिज्य, योग-प्राणायाम, शारीरिक शिक्षण, संगणक, व्यवसाय शिक्षण, अध्यापनाचे शिक्षण व प्रशिक्षण इत्यादी असुन संस्थेच्या शाळा व महाविद्यालय प्रामुख्याने ग्रामीण भागात आहेत. संस्था आर्थिक दुर्बल घटकाच्या वस्तीतील कामगार, गरीब व मागासवर्गीयांच्या विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता प्रधान शिक्षण प्रदान करीत आहे. याबाबी विचारात घेऊन पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेच्या रामचंद्र नाईक विद्यालय, स्पंदन नगर सिडको एन–४ (दक्षिण) औरंगाबाद येथील शाळेच्या इमारतीचे उर्वरीत बांधकाम पुर्ण करण्यासाठी रक्कम रु. १,५६,००,०००/-मात्र आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थानमार्फत देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे सदर शाळेच्या उर्वरीत इमारत बांधकामासाठीच वापरण्यात यावे याबाबत संबधीताशी करारनामा करण्यात यावा, व संस्थानचे बांधकाम विभागामार्फत सदर बांधकामाची वेळोवेळी पाहणी करुन त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

**मा.छाननी समितीने रक्कम रु.२,२६,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता दिलेली असल्याने सदर प्रस्ताव पुन्हा मा.छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करावा व त्यांनतर शासनाचे मान्यतेसाठी सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा/बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०९** **माहे ऑगस्ट-२०१८ व सप्टेंबर,२०१८ जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे ऑगस्ट-२०१८ व सप्टेंबर-२०१८ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा- खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.नं. | महिना | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | ऑगस्ट-२०१८ | ५९,१६,२२,४४७/- | २०,२१,६८,३४३/- |
| ०२ | सप्टेंबर-२०१८ | ३७,११,२२,३४२/- | ५२,८७,८०,८७६/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे ऑगस्ट-२०१८ व सप्टेंबर-२०१८ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे ऑगस्ट-२०१८ व सप्टेंबर-२०१८ या कालावधीतील जमा–खर्च तक्त्याचे अवलोकन करुन त्यांची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१०** **श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धुळे यांना (3Tesla) एमआरआय मशिन व विथ टर्न की बेसीकसाठी रक्कम रु.१४ कोटी मात्र अनुदान देणेचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.ना. श्री गिरीष महाजन, मंत्री वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास महाराष्ट्र शासन यांनी श्रीमती रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पत्र पाठवून खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी मार्फत अनेक समाजपयोगी कामांकरिता मोठयाप्रमाणात देणगी स्वरुपात सहाय्य करण्यात येत आहे. ही बाब नक्कीच अभिनंदनीय आहे. श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे अंतर्गत गोरगरीब रुग्णांच्या तपासणी करणेकरिता एम. आर. आय. स्कॅन हे यंत्र श्री साईबाबा संस्थानकडून मिळणेकरिता प्रस्ताव अधिष्ठाता श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांनी सादर केला आहे.

सदर प्रस्तावात अधिष्ठाता श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे ५४५ खाटा असून या ठिकाणी धुळे नंदुरबार, जळगांव मालेगांव या जिल्हयातील रुग्ण हे विविध उपचारासाठी येत असतात. ही संस्था सन १९८९ पासून सुरू झाल्यापासून येथील विद्यार्थी प्रवेशक्षमता ही १०० असून काही विभागात सीपीएस कोर्सेस, मॉर्डर्न फॉर्मोकोलॉजी कोर्सेस व फेलोशिप कोर्सेस या ठिकाणी सुरू आहे.

या संस्थेत पदव्युत्तर पदवी (पी. जी.) कोर्सेस सुरु होणे नितांत आवश्यक असून या संस्थेकडून चिकीत्सालयीन एकूण ७ विषयात पी. जी. कोर्सेस सुरू करण्यासाठी एमसीआय, नवी दिल्ली यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला असून नजीकच्या कालावधीत केंव्हाही या ठिकाणी पी. जी. करिता निरीक्षण प्रक्रिया सुरू होणार आहे. यामध्य प्रामुख्याने चिकीत्सालयीन विषय स्त्रिरोग प्रसुती विभाग, शल्यचिकित्साशास्त्र, औषधवैद्यकशास्त्र, कान नाक घसा, अस्थिव्यंगोपचार, बालरोगशास्त्र, नेत्रशल्यचिकित्सा, यामध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

या संस्थेत सद्यस्थितीत एम. आर. आय. हे यंत्र उपलब्ध नसल्यामुळे याठिकाणी उपचारासाठी येणा-या गोरगरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात एम. आर. आय. ची चाचणी करण्याकरिता पाठविण्यात येत असते. त्यामुळे नाहक आर्थिक भुर्दंड हा बसत असतो. त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांच्या तसेच लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते यांची सातत्याने एमआरआय यंत्र उपलब्ध करण्याची मागणी आहे. यामुळे मेंदुच्या व मज्जासंस्थेच्या बारीक आजाराचे निदान करणेसाठी उपयोग होणार आहे.

तसेच धुळे शहर हे दोन राष्ट्रीय महामार्गावर वसलेले असल्यामुळे येथे मोठया प्रमाणात अपघात होत असतात. अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने उपचार मिळण्यासाठी व निदान होण्यासाठी एमआरआय हे यंत्र अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तसेच रुग्णालयाच्या लेखाशिर्षा क्रं. ५२ यंत्र व साधनसामुग्री अंतर्गत अनुदान उपलब्ध नसल्यामुळे आर्थिक अनुदान उपलब्ध करून देणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच त्यांनी एमआरआय मशीनचे Specification व रु. १४,००,००,०००/-किंमतीचे माहितीपत्रक सादर केले आहे. अर्थ साहाय्य साठी अधिनियमातील तरतुद :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

विभागाचा अभिप्राय :-

अ) राज्यातील जिल्हा रुग्णालयांना सिटी स्कॅन व एक्स रे मशीन खरेदी करणेकामी गत मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४.०६.२०१५ चे सभेत निर्णय क्र. १७९ अन्वये आरोग्य विभागाच्या शासकीय / निमशासकीय रुग्णालयांना रु. ४३.६४ कोटी निधी देणेबाबत निर्णय झालेला आहे, त्याबाबत सिव्हील अॅप्लीकेशन नं. ९६२२/२०१६ दाखल झालेले आहे. सदरचा शासन निर्णय रद्द होणेबाबत विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांना विनंती करण्यात आलेली आहे. मात्र याबाबत अद्यापपावेतो कार्यवाही झालेली नाही.

आ) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साई समाधी शताब्दी सोहळा साजरा करण्यात आला आहे. सदर समाधी शताब्दी सोहळा कालावधीत संस्थानने भक्तांच्या सुविधेसाठी विविध पायाभुत प्रकल्पांचे भुमिपूजन केलेले आहे. तसेच भविष्यातही प्रकल्पासाठी मोठया प्रमाणावर खर्च अपेक्षित आहे.

इ) शासकीय रुग्णालयांना शासनाचे अर्थ संकल्पातून तरतूद उपलब्ध होऊ शकते.

ई) प्राध्यापक व विभाग प्रमुख, क्ष- किरण विभाग श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांनी दि. २०.०७.२०१८ रोजी अधिष्ठाता, श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांना लिहीलेल्या पत्रात तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे.

ऊ) शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व हॉस्पीटल एकाच प्रकारच्या मशीनसाठी वेगवेगळया रकमेची मागणी करत असल्याचे दिसून येते.

श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धुळे यांना (3 Tesla) एमआरआय मशीन व विथ टर्न की बेसीकसाठी रक्कम रु. १४ कोटी मात्र अनुदान देणेचे प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.१०** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.११** **मंदिर व संस्थान परिसरात सापडलेल्या बिनधनी वस्तु /साहित्यांची तातडीने कार्यवाही करणेकरीता निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर, मंदिर परिसर व संस्थान परिसरात सापडलेल्या बिनधनी वस्तु (पर्स, मोबाईल, घडयाळे, सोने/चांदीची वस्तु व इतर) अगर रकमा कर्मचारी व साईभक्त संरक्षण विभागात जमा करतात. संरक्षण विभागामार्फत सदर वस्तुं संबंधीत साईभक्तास कळावी याकरीता अलौन्समेंट करण्यात येते. या अलौन्समेंटनंतर काही भक्त वस्तुंची ओळख पटवून वस्तु घेऊन जातात व काही वसतुचा तशाच विभागात पडून राहतात. साईभक्तांनी न नेलेल्या वस्तुंची विभागामार्फत रितसर नोंद घेऊन पोहोच पावती बनवून, जमाकर्त्यांना देण्यात येते. या वस्तुंची प्रत्येक महिना संपल्यानंतर अधिकृत दुकानदारांकडून संबंधीत वस्तुंची किंमत लावण्यात येते, तसेच सोन्या/चांदीच्या वस्तुंची संस्थानचे अधिकृत सराफाकडून वस्तुंचे वजन, टंच व तत्कालीन बाजारभावानुसार किंमत लावण्यात येते. या वस्तुंपैकी सोने/चांदीच्या वस्तुं मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने लेखाशाखेत जमा करण्यात येतात. इतर वस्तु/साहित्यांची देणगी काऊंटरवर पावती बनविण्यात येते व नंतर त्यांची लेखाशाखेमार्फत कापड विक्री काऊंटरला प्रसादरुपी विक्री करण्यात येते.

उपरोक्तप्रमाणे बिनधनी वस्तुंची प्रचलीत कार्यवाही करण्यात येत होती, मात्र माहे ऑक्टोबर २०१४ मध्ये बिनधनी वस्तु/रक्कम लेखाशाखेत जमा करणेसाठी टिपणी सादर केली असता, त्यावर तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी बिनधनी वस्तुंबाबत विल्हेवाट लावण्याचा कायद्यानुसार संस्थानला अधिकार आहे काय? कायदेशीर सल्ल्यासह सादर करावे असे निर्देश दिले होते. त्यानुसार इकडील विभागामार्फत कायदेशीर सल्ला घेऊन, मा. व्यवस्थान समितीचे दि. १८/०५/२०१५ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता:

'मंदिर, मंदिर परिसर तसेच संस्थान संलग्न परिसरात सापडलेल्या बिनधनी वस्तुंची विल्हेवाट लावणेबाबतची प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही ही इंडियन कॉन्ट्रॅक्ट ऍक्ट प्रमाणे योग्य असल्याने सध्या चालू आहे त्याच पध्दतीने सापडलेल्या बिनधनी वस्तुंची विल्हेवाट लावण्यास (लेखाशाखेकडे जमा करणेस) मान्यता असावी.'

वरील प्रस्तावावर समितीत चर्चा होऊन निर्णय क्र. ४८ पुढीलप्रमाणे झालेला आहे:

'मंदिर व मंदिर परिसरात सापडलेल्या बिनधनी वस्तुंची विल्हेवाट लावणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच (१) रोख रक्कम / सोने, चांदी, मौल्यवान व इतर बिनधनी वस्तु / साहित्य सापडल्यास त्या वस्तुंची माहिती त्वरीत मंदिर परिसरातील ध्वनीक्षेपन कक्षामार्फत प्रसारीत करणेत यावी. त्यानंतर वस्तु / साहित्य

घेण्यास आल्यास त्या वस्तु / साहित्याची संरक्षण अधिकारी यांनी योग्य पुराव्यानिशी पडताळणी करुन वस्तु / साहित्य परत कराव्या

(२) वरील नं. १ मधील नमूद कार्यवाहीनंतर शिल्लक असलेल्या वस्तु साहित्यांपैकी रोख रक्कम, सोने, चांदी व इतर मौल्यवान वस्तु ह्या लेखाशाखा विभागात लवकरात लवकर जमा कराव्यात.

(३) वरील नं. १ मधील नमूद कार्यवाहीनंतर शिल्लक असलेल्या वस्तु साहित्य यांची यादी वर्तमानपत्रामध्ये जाहीर करुन त्या वस्तुंची ओळख पटवून घेऊन जाव्यात, अन्यथा एक महिन्यानंतर त्यांची जाहीर लिलावाव्दारे विक्री करणेत येईल, असे प्रध्दि करणेत यावे.

(४) वर्तमानपत्रातील प्रसिध्दीपासून एक महिन्याचे कालावधीनंतर बिनधनी वस्तु / साहित्यांची जाहीर लिलावाव्दारे विक्री करणेत यावी व रोख रक्कम संस्थानखाती जमा करुन घेण्यात यावी.

याप्रमाणे सापडलेल्या बिनधनी वस्तु / साहित्य यांची विल्हेवाट लावणेकामी प्रतिमाह कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.'

विभागाचा अभिप्राय:- मा.व्यवस्थापनाचे वरील निर्णयानुसार बिनधनी वस्तु/साहित्यांची ज्यात मोबाईल, घडयाळे यांचे प्रमाण जास्त असते, त्यांची तातडीने कार्यवाही करतांना पुढीलप्रमाणे अडचणी येत आहेत :

(१) प्रत्येकी महिन्यातील वस्तुंची वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात येते. या जाहीरातीमध्ये वस्तु मालकांना १ महिन्याची मुदत देण्यात येते. त्यामुळे सदरील मोबाईल व घडयाळे संरक्षण कार्यालयात कमीत कमी २ महिने पडून राहतात. या वस्तु कार्यालयात पडून राहील्याने मोबाईलमधील बॅटरी खराब होते तसेच घडयाळेही बंद पडतात.

(२) या वस्तुंची किंमत जाहीरात देण्याच्या अगोदर लावली येते, त्यावेळेस काही मोबाईल किंवा घडयाळे चालू स्थितीत असतात, मात्र जाहीरात दिल्यानंतर १ महिन्यानंतर त्यांची देणगी पावती बनवितांना तेच मोबाईल व घडयाळे बंद स्थितीत आढळतात. त्यामुळे त्यांची लेखाशाखेतील देणगी काऊंटरवर पावती करतांना व कापडकोठी येथे प्रसादरुपी विक्री करतांना अडचणी येतात.

(३) कापड विक्री काऊंटरवर बंद मोबाईल व घडयाळे असल्यामुळे, त्यांची प्रसादरुपी खरेदीसाठी भक्त प्रतिसाद देत नाही. परिणामी कापड विक्री काऊंटरवर सदर वस्तु पडून राहतात.

(४) पर्स, मोबाईल व घडयाळे यांचे प्रमाण कमी असल्यामुळे त्यांची जाहीर लिलावाव्दारे विक्री करणे आर्थिकदृष्टया अडचणीचे होईल.

(५) दि. ०१/०५/२०१८ ते दि. ३०/०६/२०१८ या कालावधीतील बिनधनी वस्तुंची जाहीरात देणेकामी येणारा खर्च तथा वस्तुंची लावलेली किंमत याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता आपले माहितीसाठी देत आहोत :

| दिनांक | वर्तमानपत्र | रक्कम रुपये | तपशील | देणगी पा.नं. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०५/१०/२०१८ | सार्वमत, अहमदनगर | १,४२८/- | मोबाईल | २४७०३ | ०४/१२/२०१८ | ३,५००/- |
| | पुण्यनगरी, नागपूर | २,५२०/- | | २४७०४ | ०४/१२/२०१८ | ४,५००/- |
| | दिव्यमराठी, नाशिक | २,०१६/- | | २४७०५ | ०४/१२/२०१८ | ५,६००/- |
| | पुढारी, पुणे | ३,९४८/- | घडयाळ | २४७०६ | ०४/१२/२०१८ | २,३००/- |
| | दै. लोकसत्ता, मुंबई | ३,३६०/- | | २४७०७ | ०४/१२/२०१८ | २,२००/- |
| | | | | २४७०८ | ०४/१२/२०१८ | ३,०००/- |
| | | | | २४७०९ | ०४/१२/२०१८ | २,४००/- |
| | | | | २४७१० | ०४/१२/२०१८ | १,४५०/- |
| | **एकूण:-** | १३,२७२/- | | | **एकूण:-** | २४,९५०/- |

वरील रकमेचे अवलोकन केले असता जाहीरातीसाठी १३,२७२/- मात्रचा खर्च आला असून, मोबाईल, घडयाळे यांचेपासून २४,९५०/- मात्रची रक्कम प्राप्त झाली आहे. म्हणजेच रुपये ११,६७८/- मात्रची रक्कम संस्थानला प्राप्त झाली आहे. विशेष म्हणजे मे २०१५ मध्ये झालेल्या या निर्णयापासून आजपावेतो जाहीरात देवूनही कोणत्याही वस्तु/साहित्य मालकांनी संस्थानशी संपर्क केलेला नाही किंबहुना वस्तु घेऊन गेलेले नाहीत. या निर्णयानुसार संस्थानचा वेळ, मनुष्यबळ, कामाची तातडीची निकट व आर्थिक बाबींचे नुकसान होत आहे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८/०२/२०१५ रोजीचे बैठकीतील निर्णय क्र. ४८ मध्ये नमूद '(३) वरील नं. १ मधील नमूद कार्यवाहीनंतर शिल्लक राहीलेल्या इतर वस्तु / साहित्य यांची यादी वर्तमानपत्रामध्ये जाहीर करुन त्या वस्तुंची ओळख पटवून घेऊन जाव्यात, अन्यथा एक महिन्यानंतर त्यांची जाहीर लिलावाव्दारे विक्री करणेत येईल, असे प्रसिध्द करणेत यावे. (४)वर्तमानपत्रातील प्रसिध्दीपासून एक महिन्याचे कालावधीनंतर बिनधनी वस्तु / साहित्यांची जाहीर लिलावाव्दारे विक्री करणेत यावी' ही अट

शिथील करण्यात यावी असे मत आहे. जेणेकरुन बिनधनीच्या वस्तुंची प्रत्येक महिन्यात तातडीने कार्यवाही करणे सोईचे होईल. यासाठी प्रस्तृतकामी नविन प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीत सादर करुन, त्यास मान्यता घ्यावी लागणार आहे.

प्रस्ताव:- संरक्षण विभागाकडील बिनधनी वस्तु / साहित्यांची तातडीने पुढील कार्यवाही करतांना मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८/०२/२०१५ रोजीचे बैठकीतील निर्णय क्र. ४८ मध्ये नमूद बाबींवर पुढीलप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे :

(१) रोख रक्कम / सोने, चांदी, मौल्यवान व इतर बिनधनी वस्तु / साहित्य सापडल्यास त्या वस्तुंची माहिती त्वरीत मंदिर परिसरातील ध्वनीक्षेपन कक्षामार्फत प्रसारीत करणेत यावी. त्यानंतर वस्तु / साहित्य घेण्यास आल्यास त्या वस्तु / साहित्याची संरक्षण अधिकारी यांनी योग्य पुराव्यानिशी पडताळणी करुन वस्तु / साहित्य संबंधितांना परत करावे.

(२) वरील नं. १ मधील नमूद कार्यवाहीनंतर शिल्लक असलेल्या वस्तु साहित्यांपैकी रोख रक्कम, सोने, चांदी व इतर मौल्यवान वस्तु ह्या लेखाशाखा विभागात दरमहा लवकरात लवकर विहीत पध्दतीने व मान्यतेने जमा कराव्यात.

(३) बिनधनी वस्तु / साहित्य यांची प्रत्येक महिन्यात किंमत लावून लेखाशाखेअंतर्गत पुढील कार्यवाहीसाठी देणगी काऊंटरवर देणगी पावती बनविण्यात यावी.

तरी उपरोक्तप्रमाणे बिनधनी वस्तु / साहित्य यांची तातडीने कार्यवाही होणेसाठी अ.नं. १ ते ३ अन्वये संरक्षण विभागामार्फत कार्यवाही करणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व संस्थान परिसरात सापडलेल्या बिनधनी वस्तु /साहित्यांची उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे पुर्वीच्या प्रचलित पध्दतीने कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच कापडकोठी विभागाकडे विक्रीसाठी पडून असलेल्या बिनधनी वस्तु /साहित्यांच्या किंमती कमी करुन विक्री करण्यात याव्यात, असे ठरले.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.१२** **मंदिरातून निघणारे हार व फुलांचे निर्माल्याबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- अधिनियम २००४ मध्ये ४ (२) (ग) समितीच्या अधिका-याचे अधिकार व कर्तव्य याबाबत असुन त्या प्रमाणे नाशवंत अर्पण वस्तुंची लिलावादवारे किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचे व त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे अशी तरतुद प्रस्तुत कलमा मध्ये नमुद केलेली आहे.

प्रस्तावना:- उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, आवक नं.८३२५ दि.०१/०७/२०१७ रोजीच्या पत्रानुसार इकोनिर्मिती इन्फ्रस्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस व जनसेवा फाऊंडेशन बचत गट यांनी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य मिळणेबाबत एकत्रीत प्रस्ताव सादर केलेला होता. त्यानुसार दि.२५/०७/२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.५३० अन्वये, श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्यापासुन सुगंधी द्रव्ये, अगरबत्ती तयार करणेकामी चर्चा करणेसाठी जनसेवा फाऊंडेशन या बचत गटाचे प्रतिनीधी उपस्थित होते. सभेसमोर त्यांनी इकोनिर्मिती इन्फ्रस्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस यांचेबरोबर संयुक्तपणे काम करणार असल्याचे सांगीतले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, बचत गटामार्फत साई आगरबत्ती तयार करुन घेणेसाठी श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य जनसेवा फाऊंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रस्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस यांचे संयुक्त प्रकल्पास 3 वर्षासाठी विनामुल्य देण्यात यावे. त्या बदल्यात जनसेवा फाऊंडेशन बचत गट हे सदरहु अगरबत्ती विक्रीतुन मिळणाऱ्या प्रतिमाह उत्पन्नाच्या १०% रक्कम संस्थानला वर्ग करतील असे ठरले होते. त्यानुसार मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य उचलणेकामी जा.न. एसएसएसटी/वशी - बगीचा/३६७९/२०१७ दि.०९/१०/२०१७ रोजीचे पत्रानुसार कार्यादेश देऊन त्यांचेकडून करारनामा करुन घेणेत आलेला आहे. त्यानुसार त्यांनी दि.०९/११/२०१७ पासुन त्यांनी मंदिरातील हार व फुलांचे निर्माल्य उचलणेस सुरुवात केलेली आहे. त्यापासुन निघणारे उत्पन्नापैकी त्यांनी १० % या खालीलप्रमाणे रक्कम जमा केलेली असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | माहे | जमा केलेली रक्कम |
|---|---|---|
| १. | माहे- मार्च ते एप्रिल – २०१८ | ५०,३४९/- |
| २. | माहे- मे – २०१८ | ८०,५२६/- |
| ३. | माहे- जुन ते ऑक्टोबर- २०१८ | ४,०५,६८१/- |
| ४. | नोव्हेंबर – २०१८ | ८६४४२/- |

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान - धोरणात्मक व आर्थीक विषय आहे.

मागणी:- जनसेवा फाउंडेशन यांचे आवक नं. ८५२५ दि. ०१/०८/२०१८ रोजीचे पत्रान्वये, १०/१०/२०१७ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था , शिर्डी तसेच जनसेवा फाउंडेशन ,लोणी व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस यांचेत झालेले करारातुन श्री रोहीत अविनाश सदाफळ, इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस यांनी सदर प्रकल्पातुन स्वेच्छेने माघार घेतलेली असलेमुळे यापुढे जनसेवा फाउंडेशन,लोणी यांचेकडे सदर प्रकल्प सहजतेने व खंडीत न करता १०/१०/२०१७ रोजीचे करारनाम्यातील अटी व शर्तीस अनुसरुन पुढील कार्यवाहीसाठी सुपुर्द करता येईल. असे पत्रान्वये कळविले आहे. तसेच Ministry of corportation affairs यांचे पत्रानुसार श्री रोहीत सदाफळ हे सदर प्रकल्पाचे संचालक असलेचे दिसुन येत आहे. तसेच सदरचा प्रकल्प हा अगोदर पिंप्री निर्मळ येथे कार्यान्वीत करणेत आलेला होता, परंतु जनसेवा फाऊंडेशन, लोणी या प्रकल्पाचे स्थलांतर करुन प्रवरा नगर येथे कार्यान्वीत केलेला आहे.

आवक नं. १५२८३ दि. ०२/११/२०१८इकोनिर्मिती इन्फास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेसचे संचालक श्री. रोहीत अविनाश सदाफळ यांनी सदर पदाचा राजीनामा दिलेला असुन त्यांनी या प्रकल्पातुन बाहेर पडल्याचे उपरोक्त पत्रान्वये कळविले आहे.

तसेच इकोनिर्मिती इनफ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेसचे श्री. रविंद्र मनोहर देसाई यांनी उपरोक्त पत्रान्वये रोहीत सदाफळ हे कंपनी मध्ये पार्टनर असुन त्यांनी त्यांचा संचालक पदाचा राजीनामा दिलेला आहे. म्हणेज इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस कंपनीने राजीनामा दिलेला आहे असे होत नाही. निर्माल्या पासुन तयार होणा-या अगरबत्ती उत्पादनात आम्ही सहभागी/भागीदार आहे. परंतू जनसेवा फाउंऊडेशन आम्हाला कंपनी मध्ये येण्यास मनाई करत असल्याबाबत असल्याचे कळविले आहे.

मंदीरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य जनसेवा फाउंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हिसेस यांचे संयुक्त प्रकल्पास देणेस मान्यता मिळणेकामी जा.क्र.एसएसएसटी/वशी–बगीचा २७९१/२०१७ दि. २३/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये विधी व न्याय विभाग मंत्रालय यांची परवानगी घेणेकामी पत्र पाठविणेत आलेले होते. त्यानुसार क्र.सासंवि-१०१७/१४७८/प्र .क्र.१६०/का.१६ दि. १८/०९/२०१८ रोजीचे पत्रान्वये विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १४ (२) (ग)मधील तरतुदीनुसार नाशवंत अर्पणवस्तुंची लिलावाद्वारे किंवा अन्यप्रकारे विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्तव्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी , श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना असुन सदर प्रस्तावाला शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नसलेबाबत कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार निर्माल्याचे विल्हेवाट लावण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना आहेत परंतु मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.५३० नुसार इकोनिर्मिती व जनसेवा फाउंडेशन व संस्थान यांचा करारनामा झालेला असलेमुळे आताच्या उपरोक्त वस्तुस्थितीनुसार निर्माल्यापासुन अगरबत्ती बनविणेचे पूर्ण काम जनसेवा फाउंडेशन यांना देऊन त्यांच्याशी करारनामा करणेबाबत सदरचा विषय मान्यतेसाठी निर्णयार्थ सविनय सादर .

**निर्णय क्र.१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी इकोनिर्मिती इन्फ्रस्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस व जनसेवा फाऊंडेशन बचत गट यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

**विषय नं.१३** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये नोव्हेंबर-२०१८ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८४,९५,१३७/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे नोव्हेंबर२०१८ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १३,४०४

व १,०१८ आयपीडी रुग्णांपैकी २,८२८ ओपीडी व ५५७ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.७९,३२,८३७/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३६३ रुग्णाना रक्कम रु.५,६२,३००/- इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १३१ | १५,३१,४५२/- | - | १५,३१,४५२/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८६ | २७,२३,४४८/- | १०,९३,९४५/- | १६,२९,५०३/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०५ | ११,३३०/- | १,३७५/- | ९,९५५/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ५३२ | ३८,३७,९८६/- | १७,४०,९३४/- | २०,९७,०५२/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २४९ | १,१८,७८,१०४/- | १,०४,२३,११९/- | १४,५४,९८५/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,२८२ | १२,०९,८९०/- | - | १२,०९,८९०/- |
| | **एकुण** | **३,३८५** | **२,११,९२,२१०/-** | **१,३२,५९,३७३/-** | **७९,३२,८३७/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४१ | ५३,२००/- | - | ५३,२००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | १७ | २६,२००/- | - | २६,२००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ३९ | ४,७००/- | - | ४,७००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | ११२ | २,८८,८००/- | - | २,८८,८००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ७ | ७,८००/- | - | ७,८००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ३ | ४,२००/- | - | ४,२००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १४४ | १,७७,४००/- | - | १,७७,४००/- |
| | **एकुण** | ३६३ | ५,६२,३००/- | - | ५,६२,३००/- |
| | **एकुण अ+ब** | **३,७४८** | **२,१७,५४,५१०/-** | **१,३२,५९,३७३/-** | **८४,९५,१३७/-** |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **नोव्हेंबर-२०१८** मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम **रु.८४,९५,१३७/-** ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.१३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये नोव्हेंबर-२०१८ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८४,९५,१३७/- मात्रचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.१४ **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ०१ जानेवारी,२०१८ ते दि.३१ डिसेंबर,२०१८ या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांचा नेमणूक कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्यांना पुन्हा कंत्राटी पध्दतीने फेरनेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव**- अधिनियम २००४ मधील तरतुद- कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमन्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही.

आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र.३ "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

मा व्यवस्थापन समिती ठराव क्र-

१) मा व्यवस्थापन समिती दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १६०. "श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात रूग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीसाठी वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणूका करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली".

२) मा व्यवस्थापन समिती दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६०३. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान रूग्णालयातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात भरती करणेकामी दि. २०/०६/२०१७ रोजी घेणेत आलेल्या मुलाखतीचे इतिवृत्ताचे अवलोकन करण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली व त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली. तसेच ज्या पदांवर उमेदवार उपलब्ध झालेले नाही अथवा ज्या पदावर नेमणूक आदेश देऊनही उमेदवार हजर झालेले नाहीत अथवा आकृतीबंधास अनुसरून, वैद्यकीय अधिका-यांच्या इतरही रिक्त जागा भरणेची आवश्यकता आहे, अशा पदांसाठी फेरजाहिरात देण्यात यावी. तसेच श्री साईनाथ रूग्णालयातील पदे प्राधान्याने भरावीत, असे ठरले.

३) मा व्यवस्थापन समिती दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १२७. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित वैद्यकीय अधिका-यांना त्यांचा नेमणूक आदेश संपुष्टात आलेनंतर ०७ दिवस सर्विस ब्रेक देऊन दि. १३/०८/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने पुर्वीच्याच नेमणूक आदेशातील अटी शर्ती व वेतनावर नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.

४) मा व्यवस्थापन समिती दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३४३. श्री साईबाबा रूग्णालयातील कार्डीयाक विभागातील कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. याकरीता तज्ञ वैद्यकीय अधिकारी आवश्यक आहे. डॉ संदिप नारायणराव देवरे, इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट यांनी दि. ०७/०४/२०१८ रोजीचे अर्जान्वये राजीनामा दिला आहे. डॉ देवरे यांनी राजीनामा मागे घेणेबाबत अर्ज दिल्यास त्यांचा राजीनामा रद्द करून त्यांना एकत्रित मानधन रू. ६५,९११/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा. तसेच डॉ मनोहर विश्वासराव शिंदे, इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट व डॉ संदिप नारायणराव देवरे, इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट यांना आठवड्यातील ३-३ दिवस ओ.पी.डी. विभागुन देण्यात यावी, असे ठरले.

५) मा व्यवस्थापन समिती दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४३७. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील दि. २९/०६/२०१७ रोजी व दि. १६/११/२०१७ रोजी नेमणूका दिलेल्या वैद्यकीय अधिका-यांना त्यांचा नेमणूक कालावधी संपुष्टात येत असलेचे लगतचे दिनांकापासून पुन्हा ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली.

६) मा व्यवस्थापन समिती दि. ३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४४०. प्रस्तुत प्रकरणी दि. २७/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये शासनाने श्री साईबाबा रूग्णालयातील डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त प्रोत्साहन भत्ता (Inecentives) मंजूर केलेला असल्याने डॉ जाधवर यांची मागणी मान्य करता येणार नाही. डॉ जाधवर यांनी दि. ०३/०७/२०१८ अखेर पासून राजीनामा मंजुर करणेबाबत अर्ज दिलेला आहे. परंतु डॉ जाधवर यांचे कामकाज समाधानकारक असुन त्यांचे फिजिशियन या पदाचे सेवेची रूग्णालयास आवश्यकता असल्याने प्रशासनाने डॉ जाधवर यांचेशी चर्चा करून, राजीनामा मागे घेणेबाबत विनंती करावी, त्यांनी राजीनामा मागे घेतल्यास पुर्वी प्रमाणेच मासिक मानधन रू.६७,६००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता यानुसार पुढील ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले. सध्या साईबाबा हॉस्पिटलकरीता ०३ व साईनाथ रूग्णालयाकरीता ०२ अशी एकुण ५ फिजिशियनची पदे रिक्त आहेत. दोन्ही रूग्णालयांना फिजिशियन डॉक्टरांची आवश्यकता असल्याने तातडीने फिजिशियनची पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन भरती प्रक्रिया राबविणेत

यावी, फिजिशियन या पदाची जाहिरात देऊनही डॉक्टर्स उपलब्ध न झाल्यास वाढीव प्रोत्साहन भत्ता (Inecentives) देणेबाबत प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा, असे ठरले.

७) मा व्यवस्थापन समिती दि. ३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४३८. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये क्लिनीकल असिस्टंट (कार्डीओलॉजी) व ज्युनिअर फिजिओथेरपिस्ट पदावर बाह्ययंत्रणेमार्फत कुशल कर्मचा-यांची सेवा अनुक्रमे रक्कम रू. ६५,९००/- व रक्कम रू.१५,४००/- मात्र मासिक एकत्रित वेतनावर दि. १५/०६/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी घेण्यास मान्यता देण्यात आली.

८) मा व्यवस्थापन समिती दि. ०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५५३. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ किशोर उध्दवराव गोडगे यांना न्युरोसर्जन पदावर ॲडहॉक बेसिस पध्दतीने दि. २२/०९/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी व डॉ मनोहर विश्वासराव शिंदे यांना इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर कंत्राटी पध्दतीने दि. ०२/१०/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देण्यात यावी, तसेच त्यांना अनुक्रमे मासिक एकत्रित रू. ६९,०००/- मात्र मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना- श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये मा व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार वेळोवेळी आवश्यक वैद्यकीय अधिकारी व फिजिओथेरपिस्ट (ठेकेदारामार्फत) यांच्या ११ महिने कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात खालीलप्रमाणे नेमणूका केलेल्या आहेत.

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव | पदाचे नाव | नेमणूक दिनांक | ११ महिने नेमणूक कालावधी संपुष्ठात येत असल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१ | डॉ पोर्णीमा रामराव शेळके | वैद्यकीय अधिकारी (दंतरोग) श्री साईबाबा हॉस्पिटल | १३/०२/२०१८ | १२/०१/२०१९ |
| ०२ | डॉ उज्वला भाऊसाहेब काळे | मेडीकल ऑफीसर (दंत तज्ञ) श्री साईनाथ रूग्णालय | ०५/०४/२०१८ | ०४/०३/२०१९ |
| ०३ | डॉ अमोल जालिंदर भोर | कॅज्युअल्टी मेडीकल ऑफीसर श्री साईनाथ रूग्णालय | ०५/०४/२०१८ | ०४/०३/२०१९ |
| ०४ | डॉ स्वप्नाली राम चव्हाण | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | ०५/०४/२०१८ | ०४/०३/२०१९ |
| ०५ | डॉ विशाल धनाजी पटेल | मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन) श्री साईनाथ रूग्णालय | ०५/०४/२०१८ | ०४/०३/२०१९ |
| ०६ | डॉ संदीप नारायणराव देवरे | ह्दयविकार तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | ०२/०५/२०१८ | ०१/०४/२०१९ |
| ०७ | डॉ नितीन दशरथ ठाकरे | ह्दयविकार शस्त्रक्रिया तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| ०८ | डॉ विजय मुरलिधर थोरात | शल्य चिकित्सक श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| ०९ | डॉ विद्या मनोहर बोराडे | शल्य चिकित्सक श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| १० | डॉ प्रशांत दिलीप काळे | आस्थीरोग शस्त्रक्रिया तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| ११ | डॉ शोभना तुकाराम कोल्हे | मेडीकल ऑफीसर (ईएनटी सर्जरी) श्री साईनाथ रूग्णालय | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| १२ | डॉ प्राजक्ता मुरलीधर खर्चे | मेडीकल ऑफीसर (नेत्रतज्ञ) श्री साईनाथ रूग्णालय | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव | पदाचे नाव | नेमणूक दिनांक | ११ महिने नेमणूक कालावधी संपुष्ठात येत असल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| १३ | डॉ राजबाला रविंद्र निकम | कनिष्ठ क्ष-किरण शास्त्रज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| १४ | डॉ अभिजीत माणिकराव डिकले | कनिष्ठ क्ष-किरण शास्त्रज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| १५ | डॉ रोहित राजेंद्र सप्रे | ज्युनियर मायक्रोबायोलॉजीस्ट श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| १६ | डॉ अंजली पदमाकर सोनवणे | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| १७ | डॉ अजय नामदेव शिंदे | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| १८ | डॉ स्वाधीन किसनराव गाडेकर | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| १९ | डॉ राजासिंग राजिंदरसिंग राजिंदरकौर अरोरा | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| २० | डॉ राहुल दत्तात्रय डोंगरे | कनिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ श्री साईनाथ रूग्णालय | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| २१ | डॉ जितेश मधुकर ठाकरे | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईनाथ रूग्णालय | २९/०५/२०१८ | २८/०४/२०१९ |
| २२ | विश्वजीत विश्वनाथ गायकवाड ठेकेदारामार्फत | फिजिओथेरपिस्ट (बाह्ययंत्रणेमार्फत) श्री साईबाबा हॉस्पिटल | १५/०६/२०१८ | १४/०५/२०१९ |
| २३ | डॉ अविनाश लक्ष्मणराव जाधवर | फिजिशियन श्री साईबाबा हॉस्पिटल | १२/०७/२०१८ | ११/०६/२०१९ |
| २४ | डॉ शिरीष शशीकांत शेळके | कान, नाक, घसा तज्ञ श्री साईनाथ रूग्णालय | १०/०९/२०१८ | ०९/०८/२०१९ |
| २५ | डॉ अभिषेक जयराम खोडे | मेडीकल ऑफिसर (होमिओपॅथी) श्री साईनाथ रूग्णालय | १०/०९/२०१८ | ०९/०८/२०१९ |
| २६ | डॉ देविदास लक्ष्मण लव्हाटे | रेसिडेंट मेडीकल ऑफिसर श्री साईनाथ रूग्णालय | १०/०९/२०१८ | ०९/०८/२०१९ |
| २७ | डॉ श्रीकांत मधुकर नागरे | वरिष्ठ क्ष-किरण शस्त्रज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०९/२०१८ | ०९/०८/२०१९ |
| २८ | डॉ अक्षय विजय जोशी | निवासी वैद्यकीय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पिटल | १०/०९/२०१८ | ०९/०८/२०१९ |
| २९ | डॉ तृप्ती बाळासाहेब भिसे | मेडीकल ऑफीसर (सोनोलॉजिस्ट) श्री साईनाथ रूग्णालय | १०/०९/२०१८ | ०९/०८/२०१९ |
| ३० | डॉ किशोर उध्दवराव गोडगे | मेंदूशल्य विशारद श्री साईबाबा हॉस्पिटल | २२/०९/२०१८ | २१/०८/२०१९ |
| ३१ | डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर | आस्थीरोग शस्त्रक्रिया तज्ञ श्री साईबाबा हॉस्पिटल | १६/१०/२०१८ | १५/०९/२०१९ |
| ३२ | डॉ अमित दिपक नाईकवाडे | मेडीकल ऑफीसर (आर्थोपेडीक सर्जन) श्री साईनाथ रूग्णालय | १६/१०/२०१८ | १५/०९/२०१९ |

| अ नं | वैद्यकीय अधिका-यांचे नाव | पदाचे नाव | नेमणूक दिनांक | ११ महिने नेमणूक कालावधी संपुष्ठात येत असल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ३३ | डॉ गजानन हुकूम पाटील | मेडीकल ऑफीसर (जनरल सर्जरी) श्री साईनाथ रूग्णालय | २६/१०/२०१८ | २५/०९/२०१९ |

उपरोक्त वैद्यकीय अधिकारी व फिजिओथेरपिस्ट यांचा नेमणूक कालावधी त्यांचे नावासमोर स्तंभ क्र ०५ मध्ये दर्शविलेल्या तारखेस संपुष्टात येत आहे. एकाच दिवशी जास्त डॉक्टरांची नेमणूक संपुष्टात येत असल्यास टप्प्याटप्प्याने काही डॉक्टरांना ११ महिने पुर्ण होण्यापुर्वीपासून ४ दिवसाचा Break देऊन नेमणूका देता येतील असे मत आहे.

उपरोक्त वैद्यकीय अधिकारी व एक फिजिओथेरपिस्ट (ठेकेदारामार्फत) यांना त्यांचे नेमणूक संपुष्टात येत असल्याचे लगतचे दिनांकापासून ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सध्या देण्यात येत असलेल्या एकत्रित मानधनावर वैद्यकीय संचालक / वैद्यकीय अधिक्षीका यांचे समाधानकारक कामकाजाचे अहवालानुसार तसेच संबंधीत वैद्यकीय अधिका-यांकडून पुन्हा नेमणूक मिळणेचे मागणीपत्रास अधिन राहुन टप्प्याटप्प्याने काही डॉक्टरांना ११ महिने पुर्ण होण्यापुर्वीपासून ४ दिवसाचा Break देऊन नेमणूका देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.१४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद वैद्यकीय अधिकारी यांना कंत्राटी पध्दतीने व एक फिजिओथेरपिस्ट यांना ठेकेदारामार्फत त्यांचे नेमणूक संपुष्टात येत असल्याचे लगतचे दिनांकापासून ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सध्या देण्यात येत असलेल्या एकत्रित मानधनावर वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका यांचे समाधानकारक कामकाजाचे अहवालानुसार तसेच संबंधीत वैद्यकीय अधिका-यांकडून पुन्हा नेमणूक मिळणेचे मागणीपत्रास अधिन राहुन टप्प्याटप्प्याने ११ महिने पुर्ण होण्यापुर्वीपासून चार दिवसाचा ब्रेक देऊन पुर्वीच्या नेमणूक आदेशाप्रमाणे नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.१५ **श्री साईनाथ रुग्णालयाकडील जुने सोनोग्राफी मशिन निर्लेखन (Scrap) करणेबाबत.**

प्रस्ताव- संदर्भीय पत्रान्वये ग्रामीण रुग्णालय, राहाता यांनी नादुरुस्त व जुन्या निकामी झालेल्या सोनोग्राफी मशिन निर्लेखन करण्यासाठी ज्या केद्रांना आपल्या मशिन स्क्रॅप करावयाच्या आहेत त्यांनी दि. २६.१०.२०१८ रोजी होणा-या बैठकीस हजर राहणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार, रुग्णालयाचे वतीने दोन प्रतिनीधी सदर बैठकीस हजर होते. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार नादुरुस्त व जुन्या निकामी झालेल्या सोनोग्राफी मशिन निर्लेखन करण्यासंदर्भात मार्गदर्शक सुचना तसेच कार्यपध्दती कळविण्यात आलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाकडे असलेल्या खालील दोन सोनोग्राफी मशीन्स सततच्या वापरामुळे नादुरुस्त, जुन्या व निकामी तसेच कालबाह्य झालेल्या असुन त्या सध्या बंद अवस्थेत आहेत. तसेच त्यांचा पुनर्वापर शक्य नसल्याने त्या निर्लेखन (Scrap) करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्रं. | ॲसेट कोड | तपशील | नग | दिनांक | किंमत | घसारा किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | MCH/0182 | SYMPHONY/14+MF1+B-COLOUR (Make - L&T Medical) 1. Probe No. 30342 2. 12001 (Sr.No.03-76-390-0152-92) Acess:- | 1 | 11.03.1999 | 4,80,501.00 | 4,025.78 |
| | MCH/0183 | Ncine Kit (Part of Sonography Machine) | 1 | 11.03.1999 | 37,225.00 | 311.88 |
| | MCH/0184 | Clearity Sector Switch Box (Part of Sonography Machine) | 1 | 11.03.1999 | 36,969.00 | 309.74 |
| | MCH/0185 | Transducer IV/7S.N. (3-38-390-002-88) (Part of Sonography Machine) | 1 | 11.03.1999 | 1,45,263.00 | 1217.06 |
| | | | | | घसारा किंमत :- | 5,864.46 |
| 2. | MCH/0477 | ULTRA SOUND SCANNER SYSTEM 1. Logic C2 Console India -01 Nos. (Sr.No.57159WS-6) 2. 4C-RC-Probe-1 Nos. (Sr.No.90808058) 3. Power Cord India Class 4. E-7-RC-Probe (Sr.No.TE-014081201120) | 1 | 30.12.2009 | 6,00,000.00 | 52,559.28 |

उपरोक्त मशीन निर्लेखन करणेकामी मशिनचा मेक, मॉडेल, प्रोब इ. माहितीसह अर्ज जिल्हा समुचित प्राधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अर्जासोबत प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक असून समितीतील समुचित प्राधिका-यांनी अर्जातील नमूद माहिती आणि पीसीपीएनडीटी नियम १९९६ च्या नियम ४ (१) व ८ (१) तसेच ६ (२) (५) व ८ (२) नुसार "ए" व "ब" फॉममधील माहिती तपासून पाहील्यानंतर सदर समिती सोनोग्राफी मशीन निर्लेखन करण्याचा निर्णय देणार आहे. व निर्लेखन करावयाचा मशीनचा खर्च संबंधित केंद्रधारक किंवा मशीनधारक यांनी करावयाचा आहे.

तरी, उपरोक्त दोन्ही सोनोग्राफी मशिन्स (ॲसेसरीज सह) सततच्या वापरामुळे निकामी तसेच कालबाह्य झालेले असून ते बंद अवस्थेत आहेत व त्यांची घसारा वजा जाता किंमत अत्यंत कमी आहे. तसा अभिप्राय रुग्णालयाचे बायोमेडीकल विभागाने सादर केलेला आहे. तसेच, सदर मशिन्स पुन्हा वापरात आणता येणार नसल्याने ते शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे निर्लेखन (Scrap) करण्यास व त्यांनतर श्री साईनाथ रुग्णालयाच्या डेडस्टॉक मधूनही कमी करणे आवश्यक आहे. तरी मा. व्यवस्थान समितीचे मान्यतेने सदर विषयाची शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे निर्लेखन (Scrap) कार्यवाही करणेस सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकडील जुने सोनोग्राफी मशिन सततच्या वापरामुळे निकामी तसेच कालबाह्य झालेले असून बंद अवस्थेत असल्याने ते शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे निर्लेखन (Scrap) करण्यास व त्यांनतर श्री साईनाथ रुग्णालयाच्या डेडस्टॉक मधून कमी करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **शासन निर्णय व परिपत्रक वाचन.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजा संबंधीत शासन निर्णय, परिपत्रके व इतर पत्र प्राप्त होतात. सदर पत्रांची एकत्रित रित्या मागासवर्ग कक्षाकडे नोंद घेऊन सदर पत्रावर उचित कार्यवाहीसाठी संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येते. सदर शासन पत्रावर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्यास वरिष्ठांकडे सादर करण्यात येतो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ चे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१७, निर्णय क्र.३४६ "संस्थानचे कामकाजासंबंधी शासनाचे निर्णय,परिपत्रके वेळोवेळी समितीचे बैठकीत सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत देण्यात यावी व सदर शासन निर्णय, परिपत्रके यांचे वाचन असा विषय अजेंडयामध्ये समाविष्ट करण्यात यावा."असा झालेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.१४/१२/२०१८ ते दि.०५/०१/२०१९ अखेर या कालावधीत महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात खालीलप्रमाणे प्राप्त झालेली पत्रे सोबत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | शासन पत्र क्र. व दिनांक. | प्राप्त दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ०१ | शासन निर्णय क्र.सासंवि-२०१४/६११/ प्र.क्र.८८/ का.१६ विधी व न्याय विभाग दि.१३/१२/२०१८ (शासन शुध्दीपत्रक) | १५/१२/२०१८ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून निळवंडे धरणाच्या विकासासाठी रु.५०० कोटी इतका निधी उसनवार तत्वावर (बिनव्याजी परत करण्याच्या बोलीवर) जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना देण्यासाठी एक विशेष बाब म्हणून देण्यास मान्यता देण्याबाबत |
| ०२ | क्र.संकिर्ण-२०१६/१७६५/प्र.क्र.२०४/का. १६, विधी व न्याय दि.१३/१२/२०१८ | २४/१२/२०१८ | केंद्र शासनामार्फत चलनातून बाद करणेत आलेल्या परंतू संस्थान व्यवस्थापनाकडे जमा होत असलेल्या रु.१०००/- व रु.५००/- च्या जुन्या चलनी नोटांबाबत |
| ०३ | शासन निर्णय क्र.सासंवि-२०१५/१००७/ प्र.क्र.१७७/ का.१६ विधी व न्याय विभाग दि.२१/१२/२०१८ | २४/१२/२०१८ | वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणीपुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता.राहाता, जि.अहमदनगर टप्पा – १ चे पात्र निविदाधारकास कार्यादेश देणेस मंजूरी मिळणेबाबत |
| ०४ | क्र.संकिर्ण-१११८/प्र.क्र.४१७/१६-अ, सामान्य प्रशासन विभाग दि.२८/१२/ १८ | २९/१२/२०१८ | विविध पदभरतीत समांतर आरक्षणाची पदे विहीत आरक्षणाप्रमाणे निश्चित करणेबाबत |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/ प्र.क्र.२०/का.१६ विधी व न्याय विभाग दि.२८/१२/२०१८ | ३१/१२/२०१८ | राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यंत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविण्यासाठी श्री साईबाबा संस्थान मार्फत महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांना रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्याच्या उपक्रमासाठी निधी मंजूर करणेबाबत. |
| ०६ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१७०२/ प्र.क्र.१९४/का.१६ विधी व न्याय विभाग दि.०३/०१/२०१९ | ०४/०१/२०१९ | श्री भवानी माता सेवा समिती संचलित मॉं भवानी हॉस्पिटल या रुग्णालयाला Equipments for Eye, Radiology, Cardiology Department साठी श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकडून रक्कम रु.२,३५,००,०००/- इतके अर्थसहाय्य देण्याबाबत |
| ०७ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८४४/ प्र.क्र.२०१/का.१६ विधी व न्याय विभाग दि.०३/०१/२०१९ | ०४/०१/२०१९ | मौजे शिर्डी येथील श्री पंडीतराव शेळके यांची जमीन सर्वे नं. २०३/२ पैकी ०.६० आर व श्रीमती नलिनी शेळके यांची सर्वे नं. २०३/१ पैकी ०.६० आर श्री साईबाबा संस्थानने कायमस्वरुपी खरेदी केल्यामुळे उर्वरित २०% रक्कम अदा करण्यास मान्यता देण्याबाबत |

सदर पत्रे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत वाचन करणेकामी द्यावयाची असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

निर्णय क्र.१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त शासन निर्णय व परिपत्रक यांचे वाचन करुन त्यांची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- मागासवर्ग कक्ष)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२ **बायोडिग्रेडेबल पेपरचे पेपर कप खरेदी करणे व त्यासाठी येणारे खर्चाची माहिती मा. व्यवस्थापन समितीचे सभेत अवलोकनार्थ व माहितीसाठी सादर करणे तसेच नवीन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत गरजेनुसार पेपर कप खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी यांनी पेपर कप पुरविणेस असमर्थतता दर्शविल्यामुळे तसेच शासनाचे पर्यावरण विभागाचे दि.२३ मार्च २०१८ व दि.३० जुन २०१८ चे अधिसुचनान्वये प्लॅस्टिक वापरावर नियमन केल्यामुळे व सध्याचे पेपर कपचे पेपरमध्ये प्लॅस्टिकचा थर असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३.१२.२०१८ चे सभेमध्ये याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये कॅन्टीन सुविधेसाठी विविध पर्याय सुचविले होते. याबाबत खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्रं.७५९- यावर सविस्तर चर्चा होऊन मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी यांनी पेपर कप पुरवठा करणेस असमर्थता दर्शविल्यामुळे माहे डिसेंबर-२०१८ करीता ३०,००,००० नग पेपर कप ०.३६ पैसे दराने मे.पार्थ एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस, याकामी येणा-या रक्कम रू.१०,८०,०००/- मात्रचे खर्चास व सदर पेपर कप खरेदीकामी येणारा जादा खर्च रक्कम रू.१,५०,०००/- मात्र मे.वर्धमान सिरॅमिक,शिर्डी यांचेकडून वसुल करण्यास मान्यता देण्यात आली.

सदयस्थितीत शासनाचे दि.३०.०६.२०१८ रोजीच्या अधिसुचनेनुसार अनुज्ञेय/वापरास परवानगी असलेले पेपरकप खरेदी करणेकामी तातडीने विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील सदर निर्णयाप्रमाणे पेपर कपसाठी ई-निविदा काढण्यासाठी विविध ठिकाणांहुन माहिती घेण्यात आली. यामध्ये आय.टी.सी कंपनी बायोडिग्रेडेबल पेपर तयार करीत असल्याची माहिती मिळाली त्यांनी खालीलप्रमाणे स्पेसिफिकेशन दिलेले आहेत.

Bio Based Barrier Paper Board from ITC Omega Bev 1S- 195 GSM (Paper 170 GSM + 25 GSM Polylactic Acid Substance) यामध्ये आयटीसी पेपरची कंपनी असुन Omega Bev 1S हा पेपरचा प्रकार व कोड आहे. सदर Bio Based Paper ची माहिती यासोबत जोडली आहे. आयटीसी हा एकच ब्रॅण्ड निविदेत नमूद करण्याऐवजी या क्षेत्रातील ITC, TNTL व Nippon वगैरे कंपन्या नमूद करून निविदा मागविता येतील. याबाबतची कार्यवाही चालू आहे.

सदरचा पेपर हा बायोडिग्रेडेबल असून या पेपरला PLA (Polylactic Acid) कोटींग आहे मात्र त्याची Cost सध्याचे पेपर कपच्या Costing पेक्षा दीड ते दोन पट जास्त होईल असे कळते. त्यामुळे याबाबत मा.उपजिल्हाधिकारी व मा.उपकार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी चर्चा केली असता ही बाब मा.व्यवस्थापन समितीचे सभेत अवलोकनार्थ व माहितीसाठी सादर करणेबाबत ठरले आहे.

सध्याचा पेपर कपचा प्रती नगाचा दर ०.३६ पैसे आहे. मात्र नवीन बायोडिग्रेडेबल पेपर कपचे प्रती नगाचा साधारण दर ०.५५ पैसे ते ०.७५ पैसेच्या दरम्यान असेल असा अंदाज आहे. संस्थानला वर्षाला अंदाजे

२,८०,००,००० चे दरम्यान पेपर कप लागतील व याकामी सरासरी ०.५५ ते ०.७५ पैसे दराने याकामी अंदाजे १,५४,००,०००/- ते १,९६,००,०००/- मात्र खर्च येईल. मागील वर्षाच्या तुलनेत सदर खरेदीकामी ५०,००,०००/- ते ९५,००,०००/- लाखा दरम्यान जास्त खर्च येईल.

सदर बाब मा.व्यवस्थापन समितीचे सभेत अवलोकनार्थ तसेच नव्याने ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत पेपर कपची गरज पडल्यास मे.पार्थ एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांचेकडून गरजेनुसार ०.३६ पैसे प्रती नग दराने पेपर कप खरेदी करण्यास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१७ **आजचे सभेमध्ये बायोडिग्रेडेबल पेपरचे पेपर कपाचे नमुने सादर करण्यात आले होते. सदर नमुन्यांचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली. व सदर पेपरकप खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरची ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मे.पार्थ एंटरप्रायजेस, औरंगाबाद यांचेकडून आवश्यकतेनुसार ०.३६ पैसे प्रती नग दराने पेपर कप खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३ **शासनाचे महाराष्ट्र स्टेट को-ऑप.स मार्केटींग फेडरेशन लि.मुंबई यांनी संस्थानला तुरडाळ पुरविणेस असमर्थता दर्शविल्यामुळे जानेवारी ते मार्च-२०१९ या कालावधीसाठी तुरडाळीची खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- महाराष्ट्र स्टेट को-ऑप.स मार्केटिंग फेडरेशन लि., यांनी मा.अवर सचिव, पणन विभाग मंत्रालय यांना दि.०६.१२.२०१८ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, पणन महासंघातर्फे राज्य शासनाच्या बाजार हस्तक्षेप योजने अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या तुरीपासून भरपाई करून प्राप्त तूरडाळ शासनाच्या निर्णयानुसार विविध शासकीय विभागास पुरवठा मागणीनुसार करण्यात येत होती. परंतु सदयस्थितीत सदर योजनेतील खरेदी करण्यात आलेला तुर साठा संपुष्ठात येत असल्याने यापुढे पणन महासंघातर्फे तुरडाळ पुरवठा करणे शक्य नाही. तरी या नंतर तुरडाळ पुरवठयाकरीता आपल्याकडील मागणी पणन महासंघाकडे नोंदविण्यात येऊ नये, ही विनंती.

तसेच महाराष्ट राज्य सहकारी मार्केटिंग फेडरेशन लि.,मुंबई यांनी संस्थानचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, शिर्डी यांना दि.२९.१२.२०१८ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

वरील विषयास अनुसरून सविनय कळविण्यात येते की, आपले कडील संदर्भिय पत्र क्र.१ नुसार आपण माहे डिसेंबर २०१८ करीता १४० क्विंटल तुरडाळ मागणी या कार्यालयाकडे नोंदविली होती. त्यानुसार या कार्यालयाने दि.०६.१२.२०१८ रोजी आमचे प्रधान कार्यालयास कळविले होते. परंतु आमचे प्रधान कार्यालयाकडील संदर्भिय पत्र क्र.२ नुसार बाजार हस्तक्षेप योजना अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या तुरीपासून प्राप्त तुरडाळीचा साठा संपुस्टात येत असल्यामुळे यापुढे पणन महासंघातर्फे तुरडाळ पुरवठा करणे शक्य नसलयाचे कळविले आहे.

तरी यानंतर तुरडाळ पुरवठयाची मागणी या कार्यालयाकडे नोंदविण्यात येवु नये ही विनंती. याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

संस्थानने एकत्रित किराणामाल खरेदी प्रक्रियेचे वेळी तुरडाळ १,४०० क्विंटल खरेदीकामी ई-निविदा मागविल्या होत्या. यामध्ये तुरडाळीची निवड केलेले ६ नमुन्यांमध्ये मे.जयहिंद किराणा स्टोअर्स,नाशिक यांचे न्युनतम दर रू.६,१११/- प्रती क्विंटल होते. तथापि त्यांनी चर्चा वाटाघाटीमध्ये ६,०००/- प्रती क्विंटल दर दिले होते.

तथापि दरम्यान महाराष्ट्र स्टेट को-ऑप.स मार्केटिंग फेडरेशन लि., यांनी पणन महामंडळामार्फत संस्थानला शासनाची तुरडाळ प्रती क्विंटल रू.६,०००/- दराने खरेदी करण्याची विनंती केली होती. याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ चे सभेत सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्रं.२७६ व २८७ नुसार पुर्ण वर्षभर म्हणजेच मार्च-२०१९ पर्यंत सदर दराने शासनाकडून तुरडाळ खरेदी करण्याचे ठरले होते.

सदर निर्णयास अनुसरून माहे मे ते नोव्हेंबर २०१८ पर्यंत खालीलप्रमाणे ८०० क्विंटल तुरडाळ शासनाकडून प्रती क्विंटल रू.६,०००/- दराने खरेदी करण्यात आली आहे.

| अ.नं | महिना | पुरवठा केलेली तुरडाळ |
|---|---|---|
| १ | मे | १२० |
| २ | जुन | ८० |
| ३ | जुलै | १०० |
| ४ | ऑगस्ट | १३० |
| ५ | सप्टेंबर | १३० |

| | | |
|---|---|---|
| ६ | ऑक्टोबर | १२० |
| ७ | नोव्हेंबर | १२० |
| ८ | डिसेंबर | सदर महिन्यात तुरडाळ पुरविलेली नाही. (१४० क्विंटल) |

डिसेंबर-२०१९ चे तुरडाळ मागणीसाठी वारंवार महाराष्ट्र स्टेट को-ऑप.स मार्केटिंग फेडरेशन लि., यांचेकडे पाठपुरावा केला असता त्यांनी तुरडाळ पुरविली नाही व वरीलप्रमाणे संस्थानला डिसेंबर महिन्याची व पुढील कालावधीसाठी तुरडाळीची मागणी नोंदवु नये असे कळविले आहे. त्यामुळे संस्थानला त्वरीत तूरडाळ खरेदी करणेची गरज आहे. तसेच जानेवारी ते मार्च या ३ महिन्याचे कालावधीसाठी तुरडाळ खरेदी करणे गरजेचे आहे.

सदर आर्थिक वर्षाचा कालावधी कमी राहिला आहे. त्यामुळे सन २०१८-१९ चे ई-निविदेतील न्युनतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेशी जानेवारी ते मार्च या ३ महिन्याच्या कालावधीसाठी संन २०१८-१९ च्या चर्चा वाटाघाटी दरात संस्थानला तूर डाळ पुरविणेस तयार आहे किंवा कसे? याबाबत दुरध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी दि.२९.१२.२०१८ चे मेलद्वारे संस्थानला जानेवारी ते मार्च २०१९ पर्यंत रू.६,०००/- प्रती क्विंटल दराने तुरडाळ पुरवणेस तयार असलेचे कळविले आहे. त्यांचेकडून उर्वरित ३ महिन्यांचे कालावधीसाठी तुरडाळ खरेदी करावी असे मत आहे.

प्रसादालयाने सन २०१८-१९ साठी तूरडाळीची १,४०० क्विंटलची वार्षिक मागणी कळविली होती त्यापैकी नोवहेंबर-२०१८ अखेरे खरेदी केलेली ८०० क्विंटल तुरडाळ वजा जाता ६०० क्विंटल तूरडाळीची मागणी शिललक आहे. त्यास अनुसरून सदर मागणीपैकी जानेवारी ते मार्च २०१९ या ३ महिन्याचे कालावधीकरीता प्रसादालयाचे मागणीप्रमाणे ६०० क्विंटलपर्यंत तुरडाळ खरेदी करावी लागेल असे वाटते.

तरी जानेवारी ते मार्च-२०१९ या ३ महिन्याकरीता सन २०१८-१९ या वर्षाचे ई-निविदा प्रक्रियेतील न्युनतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून चर्चा वाटाघाटी नंतरचे रू.६,०००/- प्रती क्विंटल दराने गरजेप्रमाणे खरेदी करणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाचे महाराष्ट्र स्टेट को-ऑप.स मार्केटींग फेडरेशन लि.मुंबई यांनी संस्थानला तुरडाळ पुरविणेस असमर्थता दर्शविल्यामुळे सन २०१८-१९ चे ई-निविदेतील न्युनतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेकडून माहे जानेवारी-२०१९ ते मार्च-२०१९ या ३ महिन्याचे कालावधीकरीता रक्कम रू.६,०००/-मात्र प्रती क्विंटल या दराने आवश्यकतेनुसार तुरडाळ खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४** **मे. व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे शुध्द तुप प्रोसेसिंग प्लॅन्ट तपासणी व पाहाणी अहवालांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५.१०.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५९९ अन्वये ८,६०० क्विंटल तुप खरेदी कामी लाडू निर्मिती विभागाने मान्यता घेतली होती. सदर निर्णयास अनुसरुन त्यातील वार्षिक मागणी विचारात घेऊन सन २०१९ या एक वर्षासाठी मा.व्यवस्थापन समितीने ठरविलेले धोरणाप्रमाणे ४ तिमाहीसाठी तुप खरेदीबाबत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१२/११/२०१८ ते ०५/१२/२०१८ या कालावधीत ४ स्वतंत्र ऑनलाईन ई-निविदा मागविन्यात आल्या होत्या. यामध्ये तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.१०.१२.२०१८ रोजी उघडण्यात येतील असे जाहिरातीत व निविदा फॉर्ममध्ये नमुद करण्यात आले होते. तसेच तूपाचे नमुने दि.०६/१२/२०१८ ते ०८/१२/२०१८ अखेर मागविण्यात आले होते.

सदर ४ ई-निविदा प्रक्रियेतील जानेवारी ते मार्च्र २०१९ या ई-निविदेत २१, एप्रिल ते जून १९ या ई-निविदेत १६, जुलै ते सप्टेंबर १९ या प्रक्रियेत १६ व ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९ या ई-निविदेत १४ निविदाधारकांनी भाग घेतला होता. सदर ई-निविदांची छाननी दि.१०/१२/२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेत झाली होती. यामध्ये अनुक्रमे १४, १०, १० व १० असे निविदाधारक पात्र ठरले होते. सदर सर्व पात्र निविदाधारकांचे ४ ही निविदेचे कमर्शियल बीड दि.१३/१२/२०१८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यात आले होते. यामध्ये मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे तूपासाठीचे दर ४ ही ई-निविदेमध्ये न्यूनतम आलेले आहेत.

वरील ४ ही ई-निविदेतील पात्र निविदाधारकांचे Commercial Bid दि.१३.१२.२०१८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यात आले होते. यामध्ये चारही निविदेमध्ये मे. व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,

अहमदाबाद यांचे दर न्युनतम असल्याने त्यांनी सादर केलेला गाईचे शुद्ध तुपाचा नमुना कोड देऊन जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/४६१९/२०१८ दिनांक १९.१२.२०१८ अन्वये मे.अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटन्ट्स, नाशिक या लॅबमध्ये तपासणीसाठी पाठविण्यात आला होता. त्यांचेकडून दिनांक २८.१२.२०१८ रोजी तपासणी अहवाल प्राप्त झाला आहे, तो FSSAI 2011 चे Standards Norms प्रमाणे आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १३.१२.२०१८ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झाला होता.

निर्णय क्रं.७७२- "सन २०१९ वर्षाकरीता गायीचे शुध्द तुप खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त झालेल्या निविदांमधून तांत्रिक निविदांमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या ऑनलाईन वाणिज्यीक निविदा आजचे व्यवस्थापन समितीमध्ये उपस्थिती निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. त्यामध्ये व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे चार तिमाही साठी दर खालीलप्रमाणे असून ते न्युनत्तम आहे. तथापी ई-निविदेत प्रति क्विंटलचे दर मागविण्यात आले होते. परंतु व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांनी प्रति किलोचे दर दिलेले आहे. याबाबत त्यांनी लेखी पत्र देऊन सदरचे दर प्रति किलो असून त्यापटीत प्रति क्विंटलचे दर ग्राहय धरावे अशी विनंती केली, व त्यास समितीने मान्यता दिली.

| अ.नं. | कालावधी | दर प्रति किलो (सर्व करांसह) |
|---|---|---|
| १ | जानेवारी-२०१९ ते मार्च-२०१९ | रु.२७०/- |
| २ | एप्रिल-२०१९ ते जून -२०१९ | रु.२७३/- |
| ३ | जुलै-२०१९ ते सप्टेंबर-२०१९ | रु.२७१/- |
| ४ | आक्टोंबर-२०१९ ते डिसेंबर-२०१९ | रु.२६९/- |

व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे प्रतिनिधी व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.

तसेच शासनाचे खरेदी धोरणानुसार महाराष्ट्राबाहेरील निविदाधारक निम्नतम असेल व निम्नतम आलेल्या दरामध्ये महाराष्ट्रातील निविदाधारक मालाचा पुरवठा करण्यास तयार असेल तर त्यांना ५० टक्के पुरवठा आदेश विभागुन देण्यात यावा, अशी तरतुद आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील निविदाधारक हे निम्नतम आलेल्या दरामध्ये गाईचे शुध्द तुपाचा पुरवठा करण्यास तयार आहेत काय? याबाबत त्यांना विचारणा करण्यात आली. मात्र महाराष्टातील सर्व पुरवठादारांनी निम्नतम दरधारकाचे दराने पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे १०० टक्के शुध्द गायीचे तुप पुरविणेबाबतचा पुरवठा आदेश व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना देण्यात यावा, असे ठरले."

तत्पुर्वी संस्थानच्या व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष व इच्छुक असलेले समिती सदस्य तसेच संस्थान अधिकारी यांनी व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद या प्रकल्पाचे व्हेंडर ऑडीट करावे. मात्र डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दोन आठवडयात भाविकांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. त्यामुळे संस्थान अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडणे शक्य होणार नाही, सबब डिसेंबर अखेर पावेतो व्हेंडर ऑडीट शक्य होणार नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन तुपाच्या पुरवठयात व्यत्यय येऊ नये म्हणून प्रथम १ जानेवारी पासून एक महिन्याचा पुरवठा आदेश देण्यात यावा. व्हेंडर ऑडीटचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर जर अहवाल अनुकूल/समाधानकारक असेल तर प्रथम तिमाहीच्या पुढील दोन महिन्याचा पुरवठा आदेश स्वतंत्रपणे देण्यात यावा, असे ठरले. सदर तिमाहीतील पुरवठा करण्यात आलेल्या शुध्द तुपाचा दर्जा व गुणवत्ता तसेच करारनाम्यातील इतर अटी व शर्ती यांचे पुरवठादाराकडून केले जाणारे पालन विचारात घेऊन पुढील प्रत्येक तिमाहीचे स्वतंत्र पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील वरील निर्णयाप्रमाणे १ महिन्यासाठी ७५० क्विंटल शुध्द तुप खरेदीबाबत मे.व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तसेच मा.उपाध्यक्ष महोदय यांनी दिनांक ०४.०१.२०१९ रोजी सदर प्लॅन्ट भेटीची तारीख निश्चित केली होती. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.श्री.वाकचौरेसाहेब, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा.श्री. जयकर साहेब, मा.श्री.सिंह साहेब व मा.सौ शेळकेमॅडम मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे प्लॅन्टला भेट देणेबाबत इच्छुक असल्यास त्वरीत कळविणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/४८६२/२०१९ दि.०१.०१.२०१९ चे ई-मेलद्वारे कळवून विनंती करण्यात आली होती.

तसेच दुरध्वनीवरूनही मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.श्री.वाकचौरे साहेब, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे साहेब, मा.श्री. जयकर साहेब, मा.श्री.सिंह साहेब व मा.सौ शेळके मॅडम यांचेशी संपर्क करण्यात आला होता. त्यांनी वेळे अभावी शक्य होणार नाही, असे सांगितले होते.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपजिल्हाधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्र.अधिक्षक खरेदी व FDA च्या दोन अधिका-यांना जाणेबाबत निर्देश दिले होते. त्यास अनुसरून मा.सह आयुक्त अन्न व औषध प्रशासन नाशिक व मा.आयुक्त, अन्न औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/४८६१/२०१९ दि.०१.०१.२०१९ चे पत्राने विनंती करण्यात आली होती.

मा.सह आयुक्त (अन्न), मुख्यालय, अन्न औषध प्रशासन,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांचेमार्फत श्री.दिलीप सोनवणे व श्री.प्रमोद पाटील यांना सदर भेटीसाठी नियुक्त केले होते.

त्यानंतर खाली नमुद केलेप्रमाणे मा.उपाध्यक्ष महोदय व संस्थान अधिकारी/कर्मचारी व FDA अधिकारी यांनी मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांचे उमरगांव येथील प्लॅन्टला दि.०४.०१.२०१९ रोजी भेट दिली होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.श्री.चंद्रशेखर कदम | - | उपाध्यक्ष |
| २. | श्री.धनंजय निकम | - | उपजिल्हाधिकारी |
| ३. | श्री.बाबासाहेब घोरपडे | - | उपकार्यकारी अधिकारी |
| ४. | अविनाश कुलकर्णी | - | प्र.अधिक्षक, खरेदी |
| ५. | श्री.दिलीप सोनवणे | - | अन्न सुरक्षा अधिकारी |
| ६. | श्री.प्रमोद पाटील | - | अन्न सुरक्षा अधिकारी |

वरील भेटीदरम्यान मा.उपाध्यक्ष, उपजिल्हाधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी यांचे भेटीचा अहवाल परिशिष्ट "अ" म्हणून व श्री.दिलीप सोनवणे व श्री.प्रमोद पाटील, अन्न सुरक्षा अधिकारी यांनी केलेले तपासणीचा अहवाल परिशिष्ट ''ब'' म्हणून यासोबत सादर केला आहे. अन्न व औषध प्रशासन यांचा तपासणी अहवाल व संस्थानचे मा.उपाध्यक्ष व अधिकारी यांचा पाहणी अहवाल, हे दोन्हीही अहवाल सकारात्मक आहेत.

तरी वरील नमुद केलेले सदर अहवालांची मा.व्यवस्थापन समितीचे सभेत नोंद घेणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उपाध्यक्ष, उपजिल्हाधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी विभाग, तसेच मा.सह आयुक्त (अन्न), मुख्यालय,अन्न औषध प्रशासन,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे प्रादेशिक कार्यालय, नाशिक येथील अन्न सुरक्षा अधिकारी श्री.दिलीप सोनवणे व श्री.प्रमोद पाटील यांनी मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांचे शुध्द तुप प्रोसेसिंग प्लॅन्टची तपासणी व पाहणी करुन दिलेल्या अहवालाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली. तसेच मे.व्हीएसपी डेअरी इंडस्ट्रीज, अहमदाबाद यांना निविदेतील अटी शर्तीनुसार पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.५ **श्री साई प्रसादालयात सध्या काम करत असलेले चपाती/ पुरी ठेकेदार व चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी असलेले ठेकेदार यांना ई- निविदा प्रक्रिया होईपावेतो मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम १४ (भाग -४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

प्रास्तविक:- वरील विषयास अनुसरुन, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी श्री साई केटरर्स, यांना दि.०३/०२/२०१८ ते ०२/०२/२०१९ या ०१ वर्ष कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा गहु आटा+ मैदयास रुपये १२२१/- (अक्षरी रु.एक हजार दोनशे ऐकवीस मात्र) सर्व करांसहीत याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे श्री साई प्रसादालयात तीन चपाती मशिन कार्यरत असून, सदर चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणेकामी श्री साई केटरर्स, यांना दि.०३/०२/२०१८ ते ०२/०२/२०१९ या ०१ वर्ष कालावधीकरीता प्रती क्विंटल कोरडा गहु आटा+ मैदयास रुपये ३६१/- (अक्षरी रु.तीनशे ऐकसष्ट मात्र.) सर्व करांसहीत याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी व मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करणेकामी असलेले ठेकेदारांची मुदत दि.०२ फेब्रुवारी-२०१८ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे भक्तांची प्रसादभोजनाअभावी गैरसोय होऊ नये, याकरीता पुढील कालावधीसाठी ई-निविदा सुरु करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समिती दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार इकडीलविभागामार्फत ई-निविदा मसुदा तयार करुन तो मसुदा विधी विभाग व ''निविदा दस्तऐवज तपासणी'' समितीकडून तपासून कायम करणेत येवून वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेकामी जनसंपर्क विभागाकडे

दि.०१/१२/२०१८ रोजी कार्यवाहीसाठी देण्यात आलेली आहे. जाहीरात प्रसिध्द झाल्यानंतर अंतिम निविदा भरणेसाठी विहीत कालावधी दि.२१/१२/२०१८ पर्यंत फक्त दोनच ई-निविदा आल्याने, शासकीय नियमानूसार तीन ई-निविदा असणे गरजेचे असल्याने निविदा भरणेकामी पुन्हा दि.२९/१२/२०१८ रोजीपर्यंत कामाचे ०७ दिवसांचा कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरहु मुदतवाढ कालावधीपर्यंत निविदा दोनच राहील्या तर पुन्हा दुस-यांदा मुदतवाढ दयावी लागेल असे नम्र मत आहे. तदनंतर पुढील प्रक्रीया पुर्ण करुन कार्यादेश देणेसाठी साधारणतः एक ते दोन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

त्यामुळे सध्या श्री साई प्रसादालयात प्रसादभोजनामध्ये मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणे व चपाती मशिनवर मुनष्यबळ पुरवून चपाती तयार करणेकामी सध्या असलेले ठेकेदार यांना करारनामातील अटी/शर्तीनूसार, चालू कामाकरीता सुरु असलेली निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नवीन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो, आहे त्याच मंजूर दराने मुदतवाढ देता येईल असे आहे. त्यानूसार दोन्ही कामासाठी महिन्याकाठी अंदाजे रु.४,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता मिळावी असे नम्र मत आहे .

मागणी:- श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणे तसेच चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी असलेले सध्याचे ठेकेदारांना, प्रसादभोजनातील चपाती अभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता ई-निविदाची प्रक्रिया पुर्ण होवून पात्र ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच अटी/शर्तीवर व केलेल्या करारनाम्यानूसार संबंधीत ठेकेदार श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना चपाती/पुरी तयार करणे तसेच चपाती मशिनवर चपाती तयार करणे या दोन्ही कामासाठी दोन महिने अथवा नवीन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ दयावी लागेल. असे इकडील विभागाचे नम्र मत आहे. त्यासाठी सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.व्यवसथापन समिती सभेत सादर करणे गरजेचे आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- तरी उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता, श्री साई प्रसादालयामध्ये मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी व चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी सध्या काम करत असलेले ठेकेदार, श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना प्रसादभोजनातील चपाती अभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता दोन महिने अथवा ई-निविदाची प्रक्रिया पुर्ण होवून पात्र ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता आहे त्याच मंजूर दरात अटी/शर्तीवर व केलेल्या करारनाम्यानूसार मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामध्ये मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी व चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी सध्या काम करत असलेले ठेकेदार, श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना प्रसादभोजनातील चपाती अभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता दोन महिने अथवा ई-निविदाची प्रक्रिया पुर्ण होवून पात्र ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता आहे त्याच मंजूर दरात अटी/शर्तीवर व केलेल्या करारनाम्यानूसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साई प्रसादालय)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.६ **श्री साईप्रसादालय व लाडू प्रसाद निर्मीती विभागाकरीता आवश्यक LPG पुरवठा करणेकामी मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन सिन्नर/नाशिक यांचे ॲडव्हांन्स रकमेत दहा लाख रुपये वाढ करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम तरतुद २०१४: अधिनियम कलम नंबर १७ (२) (झ) सर्व साधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा गोष्टी करील.

प्रस्तावना: श्री साईप्रसाद भोजन, बुंदी लाडु प्रसाद, नास्ता पाकिटे, बुंदी प्रसाद बनविणेकामी श्री साईप्रसादालयात एल. पी. गॅसचा इंधन म्हणुन सन १९८८ पासून वापर करणेत येत आहे. सध्या मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन, सिन्नर - नाशिक, तसेच मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, मनमाड येथून दरमहा लागणारा एल. पी. गॅस खरेदी केला जातो. त्याकामी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन यांचेकडे रक्कम रूपये - ३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये - तीस लाख) मात्र तसेच मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन यांचे कडे रक्कम रूपये २०,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये - वीस लाख) मात्र अनामत रक्कम ठेवण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

१. मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन यांचेकडे रक्कम रूपये - ३०,००,०००/- मात्रचा तपशिल

| Sr.No. | D.D. No. & Bank | Date | Amount Rs. | Submitted AT |
|---|---|---|---|---|
| 1. | D. D No. 557570<br>Union Bank Of India, Shirdi | 11/12/2008 | 7,00,000/- | Manmad Territory |
| 2. | D. D. No. 035050 | 16/08/2011 | 7,00,000/- | Manmad Territory |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Union Bank Of India, Shirdi | | | |
| 3. | D. D. No. 381559<br>Union Bank Of India, Shirdi | 01/02/2013 | 6,00,000/- | Manmad Territory |
| 4. | D. D. No. 960553<br>Union Bank Of India, Shirdi | 30/01/2014 | 10,00,000/- | Manmad Territory |

२. मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन यांचे कडे रक्कम रूपये २०,००,०००/- मात्रचा तपशिल

| Sr.No. | D. D. No. & Bank | Date | Amt. Rs. | Submitted AT |
|---|---|---|---|---|
| 1. | D. D. No. 220589<br>Syndicate Bank, Shirdi. | 15/11/1988 | 50,000/- | Mumbai Territory |
| 2. | D. D. No. 002632<br>Cental Bank of India, Shirdi. | 09/11/1991 | 25,000/- | Mumbai Territory |
| 3. | D. D. No. 004971<br>Cental Bank of India, Shirdi. | 28/10/1992 | 25,000/- | Mumbai Territory |
| 4. | D. D. No. 960545<br>State Bank of India, Shirdi. | 24/12/2014 | 19,00,000/- | Mumbai Territory |

मागणी:- सध्या दरमहा निम्नत्तम दराने ज्या पेट्रोलियम कंपणीचे दर कमी असतील त्यांचेकडून गॅस खेरदी केला जातो. मात्र दिवसेंदिवस वाढत्या साईभक्तांचे गर्दी मुळे प्रसाद भोजन, लाडू प्रसाद, बुंदी प्रसाद तसेच नास्ता पाकिटे बनविणेस गॅस इंधन खर्चात प्रचंड वाढ झालेली आहे. दरमहा सरासरी अंदाजे ६० मे. टन गॅस लागतो, गॅस वापराबरोबरच गॅसचे दरवाढीमुळे मे. भारत पेट्रोलियम यांचे कडे असलेली अनामत रक्कम रूपये २०,००,०००/- मात्र अपुरी पडत आहे.

दरवेळेस गॅस टॅंकरचे बिल ईकडील विभागामार्फत तातडीने अदायगी साठी पाठविले जाते प्रशासकीय मंजुरी नंतर लेखाशाखेमार्फत तातडीन RTGS पेमेंट मे. भारत पेट्रोलियम यांना केले जाते मात्र मुळातच १) गॅस वापरात झालेली वाढ, २) गॅस दरात झालेली वाढ व ३) मे. भारत पेट्रोलियम यांचे कडे असलेली कमी अनामत रक्कम यामुळे दरवेळेस गॅस टॅंकर भरणेस कमी बॅलन्स मुळे अडचण निर्माण होत आहे. प्रस्तुतची अडचण दूर होणे करीता मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन सिन्नर / नाशिक यांना वाढीव १०,००,०००/- मात्र अनामत रक्कम प्रशासकीय मान्यतेने लेखाशाखेमार्फत RTGS करणे आवश्यक आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईप्रसादालय विभाग व लाडु प्रसाद निर्मिती विभागा करीता दैनंदिन इंधनाची गरज विनाव्यत्यय भागविणे साठी मे. भारत पेट्रोलियम यांचेकडे असलेली अनामत रक्कम रूपये २०,००,०००/- मात्र मध्ये रक्कम रूपये १०,००,०००/- मात्र वाढ करणे गरजेचे आहे. याकामी मा. व्यवस्थापन समीतीची मान्यता घ्यावी लागेल

प्रस्ताव:- तरी श्री साईप्रसादालय व लाडु प्रसाद निर्मीती विभागाकरीता आवश्यक दैनंदिन इंधन पुरवठा (LPG) विनाव्यत्यय होणे करीता मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन यांना देणेत आलेल्या अनामत रक्कमेमध्ये रक्कम रूपये १०,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये-दहा लाख) मात्र वाढ करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय व लाडु प्रसाद निर्मीती विभागाकरीता आवश्यक दैनंदिन इंधन पुरवठा (LPG) विनाव्यत्यय होणे करीता मे.भारत पेट्रोलियम कार्पोरेशन यांना देण्यात आलेल्या अनामत रक्कमेमध्ये रक्कम रू. १०,००,०००/- मात्र वाढ करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत राहुरी तालुक्यातील चिंचोली फाटा ते शनिशिंगणापूर रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करणेकामी रु. २४,४६,०५,००८/- मात्रचे खर्चास व सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद : अधिनियम २००४ मधील तरतूद :अधिनियम २१ (क) पोट कलम (१) नंतर खालीलप्रमाणे तरतूद आहे."(१क) पोट कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून,

भक्तांच्या सोईसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय महामंडळांना शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.”

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय –

१. दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७९.

२. दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४९.

३. दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९६.

४. दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४७ (२).

५. दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७५.

प्रस्तावना– मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४७(०२) अन्वये, पिंपळवाडी-एकरुखे-गणेशनगर-वाकडी ते रा.मा.५० पर्यंत रस्ता कि.मी ००० ते २५/०० मध्ये मजबूतीकरण व डांबरीकरण करणेस व त्याकामी येणा-या रक्कमरु.१३ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देणेत येऊन सदरहू प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविणेबाबत ठरले होते. यावेळी अशीही चर्चा झाली की, अहमदनगर-मनमाड या महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-टाकळीमिया-आरडगाव-केंदळ-ब्राम्हणी हा रस्ता शिंगणापूर येथे दर्शनासाठी जाणा-या भविकांचे सोईचा व नजीकचा आहे. तरी सदर रस्त्याचेही मजबूतीकरण व डांबरीकरण करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत ठरले.

त्यानंतर मा.श्री.चंद्रशेखर कदम,उपाध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.११/०५/२०१८ रोजीचे पत्राने राहूरी तालुक्यातील चिंचोली फाटा ते शनि शिंगणापूर या जवळच्या मार्गाने शिर्डी येथून चिंचोली फाटा, देवळाली, टाकळीमियॉ,महाडूक सेंटर, वळण, पिंपरी वळण, खेडले परमानंद या मार्गाने अनेक पालख्या शनि शिंगणापूरला जातात व पुढे त्या पालख्या कानिफनाथ देवस्थानकडे जाताना खुप अडचणी येतात. सदरचे रस्ते अतिशय खराब असून त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम श्री साईबाबा संस्थान, शिर्डी मार्फत होणेकामी कार्यवाही व्हावी अशी विनंती केली होती. तसेच सदरचे पत्रासोबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रु.२० कोटी रकमेचे अंदाजपत्रक सादर केले होते. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४६ अन्वये, खालील प्रमाणे ठराव संमत झालेला आहे.

“अहमदनगर-मनमाड महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-आरडगाव-केंदळ-ब्राम्हणी रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणासाठी सार्वजनिक, बांधकाम विभागाकडील अंदाजपत्राकानुसार रु.२०कोटी मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. तसेच याकामी शासन मान्यता घेऊन सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करणेत यावा, असे ठरले.”

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांना सदरहू रस्त्यांचे सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे तांत्रीक मान्यतेसह सादर करणेबाबत कळविणेत आले होते. त्यामध्ये अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना अग्रेशीत केलेल्या पत्रात प्र.रा.मा ८ चिंचोली देवळाली प्रवरा टाकळीमिया मुसळवाडी वळणपिप्री ते खेडले परमानंद रस्ता पालखी मार्ग कि.मी ०/०० ते २७/२०० मध्ये दुरुस्तीकामी रु.२४,४६,०५,००८/- रकमेचे वाढीव खर्चासह सुधारीत अंदाजपत्रक कळविले असून त्याची प्रत संस्थानला दिलेली होती. त्यानुसार प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत येऊन त्यावर निर्णय क्र.७७५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय समंत झालेला आहे.

“यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर-मनमाड या महामार्गावरील चिंचोली फाटा-देवळाली-टाकळीमिया-आरडगाव-केंदळ-ब्राम्हणी या शनि शिंगणापूरला जाणा-या रस्त्यांचे कामासाठी संस्थानमार्फत रक्कम रु.२० कोटी निधी उपलब्ध करुन देणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०६.२०१८ रोजीचे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु अधिक्षक, अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांचेकडे सदर कामासाठी रक्कम रु.२४,४६,०५,००८/- मात्र एवढया रकमेचा प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यामुळे सदरहू कामासाठी वाढीव रक्कम रु.४,४६,०५,००८/- मात्रचे रकमेसह एकूण रक्कम रु.२४,४६,०५,००८/- मात्रचा निधी शासन मान्यतेने संस्थानमार्फत देणेस मान्यता देण्यात आली.”

उपरोक्त निर्णयामध्ये अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांनी कळविलेप्रमाणे महाडूक सेंटर, वळण, पिंपरी वळण, खेडले परमानंद या मार्गाचा उल्लेख नाही. अधिक्षक अभियंता यांनी चिंचोली फाटा, देवळाली, टाकळीमियॉ,महाडूक सेंटर, वळण, पिंपरी वळण, खेडले परमानंद या रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करुन रु.२४,४६,०५,००८/- मात्रचा खर्च कळविला आहे. त्यानुसार निर्णय होणे आवश्यक आहे.

प्रस्ताव– तरी चिंचोली फाटा- देवळाली-टाकळीमिया-आरडगाव-केंदळ-ब्राम्हणी यामार्गा ऐवजी अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांनी कळविलेप्रमाणे चिंचोली फाटा, देवळाली, टाकळीमियॉ,महाडूक सेंटर,

वळण, पिंपरी वळण, खेडले परमानंद या मार्गासाठी रु.२४,४६,०५,००८/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत राहुरी तालुक्यातील चिंचोली फाटा ते शनिशिंगणापूर रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांना अंदाजपत्रकाचे सविस्तर तपशिलासह मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात यावे, असे ठरले.** **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.८** **मौजे निमगाव- कोऱ्हाळे येथील गट नं. १८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्पलेक्सचे बांधकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ई- निवीदेतील निम्नतम दराचे निविदाधारक मे. न्याती इंजीनियर्स ॲन्ड कन्सलटंट, पुणे यांचे समावेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | मौजे निमगाव – को-हाळे येथील गट नं १८३ पै. मध्ये श्रीसाईबाबा शैक्षणिक कॉम्पलेक्सचेबांधकाम करणेकामीप्राप्त झालेल्या ई-निवीदेतील निम्नतम दराचे निविदाधारका समवेत चर्चा वाटाघाटी करून निर्णय होणेबाबत. |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेतील नि.क्र.६५१ |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१५८,७४,१४,३९५/- |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कुल, श्री साईबाबा कन्याविद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांकरीता एकत्रित शैक्षणिक संकूलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.१८३ मधील ५ हेक्टर ४० आर जागेत एकूण उभारणे प्रस्तावीत आहे. मा.प्रधानसचिव, विधी व न्याय विभाग यांचे शासन निर्णय क्र.सासंवि/१०१८/ ९६९/ प्र.क्र.११०/का.१६दि.०८/१०/२०१८ अन्वये सदरहू प्रकल्पास व याकामी येणा-या रु.१५८.७४कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५१ अन्वये सदरहूकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देणेत आली आहे. |
| ५) | निवीदा तपशील | दि.१५/११/२०१८ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई – निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.२९/११/२०१८ रोजी या कामासाठी प्रि-बीड मिटींग घेणेत आली. सदरहु सभेस १० कंपन्यांचे प्रतीनिधी उपस्थित होते. दि.२९/१२/२०१८ पर्यंतचे अंतिम मुदतीत ०३ निवीदाधारकांनी ई-निवीदा जमा केल्या होत्या. दि.०३/०१/२०१९ रोजीचे खरेदी समितीचे सभेत तांत्रिक निवीदा उघडणेत आल्या असून तिनही निविदाधारक हे पात्र झाले आहेत. पात्र निविदांचा वाणिज्यीक लिफाफा दि.०७/०१/२०१९ रोजीच्या मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडणेत आला आहे. |
| अ) | निविदा कालावधी | दि.१५/११/२०१८ ते दि.२९/१२/२०१९ |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दि.०३/०१/२०१९ सकाळी ११.०० वाजता. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०३ (तिन) |
| ड) | सर्व निविदाधारकांनी संकेतस्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय? | होय, जमा केले आहेत. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय? | होय.<br>रु.१,२६,९९,२००/- मात्र |
| ई) | निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१,२६,९९,२०००/- (अंदाजपत्रकीय रक्कम रु.१५८,७४,१४,३९५/- मात्र वर २०% कमी करुन) |
| ६) | तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिलः | |

| अ.नं. | ठेकेदारचे नांव | निविदा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | भानु कन्सट्रक्शन, मुंबई | २६०,४८,६२,५०४/- | -- |
| २. | जेनेरीक इंजीनियरींग कन्सट्रक्शन ॲण्ड पा्रजेक्ट्स ली., मुंबई | २६५,१२,४२,०५५/- | -- |
| **३.** | **मे. न्याती इंजीनियर्स ॲण्ड कन्सलटंट, पुणे** | **२२८,०२,१५,०४३/-** | **निम्नतम** |

| | | |
|---|---|---|
| ७) | निम्नतम निविदा धारकाचा तपशिल- | |
| अ) | ठेकेदाराचे नांव | **मे. न्याती इंजीनियर्स ॲण्ड कन्सलटंट, पुणे** |
| ब) | निविदा रक्कम | **रू.२२८,०२,१५,०४३/-** |
| क) | निविदा टक्केवारी कमी/ अधिक | ४३.६४३ % अधीक |
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | मा. व्यवस्थापन समिती,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. |

तरी वर नमूद तपशिलानूसार मौजे निमगाव–को-हाळे येथील गट नं १८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्पलेक्सचे बांधकाम करणे कामाकरीता पात्र निविंदापैकी निम्नतम दराचे ठेकेदार मे. न्याती इंजीनियर्स ॲण्ड कन्सलटंट,पुणे यांचे दर रु.२२८,०२,१५,०४३/-मात्रची निम्नतम (४३.६४३% अधीक) निविदेबाबत त्यांचेशी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२३ **मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं. १८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्पलेक्सचे बांधकामाची अंदाजपत्रकिय रक्कम रु.१५८,७४,१४,३९५/-इतकी होती. मात्र निविदा प्रक्रियेत प्राप्त निम्नतम निविदा रक्कम रु.२२८,०२,१५,०४३/- एवढया रकमेची म्हणजे ४३.६४ % अधिक रकमेची प्राप्त झालेली आहे. यावेळी सभेपुढे प्रकल्पाचे आर्किटेक्ट डी.ओ.निकम, पुणे हे उपस्थित होते. अंदाजपत्रकिय रक्कम व प्राप्त निविदेतील रक्कम यातील तफावतीबाबत आर्किटेक्ट श्री.निकम यांना विचारणा केली असता, त्यांनी सदर तफावत ही प्रामुख्याने जी.एस.टी.रकमेतील फरक व सन २०१७-१८ व २०१८-१९ च्या राज्य दरसूचीतील (SSR) फरकामुळे झाली आहे, असे नमुद केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट श्री.निकम यांनी नमूद केल्याप्रमाणे तफावतीबाबतची सविस्तर परिगणना करुन व कारणमिमांसा नमूद करुन सविस्तर अहवाल व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेसमोर सादर करावा. तसेच निविदा प्रक्रियेतील न्युनतम दरधारक मे.न्याती इंजिनियर्स ॲण्ड कन्सल्टंट, पुणे यांना व्यवस्थापन समितीचे पुढील सभेसमोर चर्चेसाठी बोलवावे, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.९ **नियोजीत श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकामासाठी Artifical Sand वापरास दि.३१.१२.२०१८ नंतरचे कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेसाठी ठेकेदार भानू कन्ट्रक्शन, मुंबई यांनी केलेल्या विनंतीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयः-

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ नुसार श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारतींचे बांधकाम करणेसाठी ठेकेदार भानू कंन्ट्रक्शन, मुंबई यांना जा.नं.एसएसएसटी/बांधकाम / २५२० / २०१८ दि.२३/०८/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८१ अन्वये, काम सुरु करण्याची तारीख दि.१९/१०/२०१८ निश्चित करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७२७ अन्वये, दि.३१/१२/२०१८ अखेर पर्यंतेचे कालावधीकरीता VSI Quality Artifical Sand आवश्यक त्या तपासण्या करुन वापरण्यास परवानगी देण्यात यावी, तसेच या कालावधीनंतर नैसर्गिक वाळूचे उपलब्धतेबाबत आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात यावा, असे ठरले आहे.

प्रस्तावना– सदर प्रकल्पाचे भूमिपूजन मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे हस्ते दि.१९/१०/२०१८ रोजी झाले असून, त्या तारखेपासून कामास सुरुवात झालेली आहे. ठेकेदार यांचे समवेत दि.२२/१०/२०१८ रोजी करारानामा करण्यात आलेला आहे. सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नाव | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| ठेकेदार | भानू कन्ट्रक्शन, मुंबई |
| कार्यादेश | जा.नं.एसएसएसटी/बांधकाम / २५२० / २०१८ दि.२३/०८/२०१८. |

| | |
|---|---|
| मंजूर निविदा रक्कम | रु. १०९.५० कोटी |
| करारनामा दिनांक | दि.२२/१०/२०१८. |
| कामाचा कालावधी | १२ महिने. |
| एकूण कामाचे बांधकाम क्षेत्रफळ | एकूण क्षेत्रफळ – २२२१४ चौ.मीटर |
| काम जलद गतीने पूर्ण केल्यास देण्यात येणारे प्रोत्साहन भत्ता. | मंजूर निविदा रकमेच्या १ % रक्कम प्रती महा. (सदरहू रक्कम जास्तीत जास्त २ % असेल) |
| विलंबापोटी दंड | मंजूर निविदा रकमेच्या ०.०५ % प्रती दिवस. (दंडा पोटी जास्तीजास्त मंजूर निविदा रकमेच्या १० % रक्कम कपात करणे) |

ठेकदार यांनी साईटवर ११ कम्बाईन्ड फूटींगचे खोदाई काम पूर्ण केलेले आहे. तसेच ११ फुटींगचे कॉंक्रीटींग पूर्ण व ग्राऊंड बींम व प्लिंथ बींबचे काम प्रगतीत आहे.

ठेकेदार यांनी दि.२०/११/२०१८ रोजीचे पत्राव्दारे शिर्डी परिसरात नैसर्गिक वाळू उपलब्ध नसल्याने सदर कामाचे कॉंक्रीटींग करीता Artificial Sand वापरणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली होती. ठेकेदार यांचे विनंतीनुसार सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.७२७ अन्वये, दि.३१/१२/२०१८ अखेर पर्यंतचे कालावधीकरीता VSI Quality Artifical Sand आवश्यक त्या तपासण्या करुन वापरण्यास परवानगी देण्यात यावी, तसेच या कालावधीनंतर नैसर्गिक वाळूचे उपलब्धतेबाबत आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात यावा, असे ठरले आहे. सदरहू निर्णयानुसार दि.३१/१२/२०१८ अखेर VSI Quality Artifical Sand आवश्यक त्या तपासण्या करुन वापरणेत आलेली आहे.

आता ठेकेदार यांनी दि.३१/१२/२०१८ व दि.०१/०१/२०१९ रोजीचे पत्राने असे कळविले आहे की, दर्शनरांग प्रकल्पासाठी नैसर्गिक वाळुचे उपलब्धतेबाबत कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, वैजापूर व संगमनेर तालुक्याचे तहसिल कार्यालयाकडे चौकशी केली असता वाळु लिलाव झालेला नसल्याने वाळु उपलब्ध नसल्याबाबत सबंधीत तहसिलदार यांनी लेखी पत्र दिले आहे. सदर तहसिल कार्यालयांकडील पत्रांनुसार अद्याप नैसर्गिक वाळू साठयाचे लिलाव झालेले नसल्याने त्यांचे कार्यक्षेत्रात वाळु उपलब्ध नाही. त्यामुळे सध्या नैसर्गिक वाळु उपलब्ध नाही.

या प्रकल्पासाठी दि.०५/०४/२०१८ रोजी झालेल्या निविदापूर्व बैठकीस अनुसरुन दि.१०/०४/२०१८ रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या Common Set of Deviation मध्ये पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. "…May be permitted only in emergency after satisfactory testing conforming to IS: 383-1970."

या कामाच्या निविदेमध्ये ठेकेदार यांचे माहितीकरीता सविस्तर BOQ ऑनलाईन अपलोड करणेत आलेले होते. त्यावेळी PWD SSR नुसार कॉंक्रीटींगचे कामाचे तपशिलामध्ये शेवटी पुढीलप्रमाणे वाक्य नमूद आहे. "…With Natural Sand / VSI Quality Artificial Sand."

प्रस्ताव– सदर प्रकल्पासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७२७ नुसार ठेकेदार यांना दि.३१/१२/२०१८ अखेर नैसर्गिक वाळू वापरणेस परवानगी देणेत आली होती. तसेच या कालावधीनंतर नैसर्गिक वाळूचे उपलब्धतेबाबत आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात यावा असे ठरले आहे. भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांनी दि.३१/१२/२०१८ व दि.०१/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये राहाता, कोपरगांव, श्रीरामपूर, संगमनेर , वैजापूर या तालुक्यात नैसर्गीक वाळू उपलब्ध होत नसलेबाबत कळविले आहे. तसेच संबंधीत तालुक्याचे तहसिलदार यांनी अनुक्रमे दि. २७,२८ /१२/२०१८ व दि.३१/१२/२०१८ चे पत्राव्दारे वाळुचे लिलाव अद्याप झालेले नसलेबाबत कळविले आहे. सदरहु प्रकल्प ०१ वर्षाचे आत म्हणजे दि.१८/१०/२०१९ रोजी पूर्ण करणे अपेक्षीत आहे. निविदा शर्तीत नमूद केलेनुसार VSI Quality Artificial Sand वापरणेबाबत तसेच नैसर्गीक वाळूचा पुरेशा प्रमाणात उपलब्धतेबाबत आढावा घेऊन प्रशासकीय स्तरावर वेळोवेळी आढावा घेवून VSI Quality Artificial Sand वापरणेबाबत सदरहु प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार भानू कन्ट्रक्शन, मुंबई यांनी केलेल्या विनंतीनुसार माहे मार्च-२०१९ किंवा नैसर्गीक वाळू उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नियोजीत श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकामासाठी Artifical Sand वापरुन आवश्यक strength मिळेल या अटीच्या अधिन राहुन Artifical Sand वापरण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **संस्थानकरीता अद्यावत अग्निशमन वाहनाचे बॉडी बांधणीकामी प्राप्त झालेल्या ई – निविदेतील न्युनतम दर धारक श्री टेकॉन, मेदक हैद्राबाद यांचेसमवेत चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** कायदयातील तरतुदी - अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ सर्वसाधारणपणे , विश्वस्त व्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन , देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. असे नमूद आहे.

पार्श्वभुमी- संस्थानकरीता अदयावत अग्निशमन वाहन खरेदीकामी संस्थानने खेरदी करण्यात आलेल्या भारत बेंझ चेसीवर बॉडी बांधणी व इतर साहित्य खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत वेबसाईट www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई निविदा यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेली होती. अग्निशमन वाहन बॉडी बांधणी व वाहनांतील साहित्याबाबत कमर्शिअल बीड दि.२९.०६.२०१८ रोजी उघडण्यात आले. त्यानुसार खालील तिन पुरवठाधारकांचे वाढीव दर प्राप्त झालेले होते.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| ०१ | HI TECH SERVICES | १,७६,१८,६००/- |
| ०२ | WADIA BODY BUILDERS | २,०४,५६,५००/- |
| ०३ | N K FIRE & SAFETY | १,९६,२३,८३०/- |

उपरोक्त तीन बॉडी बांधणीधारकांनी दिलेल्या दरापैकी अ.नं. ०१ हायटेक सर्व्हीसेस,पुणे यांचे दर न्युनतम दर होते. परंतू संदर्भ क्र. १ मधील मंजुर रकमेपेक्षा न्युनतम दरधारक यांचे दर खुपच जास्त असलेकारणाने मा.उपजिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, सातांक्रुज मुंबई यांचेमार्फत अग्निशमन वाहन खरेदीबाबत माहिती घ्यावी असे सुचित केलेप्रमाणे उपरोक्त संदर्भ क्रं ०४ नुसार अग्निशमन सेवा संचालनालय,सातांक्रुझ मुंबई यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला होता. त्यानुसार महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा संचालनालय , सातांक्रुझ मुंबई यांचा मेल इकडील कार्यालयास प्राप्त होवून अग्निशमन वाहनाचे बॉडी बांधणीमध्ये आवश्यक बदल करणेबाबत सुचित केलेले होते.

त्यानुसार अग्निशमन सेवा संचालनालय यांचे कार्यायलयाने सुचित केलेप्रमाणे अग्निशमन वाहनाची बॉडी बांधणी केल्यास अंदाजे रक्कम रु ४५ लाख (**GST सह** ) किमंत कमी होवून सदरचे अग्निशमन वाहनाचे बॉडी बांधणीस १ कोटी ३० लाख पर्यत खर्च अपेक्षित असल्याने सदर शासनाची मान्यता घेणेकामी सदर प्रस्तावास मा.व्य.समितीची मान्यता घेणेस तसेच शासनाची वाढीव खर्चास मान्यता मिळेपर्यत संस्थानमार्फत अग्निशमन वाहनाची बॉडी बांधणी करीता रि टेंडर प्रक्रिया राबविणेस उपरोक्त संदर्भ क्रं.०२ नुसार मान्यता घेण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार फायर ॲण्ड सेफ्टी विभागामार्फत फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली असुन दि.२४.१२.२०१८ रोजी टेक्नीकल बीड उघडून निविदाधारकांचे सर्व कागदपत्रे तपासण्यात आले असता त्यामध्ये खालील ०३ निविदाधारक पात्र झाले.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | शेरा | दि.०३.०१.२०१९ रोजीचे खेरदी समितीचे तुलनात्मक तक्त्यातील दर |
|---|---|---|---|
| ०१ | देवी फायर सर्व्हिसेस,सोलापूर | पात्र | ५९,९४,०००/- |
| ०२ | विजय फायर सर्व्हिसेस, मुंबई | पात्र | ५३,१०,०००/- |
| ०३ | श्री टेकॉन मेदक,हैद्राबाद | पात्र | **४५,९३,५०४/-** |

उपरोक्त पात्र निविदाधारकांचे कमर्शिअल बिड दि.०३/०१/२०१९ रोजी उघण्यात आले असून उपरोक्त पात्र निविदाधारकांपैकी अ.नं.०३ श्री टेकॉन मेदक,हैद्राबाद यांचे न्युनतम दर प्राप्त झालेले आहे.

विभागाचा अभिप्राय– संस्थानकरीता अदयावत अग्निशमन वाहन खरेदीकामी रि टेंडर प्रक्रिया राबविणेत आली असून सदर प्रक्रियेमध्ये श्री टेकॉन मेदक,हैद्राबाद यांचे न्युनतम दर प्राप्त झालेले असून न्युनतम दर धारक यांचेकडून संस्थानने खेरदी केलेल्या भारत बेंझ कंपनीचे चेसीवर अग्निशमन वाहनांची बॉडी बांधणीकामी संबंधीतांशी अंतीम वाटाघाटी,करारनामा करुन चेसी ताब्यात देणेबाबत सदरचा विषय मा.व्य.समितीचे मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

करीता...

अ. अग्निशमन वाहन बॉडी बांधणीकामी ई-निविदाप्रक्रियेतील न्युनतम दरधारक श्री टेकॉन हैद्राबाद यांना मा.व्य.स.सभेपुढे अंतीम वाटाघाटी करणेकामी बोलविणेस मान्यता असावी.

ब. श्री टेकॉन हैद्राबाद यांचेशी करारनामा करुन त्यांचे ताब्यात संस्थानमार्फत खेरदी करण्यात आलेली चेसी देवून चेसीवर अग्निशमन वाहनांची बॉडी बांधणी करुन घेणेस मान्यता असावी.

उपरोक्त **अ** आणी **ब** बाबत मा.व्य.समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२५ **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदाप्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक श्री टेकॉन मेदक, हैद्राबाद यांचे प्रतिनिधी श्री.किशोर हे आजचे व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकरीता अद्यावत अग्निशमन वाहनाचे बॉडी बांधणीकामी निम्नतम निविदाधारक श्री टेकॉन मेदक, हैद्राबाद यांचे निम्नतम दर रक्कम रु.४५,९३,५०४/-मात्र स्विकारणेत येऊन त्यांचेशी करारनामा करुन त्यांचे ताब्यात संस्थानमार्फत खरेदी करण्यात आलेली चेसी देऊन चेसीवर Specification नुसार अग्निशमन वाहनांची बॉडी बांधणी करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- फायर ॲन्ड सेफ्टी विभाग)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.११ **सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण कामकाजासाठी संस्थानचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन आलेले प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४मधिल कलम १७(०२)(ग) अन्वये, विश्वस्त व्यवस्थेच्या हिशोबाची, राज्य शासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करील,तसेच कलम २९(०१) मध्ये अन्वये. "समिती त्या विश्वस्तव्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा दि.३१मार्च, रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीयवर्षाचा लेखापरिक्षकांचा अहवाल, तसेच ज्यांना या विश्वस्त व्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्विकारणा-या संस्थेची (संपूर्ण पत्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला त्या वर्षाच्या ३० सप्टेंबरच्या आत सादर करील." अशी तरतुद आहे.

अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन वैधानिक लेखापरिक्षक नेमणुकी करिता संस्थानचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यात येऊन आलेले प्रस्ताव खरेदी समितीचे सभेत उघडून पात्र लेखापरिक्षण लेखापरिक्षण लेखापरिक्षण संस्थांच्या फी नुसार तुलनात्मक तक्ता मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केला जातो. वैधानिक लेखापरिक्षक नेमणुकी करिता सदर प्रस्ताव मा. विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात येतो. अशाप्रकारे मागील आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता मे.मुकुंद एम. चितळे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस, मुंबई यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन विधी व न्याय विभागामार्फत रु.१,७७,०००/- इतकी फी तसेच प्रत्यक्ष अनुषंगिक खर्च इतक्या मानधनावर करण्यात आली होती.

आर्थिक वर्ष २०१८-१९ लवकरच पुर्ण होत असुन, वैधानिक लेखापरिक्षक नेमणुकी कामी निकोप स्पर्धा होण्याच्या दृष्टीने संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन नामांकित साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून अपेक्षित फी नमुद करुन प्रस्ताव मागविण्यास व विहीत वेळेत आलेले प्रस्ताव मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थाच्या फि चा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात येऊन, आलेले प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षक नेमणुक करणेकामी संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन नामांकित साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून अपेक्षित फी नमुद करुन प्रस्ताव मागविण्यास व विहीत वेळेत आलेले प्रस्ताव मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थाच्या फि चा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात येऊन, आलेले प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१२ **सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षण नेमणूक करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन आलेले प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहारांसंबंधीत केंद्र व राज्य शासनाकडून विविध कायदे पारित होतात. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो. वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता

येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्यासाठी अंतर्गत लेखापरिक्षण संस्थेची नियुक्ती केली जाते. अधिनियमातील तरतुदीनुसार वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक मा. विधी व न्याय विभागामार्फत केली जाते. तथापी सासंवि-२०१७/१२९४/प्र.क्र.१३४/का.१६/ दि.०८.११.२०१७ चे पत्रान्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम-२००४ मध्ये विश्वस्तव्यवस्थेच्या हिशेबाची, राज्य शासन निर्देश देईल. अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यंत वार्षिक लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील, अशी तरतुद करण्यात आली आहे. सदर तरतुद विचारात घेता श्री साईबाबा संस्थानच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नियुक्तीप्रमाणेच अंतर्गत लेखा परिक्षणासाठी लेखापरिक्षकांची नियुक्ती शासन मान्यतेनेच करणे आवश्यक आहे. सबब, याप्रमाणे भविष्यात कार्यवाही करण्यात यावी. " असे कळविले आहे.

मा. विधी व न्याय विभागाचे सासंवि-१०१८/१०२४/प्र.क्र.११८/का.१६/ दि.२५.०९.२०१८ आदेशान्वये आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो. सीए, पुणे. यांची रु.६,००,०००/- फी तसेच इतर कर व अनुशंगिक खर्च या अटी शर्तीवर अंतर्गत लेखापरिक्षक महणुन नियुक्ती करण्यात आली होती.

आर्थिक वर्ष २०१८-१९ लवकरच संपत असुन, पुढील आर्थिक वर्ष २०१९-२० करिता अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्ती होणेकामी निकोप स्पर्धा होण्याच्या दृष्टीने वैधानिक लेखापरिक्षक नियुक्तीप्रमाणे संस्थानचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन नामांकित साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून अपेक्षित फी नमुद करुन प्रस्ताव मागविण्यास व विहीत वेळेत आलेले प्रस्ताव मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थाच्या फि चा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात येऊन, प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूक करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन नामांकित साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून अपेक्षित फी नमुद करुन प्रस्ताव मागविण्यास व विहीत वेळेत आलेले प्रस्ताव मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थाच्या फि चा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात येऊन, प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **माहे ऑक्टोबर-२०१८ व नोव्हेंबर-२०१८ जमा खर्च तक्तयाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे ऑक्टोबर-२०१८ व नोव्हेंबर-२०१८ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा- खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे–

| अ.नं. | महिना | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | ऑक्टोबर-२०१८ | ४४,८९,७८,७३७/- | ३८,१७,२५,८३५/- |
| ०२ | नोव्हेंबर-२०१८ | ४६,८२,९९,८२९/- | १८,६७,७४,११०/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे ऑक्टोबर-२०१८ व नोव्हेंबर-२०१८ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.२८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, ऑक्टोबर-२०१८ व नोव्हेंबर-२०१८ जमा खर्च तक्तयाचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.१४** **श्री भवानी माता सेवा समिती यांचे माँ भवानी हॉस्पीटल नागपुर यांना "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडून रक्कम रु. २.३५ कोटी अनुदान देणेचे करारनामाच्या मसुद्यास मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री भवानी माता सेवा समितीच्या वतीने पारडी भागात "मॉं भवानी हॉस्पीटल" चे निर्माण कार्य सुरू झाले आहे. या हॉस्पीटलमध्ये गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी अत्याधुनिक सुविधेसह एकूण ११० खाटांची व्यवस्था करण्यात येत आहे. संस्थेचा हा उपक्रम प्राप्त दान व सामाजिक सहभागातून पुर्ण होणार आहे. या हॉस्पीटल करिता लागणा-या वैद्यकीय उपकरणापैंकी "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी रक्कम रु. २.३५ कोटी आर्थिक सहाय्य मिळण्याची विनंती अध्यक्ष श्री भवानी माता सेवा समिती, पारडी जि. नागपूर यांनी केली होती.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.३०६ मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी रक्कम रुपये २.३५ कोटी आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२.०५.२०१८ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर केला असता निर्णय क्र.३०६ पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- यावर सविस्तर चर्चा होऊन, मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी रक्कम रुपये २.३५ कोटी आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी छाननी समितीची व शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. त्यानुसार प्रस्ताव मा. छाननी समितीचे सभेत सादर केला असता खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

मा. छाननी समितीचा निर्णय:- मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी अर्थसहाय्य देणेबाबतचा प्रस्ताव मा. छाननी समितीचे दि.२२.०८.२०१८ रोजीचे सभेत सादर केला असता त्यावर निर्णय क्रं. ३७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

१) अनुदान मागणी रु. २.३५ कोटी मध्ये घ्यावयाच्या यंत्रसामुग्रीचे वर्गीकरण व अशी यंत्रसामुग्री ज्या इमारतीत ठेवली जाईल तीचे बांधकाम कधी पुर्ण होणार याची माहिती.

२) यंत्रसामुग्री निहाय अंदाजित किंमतीचे विवरण.

३) अंदाजित किंमतीसाठी मागविलेल्या दरांच्या कंपनीचे नाव,

४) सदर रकमेच्या विनियोगाचे हमीपत्र सर्व विश्वस्तांनी द्यावे.

५) सदर यंत्रसामुग्री किमान १० वर्ष विकता येणार नाही किंवा दुस-या संस्थेला देता येणार नाही असे हमिपत्र.

६) खरेदी करावयाच्या यंत्रसामुग्रीच्या देखभाल दुरुस्तीची व्यवस्था / तरतुद.

७) हॉस्पीटलच्या बॅलन्सशीटची पडताळणी केली असता संस्थानकडे मागणी केलेल्या खर्चाची पुर्तता करण्याइतपत असल्याचे दिसुन येते, त्यामुळे सदर हॉस्पीटलचे प्रतिनिधी यांना पुढील बैठकीत उपरोक्त बाबी कळवून चर्चेसाठी बोलविण्याचा निर्णय झाला.

त्यानुसार श्री भवानी माता सेवा समिती नागपूर यांनी उपरोक्त तपशीलाबाबत माहिती सादर केली आहे.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने प्रस्ताव मा. छाननी समितीचे दि. ०६.१०.२०१८ रोजीचे सभेत सादर केला असता निर्णय क्रं. ४३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

मा. छाननी समितीचा निर्णय- यावर सविस्तर चर्चा होऊन, छाननी समितीच्या दि.२२.०८.२०१८ रोजीच्या सभेमध्ये मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना "Equipment for Eye, Rediology Cardiology Department" साठी रक्कम रु.२.३५ कोटी आर्थिक मदत देण्याचा विषय चर्चिला गेला आहे. वरील संस्थेच्या कागदपत्रांची छाननी केल्यावर काही त्रुटी आढळल्या त्याअनुषंगाने दि.२२.०८.२०१८ रोजीच्या सभेतील विषय क्र.३ अन्वये पुर्तता करण्यासाठी म्हणून संबधित सेवासमितीचे प्रतिनिधी यांना बोलविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने सदरील सेवा समितीतर्फे दिलेला खुलासा खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | मागितलेला तपशील | सादर केलेली माहिती |
|---|---|---|
| १ | सदर यंत्रसामुग्री ज्या इमारतीत बसविणार आहे ती इमारत कधी पुर्ण होणार आहे. | संस्थेने इमारत पुर्ण झालेचे नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर प्रमाणपत्र सादर केले आहे . |
| २ | अनुदान मागणी रु द्यावयाच्याकोटी मध्ये ३५.२ . यंत्रसामुग्रीचे वर्गीकरण. | संस्थेने रेडिओलॉजी कलर डॉपलर मशीन व अतिदक्षता विभाग त्याचप्रमाणे डोळयांचा तपासणी मशीन असे वर्गीकरण केलेले आहे . |
| ३ | यंत्रसामुग्री निहाय अंदाजित किंमतीचे विवरण. | संस्थेने अनुक्रमे रेडिओलॉजी कलर डॉपलर मशीन व अतिदक्षता विभागासाठी एकूण ९३,५०,००० व डोळयांचा तपासणी मशीनसाठी |

| | | |
|---|---|---|
| | | १,४१,७३,५०० असे एकूण २,३५,२३,५०० विवरण सादर केले आहे . |
| ४ | अंदाजित किंमतीसाठी मागविलेल्या दरांच्या कंपनीचे नाव. | GE, Nidek/KLB, Zeiss, Appasamy, Opthrotronics, Opthoindia Inc, Alcon, Vison sales सविस्तर तपशील जोडलेला आहे . |
| ५ | सदर रकमेच्या विनियोगाचे हमीपत्र सर्व विश्वस्तांनी द्यावे . | प्रत्येक विश्वस्तांनी हमीपत्र स्टॅम्पपेपर वर सादर केले आहे |
| ६ | सदर यंत्रसामुग्री किमान १० वर्ष विकता येणार नाही किंवा दुस-या संस्थेला देता येणार नाही असे हमीपत्र. | हमीपत्र सादर केलेले आहे (AMC/CMC) |
| ७ | खरेदी करावयाच्याय यंत्रसामुग्रीच्या देखभाल दुरूस्ती व्यवस्था/तरतुद. | सदर यंत्रसामुग्रीची दुरुस्ती देखभालीची जबाबदारी मॉ भवानी सेवा समितीने घेतली आहे त्याबाबत लेखी पत्र सादर केले आहे . |
| ८ | हॉस्पीटलच्या बॅलन्सशीटची पडताळणी केली असता संस्थानकडे मागणी केलेल्या खर्चाची पुर्तता करण्याइतपत आर्थिक स्थिती असल्याचे दिसून येते याबाबत खुलासा . | याबाबतचा खुलासा सादर केलेला नाही. |

त्यावर विचार करता अतिदक्षता विभागासाठी म्हणून जी मागणी झाली आहे. ती इमारतीसाठी नसुन रु.११ लक्ष किंमतीच्या Portable shared system ICU मध्ये लागणाऱ्या (Ultra Sound) उपकरणाची आहे.

संस्थेचे सहसचिव श्री.नितीन अरासपुरे यांनी असा खुलासा केला की, ज्यावेळी आर्थिक मदतीची मागणी / प्रस्ताव श्री साईबाबा संस्थानकडे केला होता, त्याआगोदर पासुन सेवासमितीचे बांधकाम प्रगतीपथावर होते. ताळेबंदात शिल्लकेत दिसत असलेली रक्कम ही वरील बांधकामासाठी बहुतांश वापरण्यात आली. संस्थेने नागपुर सुधार प्रन्यास यांचेतर्फे दि.२१.०९.२०१८ रोजी Occupancy Certificate (भोगवटा प्रमाणपत्र) काही शर्तीवर मंजूर करण्यात आले आहे. छाननी समितीच्या आजच्या बैठकीमध्ये सर्व कागदपत्रांचे अवलोकन करुन व हमीपत्राचे आधारावरुन श्री भवानी माता सेवा समिती, पुनापुर रोड, पाडी, नागपुर यांना "Equipment for Rediology Cardiology Department" यासाठी यंत्रसामुग्री खरेदीसाठी लागणारे अर्थसहाय्य रु.२.३५ कोटी मागणीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेत यावा, तसेच तो संबधीताकडे पाठविण्याची तजवीज करण्यात यावी. संचालकांचे हमीपत्र त्यांचेवर बंधनकारक राहील. व यंत्रसामुग्रीचा कुठल्याही प्रकारे दुरुपयोग झाल्यास व बेकायदेशीरपणे विक्री केल्यास, ती संचालक मंडळाची वैयक्तीक जबाबदारी धरण्यात येईल. याची जाणीव श्री भवानी माता सेवा समिती, नागपूर समिती सदस्यांना समक्ष देण्यात आली.

शासन निर्णयः- विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. सासंवि १०१८/१७०२/प्र. क्र. १९४ /का.१६ दि. ०३.जानेवारी २०१९ अन्वये खालीलप्रमाणे शासन निर्णय पारीत झाला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम -२००४ मधील कलम २१ (२) (एक) मधील तरतूदीनुसार श्री भवानी माता सेवा समिती संचलीत मॉ भवानी हॉस्पिटल, नागपुर यांना "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" साठी रक्कम रुपये २.३५ कोटी इतके अर्थसहाय्य श्री साईबाबा संस्थानकडून देण्यास उपरोक्त शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

१) श्री साईबाबा संस्थानच्या अनुदानातून खरेदी करण्यासाठी प्रस्तावित केलेली यंत्रसामुग्री ही स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेने पारदर्शकरित्या खरेदी करावी. सदर यंत्रसामुग्री प्रचलित बाजार किंमतीपेक्षा (Market rate) जास्त किंमतीने खरेदी करू नये. खरेदी प्रक्रियेच्या अभिलेखांची प्रत संस्थानला माहितीस्तव सादर करावी.

२) प्रस्तावित यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी संस्थानकडून दिल्या जाणा-या अनुदानातून बचत झाल्यास सदर रक्कम संस्थानला परत करावी लागेल. तथापि अनुदानापेक्षा जास्त रक्कम खर्च झाल्यास वाढीव खर्च संस्थेला करावा लागेल.

३) धर्मादाय रुग्णालयासाठी असलेल्या शासनाचे नियमानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील रुग्णांसाठी खाटा राखीव न ठेवल्यास संस्थानतर्फे देण्यात येणारे अनुदान वसुलपात्र राहील. याबाबत धर्मादाय आयुक्तांचे प्रमाणपत्र दरवर्षी संस्थानला सादर करावे लागेल.

४) सदर यंत्रसामुग्री श्री भवानी माता सेवा समितीस किमान १० वर्ष विकता येणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही. यंत्रसामुग्री कार्यान्वित असलेबाबत तसेच वर्षभरात सदर यंत्रसामुग्रीचा लाभ घेतलेल्या रुग्णांच्या संख्येबाबतचे प्रमाणपत्र दरवर्षी एप्रिल महिन्यात संस्थानला सादर करावे लागेल.

५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी अनुदान वाटप करण्यापूर्वी उपरोक्त यंत्र सामुग्री वापरण्यासाठी आवश्यक त्या मुलभुत सोयी - सुविधा व सदर यंत्रसामुग्री हाताळणारे कर्मचारवृंद आहेत किंवा नाहीत याची खातरजमा करून घ्यावी.

६) सदर श्री भवानी माता सेवा समितीने ज्या कामासाठी निधी दिला आहे त्याच कामासाठी निधी वापरणे आवश्यक आहे.

७) सदर यंत्राची दुरूस्ती देखभालीची जबाबदारी मॉ भवानी सेवा समितीने घेणे आवश्यक आहे.

८) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत उपलब्ध करून देण्यात येणा-या अर्थसहाय्याद्वारे खरेदी करण्यात येणारी यंत्रसामुग्री ज्या ठिकाणी बसविण्यात येणार आहे, त्या ठिकाणी दर्शनीभागावर “श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य” असा फलक लावण्यात येईल.

९) सदर अनुदानातुन यंत्र सामुग्री खरेदी केल्यानंतर खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र श्री भवानी माता सेवा समितीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना सादर करणे आवश्यक राहिल.

१०) उपरोक्त अटी व शर्तीबरोबरच संस्थानतर्फे लागू करण्यात येणा-या इतर अनुषांगिक अटी व शर्तींचा समावेश असलेला करारनामा श्री भवानी माता सेवा समिती, चे मॉ भवानी माता हॉस्पीटल नागपुर यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याशी एक महिना कालावधीत करून देणे बंधनकारक राहील. सदर करारनाम्याची प्रत शासनास सादर करण्यात यावी.

उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रं. १० अन्वये श्री भवानी माता सेवा समिती, पारडी, नागपूर यांचे मॉ भवानी हॉस्पीटल नागपूर यांना “Equipments for Eye, Rediology Cardiology Department” साठी अर्थसहाय्य देतांना शिर्डी संस्थानतर्फे लागू करण्यात येणा-या अटी व शर्तीचा समावेश असलेला करारनामा करण्यात यावा, असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार श्री भवानी माता सेवा समिती, पारडी, नागपूर यांचे मॉ भवानी हॉस्पीटल नागपूर यांचेशी करारनाम्याच्या मसुदा खालीलप्रमाणे

:- करारनामा :-

करारनामा दिनांक

करारनामा लिहून घेणार :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
(पार्टी नं १) ता. राहाता जि. अहमदनगर करिता व तर्फे
मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा
प्राधिकृत प्रतिनिधी

करारनामा लिहून देणार :- श्री भवानी माता सेवा समिती नागपुर यांचेकरिता,
(पार्टी न . २ ) यांचे प्राधिकृत प्रतिनिधी,

विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्रं. सासंवि १०१८/१७०२/प्र.क्र. १९४/का.१६ दि. ०३.जानेवारी २०१८ नुसार श्री भवानी माता सेवा समिती संचलित मॉ भवानी हॉस्पीटल या रुग्णालयाला “Equipments for Eye, Rediology Cardiology Department” मध्ये (रेडिओलॉजी कलर डॉपलर मशीन, अतिदक्षता विभाग, डोळे तपासणी मशीन साठी) रक्कम रु. २,३५,००,०००/- इतके अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेतलेला आहे. विधी व न्याय विभाग यांचे शासन निर्णयानुसार श्री भवानी माता सेवा समिती यांचेशी करारानामा करून घेणे आवश्यक आहे. करारनाम्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

अटी व शर्ती :-

१) पार्टी नं. २ यांनी श्री साईबाबा संस्थानच्या अनुदानातून खरेदी करण्यासाठी प्रस्तावित केलेली यंत्रसामुग्री, (रेडिओलॉजी कलर डॉपलर मशीन, अतिदक्षता विभाग, डोळे तपासणी मशीनची) पारदर्शकरित्या खरेदी करावी. निविदा प्रक्रिया ही स्पर्धात्मक प्रक्रियेने राबवावी. सदर यंत्रसामुग्री प्रचलित बाजार किंमतीपेक्षा (Market rate) जास्त किंमतीने खरेदी करू नये. खरेदी प्रक्रियेच्या अभिलेखांची प्रत संस्थानला सादर करणे बंधनकारक राहील.

२) प्रस्तावित यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी संस्थानकडून दिल्या जाणा-या अनुदानातून बचत झाल्यास सदर रक्कम संस्थानला परत करणे पार्टी नं.२ यांचेवर बंधनकारक राहील. तथापि अनुदानापेक्षा जास्त रक्कम खर्च झाल्यास वाढीव खर्च पार्टी नं. २ यांना करावा लागेल.

३) धर्मादाय रुग्णालयासाठी असलेल्या शासनाचे नियमानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील रुग्णांसाठी खाटा राखीव ठेवणे बंधनकारक राहील तसेच अल्पदरात/ इतर रुग्णालयांच्या तुलनेत अत्यल्प दरात सेवा पुरविणे बंधनकारक राहील. याबाबतचा तपशील धर्मादाय आयुक्त कार्यालय यांचेमार्फत प्रमाणित करून संस्थानला सादर करावे, तसे न केल्यास सदर अनुदान वसुलपात्र राहील.

४) श्री भवानी माता सेवा समितीचे मॉ भवानी हॉस्पीटल यांना सदर यंत्रसामुग्री किमान १०वर्ष विकता येणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही. यंत्रसामुग्री कार्यान्वित असलेबाबत तसेच वर्षभरात सदर यंत्रसामुग्रीचा लाभ घेतलेल्या रुग्णांच्या संख्येबाबतचे प्रमाणपत्र दरवर्षी एप्रिल महिन्यात संस्थानला सादर करणे बंधनकारक राहील.

५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत देण्यात आलेला निधीचा वापर ज्या कामासाठी निधी दिला आहे त्याच कामासाठी निधी वापरणे बंधनकारक आहे. सदर निधी विनावापर ठेवल्यास किंवा ज्या यंत्रसामुग्री खरेदीसाठी दिला आहे त्यासाठी न वापरल्यास निधी वितरणाच्या दिनांकापासून व्याजासह पार्टी नं. १ ला परत करणे पार्टी नं. २ वर बंधनकारक राहील.

६) सदर यंत्राची दुरूस्ती देखभालीची जबाबदारी मॉ भवानी सेवा समितीची राहील.

७) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत उपलब्ध करून देण्यात येणा-या अर्थसहाय्याद्वारे खरेदी करण्यात येणारी यंत्रसामुग्री ज्या ठिकाणी बसविण्यात येणार आहे, त्या ठिकाणीचे दर्शनीभागावर "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य" असा कायमस्वरुपी दिसेल असा फलक लावणे बंधनकारक राहील.

८) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून देण्यात आलेल्या अनुदानातुन यंत्र सामुग्री खरेदी केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे पार्टी नं. २ यांना बंधनकारक राहिल.

९) अनुदान दिलेल्या रकमेतून खरेदी केलेली यंत्रसामुग्रीसाठी इतर कोणत्याही संस्थेकडून अनुदान मागता/स्विकारता येणार नाही.

१०) यंत्रसामुग्रीचा कुठल्याही प्रकारे दुरूपयोग झाल्यास व बेकायदेशीरपणे विक्री केल्यास श्री भवानी माता सेवा समिती, संचालक मंडळाची वैयक्तीक जबाबदारी राहील.

वरील अटी व शर्ती उभयतांस मान्य आहेत.

पार्टी नं. १
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे

पार्टी न. २
श्री भवानी माता सेवा समिती नागपुर यांचेवतीने,

मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा
प्राधिकृत प्रतिनिधी

प्राधिकृत प्रतिनिधी

उपरोक्त प्रमाणे करारनामा मसुदा मान्यता तथा निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री भवानी माता सेवा समिती,पारडी,नागपूर यांचे मॉ भवानी हॉस्पीटल नागपूर यांना "Equipments for Eye, Radiology Cardiology Department" साठी संस्थानमार्फत रक्कम रुपये २.३५ कोटी इतके अर्थसहाय्य देण्यासाठी शासन निर्णयानुसार प्रस्तावीत करण्यात आलेल्या करारनाम्याच्या पुढील मसुद्यास मान्यता देण्यात आली.**

**:- करारनामा :-**

**करारनामा दिनांक**

**करारनामा लिहून घेणार :- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
**(पार्टी नं १) ता. राहाता जि. अहमदनगर करिता व तर्फे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा**
**प्राधिकृत प्रतिनिधी**

**करारनामा लिहून देणार :- श्री भवानी माता सेवा समिती नागपुर यांचेकरिता,**
**(पार्टी न . २ ) यांचे प्राधिकृत प्रतिनिधी,**

**विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्रं. सासंवि १०१८/१७०२/प्र.क्र. १९४/का.१६ दि. ०३.जानेवारी २०१८ नुसार श्री भवानी माता सेवा समिती संचलित मॉ भवानी हॉस्पीटल या रुग्णालयाला "Equipments for Eye, Rediology Cardiology Department" मध्ये (रेडिओलॉजी कलर डॉपलर मशीन, अतिदक्षता विभाग, डोळे तपासणी मशीन साठी) रक्कम रु. २,३५,००,०००/- इतके अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेतलेला आहे. विधी व न्याय विभाग यांचे शासन निर्णयानुसार श्री भवानी माता सेवा समिती यांचेशी करारनामा करून घेणे आवश्यक आहे. करारनाम्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे**

अटी व शर्ती :-

१) पार्टी नं. २ यांनी श्री साईबाबा संस्थानच्या अनुदानातून खरेदी करण्यासाठी प्रस्तावित केलेली यंत्रसामुग्री, (रेडिओलॉजी कलर डॉपलर मशीन, अतिदक्षता विभाग, डोळे तपासणी मशीनची) पारदर्शकरित्या खरेदी करावी. निविदा प्रक्रिया ही स्पर्धात्मक प्रक्रियेने राबवावी. सदर यंत्रसामुग्री प्रचलित बाजार किंमतीपेक्षा (Market rate) जास्त किंमतीने खरेदी करू नये. खरेदी प्रक्रियेच्या अभिलेखांची प्रत संस्थानला सादर करणे बंधनकारक राहील.

२) प्रस्तावित यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी संस्थानकडून दिल्या जाणा-या अनुदानातून बचत झाल्यास सदर रक्कम संस्थानला परत करणे पार्टी नं.२ यांचेवर बंधनकारक राहील. तथापि अनुदानापेक्षा जास्त रक्कम खर्च झाल्यास वाढीव खर्च पार्टी नं. २ यांना करावा लागेल.

३) धर्मादाय रुग्णालयासाठी असलेल्या शासनाचे नियमानुसार आर्थिक दृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील रुग्णांसाठी खाटा राखीव ठेवणे बंधनकारक राहील तसेच अल्पदरात/ इतर रुग्णांलयांच्या तुलनेत अत्यल्प दरात सेवा पुरविणे बंधनकारक राहील. याबाबतचा तपशील धर्मादाय आयुक्त कार्यालय यांचेमार्फत प्रमाणित करून संस्थानला सादर करावे, तसे न केल्यास सदर अनुदान वसुलपात्र राहील.

४) श्री भवानी माता सेवा समितीचे माँ भवानी हॉस्पीटल यांना सदर यंत्रसामुग्री किमान १०वर्ष विकता येणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही. यंत्रसामुग्री कार्यान्वित असलेबाबत तसेच वर्षभरात सदर यंत्रसामुग्रीचा लाभ घेतलेल्या रुग्णांच्या संख्येबाबतचे प्रमाणपत्र दरवर्षी एप्रिल महिन्यात संस्थानला सादर करणे बंधनकारक राहील.

५) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत देण्यात आलेला निधीचा वापर ज्या कामासाठी निधी दिला आहे त्याच कामासाठी निधी वापरणे बंधनकारक आहे. सदर निधी विनावापर ठेवल्यास किंवा ज्या यंत्रसामुग्री खरेदीसाठी दिला आहे त्यासाठी न वापरल्यास निधी वितरणाच्या दिनांकापासून व्याजासह पार्टी नं. १ ला परत करणे पार्टी नं. २ वर बंधनकारक राहील.

६) सदर यंत्राची दुरूस्ती देखभालीची जबाबदारी माँ भवानी सेवा समितीची राहील.

७) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत उपलब्ध करून देण्यात येणा-या अर्थसहाय्याद्वारे खरेदी करण्यात येणारी यंत्रसामुग्री ज्या ठिकाणी बसविण्यात येणार आहे, त्या ठिकाणीचे दर्शनीभागावर "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य" असा कायमस्वरुपी दिसेल असा फलक लावणे बंधनकारक राहील.

८) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून देण्यात आलेल्या अनुदानातुन यंत्र सामुग्री खरेदी केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे पार्टी नं. २ यांना बंधनकारक राहिल.

९) अनुदान दिलेल्या रकमेतून खरेदी केलेली यंत्रसामुग्रीसाठी इतर कोणत्याही संस्थेकडून अनुदान मागता/स्विकारता येणार नाही. तसेच संस्थानने दिलेल्या अर्थसहाय्यामधुन यंत्रसामुग्री खरेदी केल्याची खात्री होण्यासाठी वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल सादर करणे बंधनकारक राहिल.

१०) यंत्रसामुग्रीचा कुठल्याही प्रकारे दुरूपयोग झाल्यास व बेकायदेशीरपणे विक्री केल्यास श्री भवानी माता सेवा समिती, संचालक मंडळाची वैयक्तीक जबाबदारी राहील.

वरील अटी व शर्ती उभयतांस मान्य आहेत.

| पार्टी नं. १ | पार्टी न. २ |
|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी, | श्री भवानी माता सेवा समिती नागपुर यांचेवतीने, |
| श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे | |
| मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा | |
| प्राधिकृत प्रतिनिधी | प्राधिकृत प्रतिनिधी |

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१५ संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु. ६८,०१५/- मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद– व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.– १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु.

२०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक– खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

मागणी – पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | चालु आर्थिक वर्षात यापुर्वी अदा केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | शिंदे भाऊसाहेब बाबुराव<br>विभाग- ज्युनिअर कॉलेज<br>हुददा-ग्रंथपाल | वडिल | Diabetes & Renal treatement<br>मधुमेह, किडनी उपचार | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७२६७.०० | ७२६७.०० | ७४५८९.०० |
| २ | कविता शंतनु सरवार<br>विभाग-श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुददा-हिस्टोपॅथोलॉजिस्ट | वडिल | Chronic Renal Failure<br>किडनी उपचार | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ६३२९.०० | ६३२९.०० | २७५८३.०० |
| ३ | अभयकुमार शांताराम दुनाखे<br>विभाग- औ.प्र. सं.<br>हुददा – निर्देशक | स्वतः | HTN<br>रक्तदाब | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३४२६.०० | २९८७.०० | ५५६७०७.०० |
| | अ- एकूण रक्कम रु. | | | | | १७०२२.०० | १६५८३.०० | |
| | **ब. संस्थान रुग्णालयात उपचार न घेतलेले ,रेफर न केलेले ,रुग्णाचे वास्तव्य बाहेरगावी असल्याने निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतलेले** | | | | | | | |
| ४ | जोरी नितिन विजय<br>विभाग-लेखाशाखा<br>हुददा-लिपिक टंकलेखक | आई | UTI,SepsisWith Septic Shock,hyonatremia<br>किडनी संसर्ग,घबराट | डॉ.मुळे | मुळे हॉस्पिटल कोपरगांव | ६४४९१.०० | ५१४३२.०० | ००.०० |
| | ब- एकूण रक्कम रु. | | | | | ६४४९१.०० | ५१४३२.०० | |
| | अ+ब - एकूण रक्कम रु. | | | | | ८१५१३.०० | ६८०१५.०० | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.६८,०१५/-इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णालयातील औषध भांडार विभागात औषधे उपलब्ध नसल्याने बाहेरुन विकत घेतलेली आहेत.तसेच निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतलेले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त०४ कर्मचारी /कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.६८,०१५/-मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त प्रस्तावातील ०४ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु. ६८,०१५/- मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ **श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींग कामाकरीता ई-निविदा मागविण्याबाबत.**

प्रस्ताव- दि.१४ नोव्हेंबर २०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत विषय नं.०२ व निर्णय क्र.९१५ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी मे.स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांचे वार्षिक रु.२,३२,९९,७०४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असा निर्णय झाला होता. सदर निर्णयानुसार

मे.स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांना जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/पीआरओ/१७०४/२०१७, दि.३० नोव्हेंबर २०१७ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामआऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी दि.०१ जानेवारी २०१८ ते दि.३१ डिसेंबर २०१८ या १ वर्ष कालावधीचा कार्यादेश देण्यात आलेले होता.

दि.३१ डिसेंबर २०१८ रोजी सदर कामाची मुदत संपुष्टात येणार असल्याने नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत कार्यवाही माहे– सप्टेंबर २०१८ रोजी सुरु करण्यात आलेली होती.

त्यानुसार इकडील कार्यालयामार्फत दि.२६ सप्टेंबर, २०१८ रोजी टिपणी सादर केली असता, सदर टिपणीवर "श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह संपुर्ण स्वच्छतेकामी केमिकल्स व साहित्य / सामुग्रीसह एक वर्षासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबविताना सदर कामासाठी वापरण्यात येणा-या प्रतिदिन १५३ कर्मचारी संख्यानमुद करणेऐवजी कामाचा विस्तृत तपशिल देऊन निविदा काढणेबाबत माहिती घेऊन प्रस्ताव सादर करणेबाबत" निर्देशीत करण्यात आलेले होते.

सदर कामकाजाबाबत दैनंदिन नियोजन व नियंत्रण हे दोन्ही रुग्णालयाकडील अधिसेविकांमार्फत होत असते, त्यामुळे दि.२६ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या टिपणीवरील निर्देशानुसार सबंधीत अधिसेविकांकडे माहिती घेऊन, त्याबाबत वरिष्ठांना अवगत करण्यात आले. त्यानंतर दि.१४.११.२०१८ रोजी पुन्हा मागीलप्रमाणेच मनुष्यबळासह प्रस्ताव सादर करण्यात आला असता, सदर प्रस्तावावर "साईआश्रम, द्वारावती भक्तनिवासस्थान साठी सध्या आऊटसोर्ससाठीची निविदा प्रक्रिया चालु आहे. त्यामध्ये आऊटसोर्सच्या निविदेमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल प्रस्तावित आहेत.त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचा विषय व ई-निविदा तयार करावी", असे निर्देश देण्यात आले होते.

सदर निर्देशाप्रमाणे सबंधीत निवासस्थान विभागांकडे माहिती घेतली असता, त्यावेळी सबंधीत विभागांचे आऊटसोर्सची निविदा अंतिम झालेली नसल्याने दि.१९ नोव्हेंबर, २०१८ रोजी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह संपुर्ण स्वच्छतेकामाबाबत पुर्वीच्या ठेकेदारास निविदा प्रक्रिया पुर्ण होऊपावेतो मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता, त्यास मान्यता देण्यात आली. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला असता, दि.१३ डिसेंबर २०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं.३९ व निर्णय क्रं.७६६ नुसार निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत तथापी जास्तीत जास्त तीन महिने पावेतो सध्याकार्यरत असलेल्या मे. स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडून निविदेतील अटी व शर्तीनुसार मंजुर दरात काम करुन घेणेसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता मिळाली आहे.

विभागाचा अभिप्राय– इकडील कार्यालयाकडील दि.१४.११.२०१८ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार साईआश्रम भक्तनिवासस्थान विभागांकडून त्यांचेकडील आऊटसोर्स ई-निविदेची माहिती दि.२४.१२.२०१८ रोजी प्राप्त झालेलीआहे. त्यानुसार सदर कामासाठी निविदा प्रक्रिया राबवितांना मनुष्यबळाची संख्या नमुद न करता कामाच्या व्याप्ती वस्वरुप तसेच त्यासाठी आवश्यक मशिनरी, उपकरणे, केमिकल साहित्य/ सामुग्री यांचा उल्लेख करता येईल, असे नम्र मत आहे.

सदर कामासाठी मागील दरामध्ये १५% वाढ ग्राह्य धरल्यास दोन्हीरुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह संपुर्ण स्वच्छतेचे–हाऊसकिपींगचे कामाकरीता एकवर्षासाठीचा ठेका दिल्यास प्रति महिना अंदाजे रक्कम रु.२२,३२,८८८/- (पुर्णांकित २३,००,०००/- अक्षरी- तेवीस लाख रु.) मात्र याप्रमाणे वार्षीक रक्कम रु.२,७६,००,०००/-(अक्षरी- दोन कोटी शहात्तर लाख रु.)मात्र खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह संपुर्ण स्वच्छता- हाऊसकिपींग करिता केमिकल्स व साहित्य/सामुग्रीसह एक वर्षासाठीचा ठेका देणेकामी प्रती महिना अंदाजे रक्कम रु.२३,००,०००/-मात्र याप्रमाणे वार्षीक रक्कम रु.२,७६,००,०००/-मात्रचे खर्चास व ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छता हाऊसकिपींग कामाकरीता केमिकल्स व साहित्य/सामुग्रीसह एक वर्ष कालावधीकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,७६,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन, हाताळणी, प्रक्रिया व विल्हेवाट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुगणालय , शिर्डी येथे पर्यावरण व वनसंरक्षण खाते मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि.२० जुलै १९९८ रोजी जैवीक वैद्यकीय निरुपयोगी व

टाकाऊ वस्तुंचे विल्हेवाटीकरीता काही नियम व अटी व कायदापालनासाठी जारी केलेल्या अधिसुचनेनुसार जैव वैद्यकीय घनकचरा निर्मिती, हाताळणी व व्यवस्थापन करणेत येत आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये निर्माण होणारा जैव वैद्यकीय घनकचरा नियमावलीनुसार शास्त्रोक्त पध्दतीचे व्यवस्थापन हाताळणी, प्रक्रिया व विल्हेवाट लावणे गरजेचे असल्यामुळे सदरचे काम महाराष्ट्र नियंत्रण (म.प्र.नि.) मंडळाची मान्यता प्राप्त असलेल्या संस्थेस देणे बंधनकारक आहे. त्यानुसार म.प्र.नि. मंडळाची मान्यता प्राप्त अहमदनगर जिल्हयासाठी अधिकृत एकमेव संस्था असल्यामुळे मे.बायोक्लिन सिस्टीम, अहमदनगर यांचेकडे २००६ पासून दोन्ही हॉस्पिटलमधुन निघणारा जैव वैद्यकिय घनकचरा पुढील प्रक्रिया व विल्हेवाटीकरीता दररोज देणेत येत आहे. त्यामुळे हॉस्पिटलमध्ये कुठल्याही प्रकारचा जैव वैद्यकिय घनकचरा शिल्लक राहत नाही.

सदर कंपनीला संपूर्ण अहमदनगर जिल्हा हद्दीतील वैद्यकीय घनकचरा वाहतूक व विल्हेवाट लावणेकामी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून २००४ पासून परवाना मिळालेला आहे. त्यानुसार संपुर्ण अहमदनगर जिल्हा हद्दीतील वैद्यकीय संस्थाना आजपर्यंत सेवा पुरवत आहेत. श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटल्स हे अहमदनगर जिल्हा हद्दीत येत असल्यामुळे जैव वैद्यकीय घनकच-याचे प्रक्रिया व विल्हेवाट लावणे करीता मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांना देणेस बंधनकारक आहे. त्यानुसार मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांना एसएसएस/एसएसबीएच/बीएमडब्लुएम/वशी/१४४२/२०१७ दिनांक १२/१०/२०१७ अन्वये दि.०१/०९/२०१७ ते ३१/०८/२०१८ या कालावधीसाठी प्रति महिना एकुण रु. ७२,०००/-या दराने कंपनीला कार्यादेश देण्यात आला होता.

मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांचे बरोबरच्या करारनाम्याची मुदत दि.३१ ऑगस्ट २०१८ रोजी संपुष्टात आली होती. परंतु मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांनी दि. १९/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे अहमदनगर महानगरपालिका, आरोग्य विभागांशी झालेला करार दि.२१ जुलै २०१८ रोजी संपुष्ठात आल्याचे कळवून "आम्ही आपणास कळवू इच्छितो की, अहमदनगर महानगरपालिका बरोबरचा आमचा पुर्वीचा करारनामा दिनांक २१ जुलै २०१८ रोजी संपुष्ठात आलेला आहे. पुढील कालावधीकरीता आम्हाला अहमदनगर महानगरपालिकेकडून जैव-वैद्यकीय कचरा संकलन वाहतूक नियंत्रण व प्रकल्पावर विल्हेवाट करण्याकरिता खाजगी एजन्सी म्हणुन ई निविदेच्या प्रक्रियेतुन आमची नियुक्ती करण्यात आलेली आहे. आम्ही ई-निविदेत सादर केलेले दर अंतीम करण्या सबंधित अहमदनगर महानगरपालिका व अहमदनगर जिल्हातील सर्व इंडीयन मेडीकल असोसिएशन, निमा संघटना, हामिओपॅथिक संघटना, व्हेटरनरी संघटना तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकीत्सक , वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचे कार्यकक्षेत येणा-या व जैव वैद्यकिय कचरा निर्माण करणा-या सर्व संस्था यांची एकत्र आमच्या सोबत लवकरच बैठक घेतली जाणार आहे. सदर बैठकीत जैव-वैद्यकिय घनकचरा व्यवस्थापन, हाताळणी, प्रक्रिया व विल्हेवाट लावणेकामीचे कोटेशन सादर करु शकतो. वरील नमुद केलेल्या परिस्थितीमुळे सध्या

आम्ही आपणास कोटेशन सादर करु शकत नाही. तरी देखील पुढील दर निश्चित होई पर्यत व आपला प्रस्ताव मान्यता होईपर्यत आमच्या कंपनीकडून जैव-वैद्यकीय कचरा संकलन वाहतूक नियंत्रण व विल्हेवाट साठीची सेवा चालु राहील, याची आम्ही आपणास हमी देतो. दर निश्चित झाल्यानंतर २२ जुलै २०१८ पासून आपणास नवीन दर लागु केला जाईल याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती असे कळविले आहे."

मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांनी दिनांक ०६/१२/२०१८ रोजीचे पत्रासोबत अहमदनगर महानगरपालिका, आरोग्य विभाग यांचे पत्र क्र. १२८१ दि.२६/१०/२०१८ रोजीचे मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांना दर निश्चित केलेबाबतचे पत्र सादर केलेले आहे. त्या पत्रातील नमुद केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | क्लिनिकल हेल्थकेअर एस्टाब्लिशमेंट | अहमदनगर शहर व अहमदनगर तालुक्यातील दर ( प्रति दिन ) | जिल्हयाकरिता दर |
|---|---|---|---|
| १ | खाजगी रुग्णालय /नर्सिंग होम | १ ते १० खाटांचे दवाखाने- रु ५.७५/-<br>११ ते २० खाटांचे दवाखाने रु.६.००/-<br>२० खाटांच्या वरील दवाखाने रु.६.५०/- | १ ते १० खाटांचे दवाखाने – रु.६.७५/-<br>११ ते २० खाटांचे दवाखाने –रु.७.००/-<br>२० खाटांच्या वरील दवाखाने – रु.७.५०/- |
| २ | क्लिनिक | रु. २५०/- प्रति माह | रु.३५०/- प्रति माह |
| ३ | डे-केअर सेंटर करिता ( २ खाटापर्यत ) | रु.३५०/- प्रति माह | रु.४५०/- प्रति माह |
| ४ | पॅथोलॉजी लॅब | रु.५००/- प्रति माह छोटे लॅब<br>रु. १०००/- प्रति माह पॅथोलॉजीस्ट लॅब | रु. ७५०/-प्रति माह छोटे लॅब रु.१५००/- प्रति माह पॅथोलॉजीस्ट लॅब |

| अ.क्र. | क्लिनिकल हेल्थकेअर एस्टाब्लिशमेंट | अहमदनगर शहर व अहमदनगर तालुक्यातील दर ( प्रति दिन ) | जिल्हयाकरिता दर |
|---|---|---|---|
| ५ | रक्तपेढी | रु. ३०००/- प्रति माह | रु.४०००/- प्रति माह |
| ६ | पशु वैद्यकीय दवाखाने | रु.२०००/- प्रति माह | रु.३०००/- प्रति माह |
| ७ | शासकीय जिल्हा रुग्णालय / उप-जिल्हा रुग्णालय | रु. ३.२५/- प्रति खाट, प्रति दिन | रु. ३.७५/- प्रति खाट, प्रति दिन |
| ८ | प्राथमिक आरोग्य केंद्रे | महानगरपालिका नि:शुल्क | महानगरपालिका नि:शुल्क |
| ९ | शासकीय ग्रामीण रुग्णालये | रु. ३.२५/- प्रति खाट प्रति दिन | रु.३.७५/- प्रति खाट, प्रति दिन |
| १० | इतर | रु.४५/-प्रति किग्रॅ | रु. ५५/- प्रति किग्रॅ |

उपरोक्त दराबाबत मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांना श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागु होत असलेल्या दराबाबत तपशिल मागविला असता त्यांनी दि.२४/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे खुलासा कळवून लवकरात लवकर आपण दोन्ही हॉस्पीटल , ब्लड बॅक व पॅथोलॉजी लॅब यासाठी जैव-वैद्यकीय विल्हेवाट प्रकल्पामध्ये सभासद नोंदणी करावी व पुढील कालावधी करीता करारनामा व वर्क ऑडर लवकरात लवकर करावी असे कळविले आहे.

“ दि.२३/१०/२०१८ रोजी मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त अहमदनगर महानगरपालिका, मा.अतिरिक्त आयुक्त अहमदनगर महानगरपालिका, मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी अहमदनगर महानगरपालिका, मा.उप-प्रादेशीक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ अहमदनगर, मा.जिल्हा शल्य चिकीत्सक जिल्हा सामान्य रुग्णालय अमदनरगर, मा.जिल्हा आरोगय अधिकारी जिल्हा परिषद अहदनगर , आणि उपायुक्त पशु संवर्धन अहमदनगर जिल्हा तसेच सर्वमा.अध्यक्ष इंडियन मेडिकल असोसिएशन अहमदनगर शहर / जिल्हा, सर्व मा.अध्यक्ष इंडियन हॉस्पिटल ऑनर्स असोसिएशन अहमदनगर शहर/ जिल्हा ,सर्व मा.अध्यक्ष निमा संघटना अहमदनगर शहर / जिल्हा,सर्व मा.अध्यक्ष होमिओपॅथीक संघटना अहमदनगर शहर / जिल्हा आणि जैव-वैद्यकीय कचरा निर्माण करणा-या नगर शहर व जिल्हयातील सर्व दवाखाने व आस्थापना यांच्या प्रतिनिधी सोबत बैठक घेवून वैद्यकीय संस्थाना आकारण्यात येणारे दर निश्चित करावयाचे ठरविले त्याप्रमाणे आम्ही आपणास कळविले आहे.

दिनांक २३/१०/२०१८ रोजी सदरची बैठक जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात झाली. सदर बैठकीत वैद्यकीय संस्थाना आकरण्यात येणारे दर निश्चित करण्यात आले. निश्चित झालेल्या दरा संबंधीचे पत्र आम्हास दि.२६/१०/२०१८ रोजी प्राप्त झाले. त्यानुसार आम्ही आपणास कळवु इच्छितो की मा.केंद्र शासन व महाराष्ट्र नियंत्रण मंडळाच्या जैव –वैद्यकीय कचरा व्यवस्थापन हाताळणी व विल्हेवाट नियमावली २०१६ प्रमाणे आपले दोन्ही हॉस्पीटल, ब्लड बॅक व पॅथोलॉजी लॅब यांची स्वतंत्र नोंद करणे बंधनकारक आहे.म्हणून आम्ही आपणास विनंती करितो कि , आपल्या दोन्ही हॉस्पीटलचे स्वतंत्र नोंदणी करावी. खाटाची संख्या ही बॉम्बे नर्सिंग अॅक्ट प्रमाणे नोंदवावी. तसेच आापल्या दोन्ही हॉस्पीटलमध्ये असणा-या ब्लड बॅक व पॅथ लॅब यांची स्वतंत्र नोंद करावी सदरच्या दर पत्रकाप्रमाणे आपणाला आकरण्यात येणारे दर खालीलप्रमाणे असतील.

१. प्रति खाट प्रति दिन रु.७.५०/-
२. ब्लड बॅक प्रति महिना रु.४०००/-
३. पॅथोलॉजी लॅब प्रति महिना रु.१५००/-

सदरचे दर हे दिनांक २२/०७/२०१८ पासुन पुढील पाच वर्षासाठी लागू राहतील. तसेच बेडची संख्या बॉम्बे नर्सिंग अॅक्ट सर्टिफिकेट प्रमाणे ग्राहय धरली जाईल याची नोंद घ्यावी. ”

विभागाचा अभिप्राय:- जैव वैद्यकीय घनकचरा पुढील प्रक्रिया व कार्यवाहीकरीता सार्वजनिकरित्या जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थान करणा-या संस्थेस देणे बंधनकारक आहे. त्यानुसार म.प्र.नि.मंडळाची मान्यता प्राप्त अहमदनगर जिल्हयासाठी अधिकृत एकमेव संस्था मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर असल्यामुळे त्यांचेकडून दोन्ही हॉस्पिटलमधून निघणारा जैव वैद्यकीय घनकचरा पुढील प्रक्रिया व विल्हेवाटीकरीता दररोज देणेस बंधनकारक आहे असे नम्र मत आहे.

मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांचा हॉस्पीटलबरोबरचा करारनामा दि.३१/०८/२०१८ मध्ये संपुष्ठात आला आहे. परंतु त्यांनी असे म्हटले आहे की २२ जुलै २०१८ पासून नविन दर लागू होतील परंतू त्यांना १/०९/२०१८ पासून नविन दर लागू करता येईल असे नम्र मत आहे.

मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांनी सेवा शुल्क रुपये ७.५० प्रती दिन प्रती खाट, ब्लड बॅक प्रति महिना रु.४०००/-, पॅथोलॉजी लॅब प्रति महिना रु.१५००/- कोटेशन दिलेले आहे.

त्यानुसार आपले श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाची खाटांची संख्या ६०० असुन त्यांचे सेवा शुल्क रुपये १३५०००/- तसेच ब्लड बॅक प्रति महिना रु.४०००/- , दोन पॅथोलॉजी लॅब प्रति महिना रु.३०००

सर्व मिळून प्रति महिना रु. १४२०००/- (अक्षरी एक लाख बेचाळीस हजार रुपये ) खर्च येणार आहे. बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांनी पुढील पाच वर्षाच्या कालावधीसाठी मागणी केलेली आहे.

मागणी:- महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमानुसार मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांना श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील निघणारा जैव वैद्यकीय घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाटीकरीता घेवुन जाणेकामी पुढील पाच वर्षाच्या कालावधीसाठी सर्व करांसहीत प्रती महिना रु १४२०००/- ( अक्षरी रुपये एक लाख बेचाळीस हजार मात्र ) चर्चा व वाटाघाटी करुन दर निश्चित करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमानुसार श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील निघणारा जैव वैद्यकीय घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाटीकरीता घेऊन जाणेकामी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची मान्यता प्राप्त अहमदनगर जिल्हयासाठी अधिकृत एकमेव संस्था बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांचे पुढील पाच वर्ष कालावधीसाठीचे नवीन दर प्रति खाट प्रति दिन रु.७.५०, ब्लड बॅंक प्रति महिना रु.४०००/- व पॅथोलॉजी लॅब प्रति महिना रु.१५००/-मात्र स्विकारणेत येऊन सदरचे नविन दर दि. १/०९/२०१८ पासून लागु करण्यास, तसेच याकामी येणाऱ्या सर्व करांसहीत प्रति महिना रक्कम रु.१,४२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरकामी दि. १/९/२०१८ पासुन पुढील पाच वर्ष कालावधीसाठी बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांचेशी करारनामा करुन घेण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१८ **श्रींचे दर्शनासाठी येणारे व्ही.आय.पी. व देणगीदार साईभक्तांचे सत्कारासाठी छापील शॉल देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद – अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

प्रस्तावना–श्रींचे दर्शनासाठी येणा-या महत्वाचे, अतिमहत्वाचे तसेच देणगीदार साईभक्तांचा संस्थानमार्फत सत्कार करण्यात येतो. सदर सत्कारासाठी शॉल, उदी पॅकेट तसेच काहि अतिमहत्वाचे साईभक्तांना मूर्ती देण्याची प्रथा आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त देणगीदार साईभक्त श्री.के.बालासारावणन, एम.डी. साई लोगबाला (ओपीसी) प्रा.लि., इरोदे, तामिळनाडू यांनी श्रींचे दर्शनार्थ येणारे व्ही.आय.पी. तसेच देणगीदार साईभक्तांचा सत्कारकामी लागणा-या शॉल्स (श्री साईबाबा संस्थानचे नाव व शताब्दी चिन्ह असलेल्या) एकूण २०३६ नग देणगी स्वरुपात दिल्या होत्या. सदरहू शॉल्सपैकी काही शॉल्सचा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात सत्कारासाठी वापर करण्यात आलेला आहे.

त्यास अनुसरुन देणगीदार साईभक्त श्री.के.बालासारावणन, मॅनेजिंग डायरेक्टर, साई लोगबाला (ओपीसी) प्रा.लि., ईरोडे, तामिळनाडू यांनी उपरोक्त विषयांकीत दि.०२/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

“१) आम्ही मंदिराकरीता व्हिआयपी तसेच देणगीदार साईभक्तांचे सत्कारकामी उत्तम क्वॉलिटीच्या व आकर्षक अशा शॉल्स कमीत कमी ०५ वर्षभर श्री साईबाबा संस्थानला देण्यास तयार आहे.

२) तसेच सदरच्या शॉल्सवर श्रीसाईबाबांचा फोटोसह श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असे उठावदार नाव असलेल्या उत्तम नक्षीकाम केलेल्या शॉल्स देणार असल्याचे तसेच आमचेकडून त्याचा इतरत्र कुठेही अयोग्य वापर करणार नसल्याचे त्यांनी कळविलेले आहे.

३) संस्थानकरीता तयार करण्यात आलेल्या शॉल्स आम्ही स्थानिक बाजारात विकणार नाही याची ग्वाही देतो.

४) तसेच त्यांनी प्रत्येक महिन्यात येणा-या पौर्णिमेच्या दिवशी तसेच प्रत्येक गुरुवारी त्यांचेकडून श्री साईबाबांना ड्रेस/ वस्त्र परीधान करणेस परवानगी मिळणेस विनंती केली आहे. ”

विभागाचा अभिप्राय – देणगीदार साईभक्त यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी काळात व्हीआयपी साईभक्तांचे तसेच देणगीदार साईभक्तांचे सत्कारकामी संस्थानचे नावास शताब्दी चिन्हाच्या लोगोसह २०३६ नग शॉल्स देणगी स्वरुपात दिलेल्या आहे. सदर देणगीदार साईभक्ताकडून व्हीआयपी व देणगीदार साईभक्तांचे सत्कारकामी येथून पुढेही उपरोक्त नमूद केलेप्रमाणेच्या शॉल्स पुर्वीप्रमाणे पूढील ०५ वर्षाकरीता देणगी स्वरुपात घेता येईल. देणगीदार साईभक्त यांचेशी झालेल्या चर्चानूसार सदरहू सत्कारकामी प्रिंटेड मोठी शॉलची रक्कम रु. २३०/- प्रती नग व पट्टी शॉलची रक्कमरु.५५/- प्रती नग असल्याचे त्यांनी सांगीतले आहे. त्यानुसार प्राप्त एकूण आवक नगांची (क्वॉटीटीची) वर नमुद प्रती नगाचे किंमतीनूसार देणगीदार साईभक्त यांना देणगी पावती देता येईल, असे मत आहे.

तसेच श्रींचे चारही आरत्यांना ड्रेस/वस्त्र परीधान करणेकामी संस्थानमार्फत लकी ड्रॉ काढण्यात येऊन त्यानूसार श्रींना वस्त्र परीधान करण्यात येतात. तसेच महिन्याचे प्रत्येक गुरुवारचे दिवशी काकड आरतीसाठी, रविवारचे माध्यान्ह आरतीसाठी व सणाचे, उत्सवाचे दिवशीचे आरतीसाठी मा.विश्वस्त यांचेकरीता राखीव ठेवण्यात येते. परंतू देणगीदार साईभक्त यांनी अ.नं.४ मध्ये नमूद केलेनूसार प्रत्येक महिन्याचे पौर्णिमेला व प्रत्येक महिन्याचे गुरुवारी त्यांचेकडून श्रींना वस्त्र परीधान करणेकामी त्यांनी विनंती केलेनूसार, सदरहू दिवशीचे उर्वरीत आरत्यांसाठी ड्रेस/वस्त्र परीधान करणेकामी त्यांना परवानगी देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक वाटते, असे मत आहे.

प्रस्ताव– तरी देणगीदार साईभक्त श्री. के. बालासारावणन, ईरोडे, मॅनेजिंग डायरेक्टर, साई लोगबाला (ओपीसी) प्रा.लि., ईरोडे, तामिळनाडू यांचेकडून विनंती केलेनूसार त्यांनी पत्रात नमूद केलेप्रमाणे "श्री साईबाबांचा फोटोसह श्री साईबाबा संस्थानचे नाव असलेल्या " शॉल्स श्री साईंचे दर्शनार्थ येणा-या व्हीआयपी व देणगीदार साईभक्तांचे सत्कारकामी कमीत कमी ०५ वर्षाकरीता देणगी स्वरुपात स्विकारणेस मान्यता मिळणेकामी व देणगीदार साईभक्त यांना प्राप्त आवक नगाप्रमाणे देणगी पावती देणेस तसेच त्यांनी मागणी केलेनूसार प्रत्येक महिन्याचे पौर्णिमेला व प्रत्येक महिन्याचे गुरुवारी आरतीकरीता श्रींना त्यांचेमार्फत ड्रेस/वस्त्र परीधान करणेस परवानगी देणेबाबतचे प्रस्तवावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणारे व्हीआयपी व देणगीदार साईभक्तांचे सत्कारासाठी देणगीदार साईभक्त श्री. के. बालासारावणन, ईरोडे, मॅनेजिंग डायरेक्टर, साई लोगबाला (ओपीसी) प्रा.लि., ईरोडे, तामिळनाडू यांचेकडून श्री साईबाबांचा फोटो व श्री साईबाबा संस्थानचे नाव असलेल्या शॉल्स देणगी स्वरुपात स्विकारणेस, तसेच श्री. बालासारावणन यांना वर्षातुन ५ ते ६ वेळा त्यांचे मागणी प्रमाणे आरतीचे सशुल्क पासेस प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१९ **महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग कडील शासन निर्णय क्र. सासंवि-१०१७/१८१६/प्र.क्र. २०/ का.१६, दि. २८/१२/२०१८ अन्वये सुधारीत श्री साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या मान्यतेनुसार कार्यवाही करणेस व त्या अनुशंगीक बाबीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेबाबत.**

प्रस्ताव- **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः-**

१) कलम १७ (१) मध्ये,"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम १७ (२-ण) मध्ये,मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

३) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी
सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) – श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

४) कलम २१ (१क-२) मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर,विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापराता व खर्च करता येईल.

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेला एखादी

नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखाभाल करुन घेणेसाठी छाननी समितीचे मान्यतेने अर्थसाहय्य देण्याची तरतुद आहे.

५) कलम-१७ (३) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही", अशी तरतुद आहे.

प्रस्तावनाः-विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/ १८१६/ प्र.क्र.२०/का.१६, दि.२८/१२/२०१८ अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्री साईबाबा संस्थन विश्वस्तव्यवस्था, अधिनियम, २००४ कलम १७(२-ण) मध्ये मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्याला चालना देण्यात येईल, अशी तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत महाराष्ट्र राज्यातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रुपये ५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणेकरीता रुपये २५ कोटी येणा-या खर्चास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात यावे. अशी रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणा-या संस्थेने महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीकडे आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वजा करुन) भरावी व कागदोपत्री पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानातर्फे रु.५ लक्ष इतकी रक्कम स्वयंसेवी संस्थेनी भरल्यानंतर संस्थेतर्फे रु.५ लक्ष अनुदान परस्पर डिलरला / कंपनीला देण्यात यावी.

१) संबंधित संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.

२) रुग्णवाहिकेसाठी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा बोलेरो BS-IV हे मॉडेल निश्चित करण्यात यावे.

३) प्रत्येक रुग्णवाहिकेस GPS System बसवून घेण्यात यावी.

४) रुग्णवाहिकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल.

५) रुग्णवाहिकेवर श्री साई रुग्णवाहिका असे नमूद करण्यात यावे.

६) रुग्णवाहिका नियमावली अंतिम करुन शासन मान्यतेस्तव तात्काळ सादर करण्यात यावी. सदर नियमावलीस शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर नियमावलीमध्ये नमूद अटी व शर्तीनुसार महाराष्ट्रातील नोंदणीकृत संस्थांना प्रत्येकी एक याप्रमाणे रुग्णवाहिके करीता अनुदान देण्यात यावे.

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संजय भास्कर काळे यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचीकेत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ व दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाची मा.कोर्टाचा पुढील आदेश होईपावेतो स्थगीत ठेवणेची मागणी केलेली आहे. या करीता संस्थानचे विधी विभागामार्फत दि.०९/०९/२०१७ चे टिपणीनुसार ॲड. नितीन भवर यांना वकीलपत्र दिलेले आहे. सदर जनहित याचिकेचा नंबर ८६/२०१८ असुन पुढील सुनावणी दि.१०/०१/२०१९ रोजी आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार संस्थानने करावयाची अनुशंगिक कामेः-

०१) उपरोक्त शासन निर्णयातील अटी व शर्ती अ.नं.०१ मध्ये "शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात यावे. अशी रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणा-या संस्थेने महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीकडे आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वजा करुन) भरावी व कागदोपत्री पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानातर्फे रु.५ लक्ष इतकी रक्कम स्वयंसेवी संस्थेनी भरल्यानंतर संस्थेतर्फे रु.५ लक्ष अनुदान परस्पर डिलरला / कंपनीला देण्यात यावी"असे नमुद करण्यात आलेले आहे.

त्या ऐवजी खालील प्रमाणे शासन निर्णयात दुरुस्ती करीता प्रस्ताव सादर करवा लागेल.

शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात/रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात यावे. अशी रक्कम मागणी करणा-या व संस्थानने निश्चित केलेल्या पात्र संस्थेने आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वजा करुन) डिलर किंवा कंपनीकडे भरावी व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता

करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानातर्फे रु.५ लक्ष इतकी अनुदान रक्कम स्वयंसेवी संस्थेला न देता संस्थानने डिलरला / कंपनीला देण्यात यावी.

०२) रुग्णवाहिका देणे करीता कंपनी व मॉडेल निश्चिती बाबत दि.२५/०२/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय क्र.१४ व निर्णय क्र.१४ नुसार,महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे मॅनेजींग डायरेक्टर हे साईभक्त असुन त्यांचे कंपनीमध्ये तयार होणारे पहिले वाहन ते नियमितपणे श्री साईबाबा संस्थानला देणगी देत असतात. तसेच संस्थान मध्ये पाण्याची कमतरता पाहता त्यांनी संस्थानसाठी रु. दोन कोटी मात्र खर्च करुन संस्थानला पाणी साठवण तलाव तयार करुन दिलेला आहे. साई-रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता २५ रुग्णवाहिका देणगी स्वरुपात देत आहेत. तसेच या प्रकल्पाकरीता लागणा-या बोलेरो रुग्णवाहिका सदर कंपनी संस्थानला विशेष सवलतीच्या दरात देण्यास तयार आहेत.

या सर्व बाबींचा विचार करता, तसेच सदर साई रुग्णवाहिका प्रकल्प महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम, आदीवासी, पहाडी इत्यादी भागात राबवावयाचा असल्यामुळे या भागांचा भौगोलिक परिस्थितीचा विचारकरता या प्रकल्पाकरीता महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे महिंद्रा बोलेरो BS-IV(डिझेल) हे वाहन महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडून थेट खरेदी करणे संस्थान हिताचे असल्याने ते त्यांच्याकडून खरेदी करण्यात याव्यात. असे ठरले होते.

आता, उपरोक्त शासन निर्णयातील अट नं.०३ मध्ये रुग्णवाहिकेसाठी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा बोलेरो BS-IV हे मॉडेल निश्चित करण्यात यावे. असे नमुद करण्यात आलेले आहे. यावर महिंद्रा ॲण्ड महिंद्रा या एकाच कंपनीच्या रुग्णवाहिका का निश्चित केलेल्या आहेत अशा तक्रारी येत आहेत.

या करीता सदर शासन निर्णयात रुग्णवाहिका उत्पादन करणा-या कंपन्यांसोबत मा.व्यवस्थापन समितीने चर्चा वाटाघाटी करुन कंपनी, मॉडेल व दर निश्चित करावे, अशी दुरुस्ती करावी लागेल.

०३) सदर शासन निर्णयात रुग्णवाहिकांवर GPSSystem बसविणेचे नमुद केले आहे. GPSSystem बसविलेस त्यावर नियंत्रण ठेवावे लागणार आहे.सदरचे GPS सिस्टीमवर संस्थानचे नियंत्रण ठेवावयोच असल्यास त्याकरीता नियंत्रण कक्ष करावा लागेल. त्यामुळे संस्थानची जबाबदारी वाढेल. तसेच सर्व ५०० रुग्णवाहिकांवर एकाच कंपनीची GPS सिस्टीम बसविणे करीता नियमानुसार निविदा प्रक्रिया राबवावी लागेल.

शासन निर्णयानुसार अनुदान दिलेनंतर सदर रुग्णवाहिका संबधीत संस्थाच्या नावावर रजिस्ट्रेशन होऊन त्यांचे मालकीच्या होणार आहेत. त्यामुळे रुग्णवाहिका बाबत सर्वस्वी जबाबदारी त्यांची राहील. सदरची शासन निर्णयातीलGPS सिस्टीम बाबतची अट शिथिल करावी किंवा कसे याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

०४) यापुर्वी रुग्णवाहिका प्रकल्पांतर्गत रुग्णवाहिका मागणी करीता संस्थानचे विहीत नमुन्यात-१५३ सेवाभावी संस्था व विहीत नमुन्यात नसलेले-२३२ संस्थाकडून अर्ज आलेले आहेत. तथापी आता उपरोक्त् निर्णयानुसार रुग्णवाहिके ऐवजी अनुदान देण्याचे असलेने पुर्वीचे रुग्णवाहिका मागणी करीता आलेले अर्ज दप्तरी दाखल करुन नवीन शासन निर्णयानुसार व त्या अनुशंगीक नियमावली नुसार विहीत नमुन्यात अनुदान मागणी अर्ज फॉर्म तयार करुन त्यास व्यापक प्रसिध्दी देवुन नव्याने अर्ज मागवावे लागतील.

तरी उपरोक्त शासन निर्णयातील खालील बाबींवर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणे आवश्यक आहे.

१) उपरोक्त शासन निर्णयातील अटी व शर्ती अ.नं.०१ मधील मजकुरात दुरुस्ती करणे बाबत निर्णय घेणे.

२) उपरोक्त शासन निर्णयातील अटी व शर्ती अ.नं.०३ मधील कंपनी, मॉडेल व दर निश्चिती बाबत मजकुरात दुरुस्ती करणे बाबत निर्णय घेणे.

३) शासन निर्णय रुग्णवाहिकांना GPS सिस्टीम बसविणे बाबत निर्णय घेणे.

४) उपरोक्त बाबींवर झालेल्या निर्णयानुसार कार्यवाहीस शासन मान्यता मिळालेनंतर अनुदान मागणी करीता विहित नमुन्यात फॉर्म तयार करुन अर्ज मागविणे बाबत निर्णय होणे.

मागणीः- तरी विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/ प्र.क्र.२०/का.१६, दि.२८/१२/२०१८ नुसार कार्यवाही करणे करीता उपरोक्त अ.नं. १ ते ५ बाबींवर निर्णय होणे व त्यानुसार करावयाचे कामांबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**१. शासन निर्णयानुसार शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात यावे. अशी रक्कम मागणी करणा-या व संस्थानने निश्चित केलेल्या पात्र संस्थेने आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वजा करुन) डिलर किंवा कंपनीकडे भरावी व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानातर्फे रु.५ लक्ष इतकी अनुदान रक्कम स्वयंसेवी संस्थेला न देता संस्थानने डिलरला / कंपनीला देण्यास मान्यता देण्यात आली.**

२. **संबंधित संस्थेशी करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

३. **सदर साई रुग्णवाहिका प्रकल्प महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम, आदीवासी, पहाडी इत्यादी भागात राबवावयाचा असल्यामुळे या भागांचा भौगोलिक परिस्थितीचा विचार करता या प्रकल्पाकरीता महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे महिंद्रा बोलेरो BS-IV(डिझेल) हे वाहन GPS System सह महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडून थेट खरेदी करणे संस्थान हिताचे असल्याने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.**

**५०० रुग्णवाहीका खरेदी करावयाच्या असल्याने महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांना रुग्णवाहीकेची किंमत निश्चीत करणेकामी व्यवस्थापन समिती सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले.**

४. **रुग्णवाहिकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल.**

५. **रुग्णवाहिकेवर श्री साई रुग्णवाहिका असे नमूद करण्यात यावे.**

६. **रुग्णवाहिका नियमावली अंतिम करुन शासन मान्यतेस्तव तात्काळ सादर करण्यात यावी. सदर नियमावलीस शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर नियमावलीमध्ये नमूद अटी व शर्तीनुसार महाराष्ट्रातील नोंदणीकृत संस्थांना प्रत्येकी एक याप्रमाणे रुग्णवाहिकेकरीता अनुदान देण्यात यावे.**

**(कार्यवाही- वाहन विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२० **महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग कडील शासन निर्णय क्र. सासंवि-१०१७/१८१६/प्र.क्र. २०/ का.१६, दि. २८/१२/२०१८ अन्वये सुधारीत श्री साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या मान्यतेनुसार कार्यवाही करणेस व त्या अनुशंगीक नियमावलीस व इतर बाबीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेबाबत.**

प्रस्ताव- **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः-**

१) कलम १७ (१) मध्ये,"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे,भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम १७ (२-ण) मध्ये,मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

३) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) – श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

४) कलम २१ (१क-२) मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापराता व खर्च करता येईल.-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेला एखादी नोंदणीकृत सावर्जनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखाभाल करुन घेणेसाठी छाननी समितीचे मान्यतेने अर्थसाहय्य देण्याची तरतुद आहे.

५) कलम-१७ (३) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता,

भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही", अशी तरतुद आहे.

प्रस्तावनाः- दि.२६/०७/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२० निर्णय क्र.४८० व दि.२२/०८/२०१८ चे सभेतील विषय क्र.१ निर्णय क्र.५०६(१) नुसार, प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प मान्यतेसाठी मा.छाननी समितीचे शिफारशीने शासनाकडे फेर प्रस्ताव पाठविण्यात यावा.

२) याकामी संस्थानने पात्र सेवाभावी संस्थाना प्रत्येकी रुपये ५ (पाच) लाख उपलब्ध करुन द्यावेत, उर्वरीत रक्कम संबधीत संस्थेने द्यावी.

३) संबधीत संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.

४) रुग्णवाहीकेसाठी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीचे BS-VI हे मॉडेल निश्चित करणेत यावे.

५) प्रत्येक रुग्णवाहीकेस GPS System बसवुन घेण्यात यावी.

६) रुग्णवाहीकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबधीत संस्थेची राहील.

७) रुग्णवाहीकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे सौजन्याने 'श्री साई शताब्दी रुग्णवाहीका' असे नमुद करण्यात यावे.

तसेच दि.२६/०७/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२१ निर्णय क्र.४८१ नुसार, सविस्तर चर्चाहोऊन, पुढील प्रमाणे नियमावलीस मान्यता देण्यात आली.

१) स्वयंसेवी संस्था ही मुंबई सार्वजनिक संस्था १९५० (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट १९५०) खाली नोंदणीकृत होऊन कमीतकमी तीन वर्ष कार्यरत असावी. (अथवा सोसायटी रजि. ॲक्ट खाली किंवा मा.धर्मदाय आयुक्त यांचेकडे ३ वर्षापुर्वी नोंदलेली असावी).

२) ज्या स्वयंसेवी संस्था या प्रकल्पात समाविष्ट होवु शकतात त्यांना या प्रकल्पातील जास्तीत जास्त एक रुग्णवाहिकेसाठी अनुदान देय राहील.

३) सदर अनुदानातुन केवळ रुग्णवाहिकाच खरेदी करता येईल.

४) संस्थान अनुदानातुन रुग्णवाहिका खरेदी केले बाबतचा पुरावा संस्थानकडे सादर करावा लागेल.

५) रुग्णवाहिकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व साई शताब्दी साई रुग्णवाहिका असे नाव टाकणे बंधनकारक राहील.

६) सेवाभावी संस्थेचे लेखापरिक्षण नियमित (प्रति वर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३ (तिन) वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

७) सेवाभावी संस्थेची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) किमान १०(दहा) लाख रुपये असावी.

८) सेवाभावी संस्थेवर कोणतेही आर्थिक गैरव्यवहारातील गुन्हे नोंदविलेले नसावेत. या बाबत संस्थेने रु.१००/- चे गैरन्यायीक स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्र द्यावे.

९) स्वयंसेवी संस्थेला देण्यात येणा-या अनुदानातुन घेतलेली रुग्णवाहिका ही फक्त रुग्णांना सेवा देणेकरीताच वापरावी लागेल. यात कोणत्याही प्रकारची प्रवासी अगर अवैध वाहतुक करता येणार नाही.

१०) सदर रुग्णवाहिकेचे पीयुसी, फिटणेस,टॅक्स इत्यादी कामे व त्याकरीता येणारा खर्च संबधीत संस्थेस करावा लागेल.

११) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत अटी व शर्तीचा स्वतंत्र करारनामा रु.६००/- चे गैरन्यायीक स्टॅम्प पेपरवर करुन द्यावा लागेल. या करीताचा खर्च संबंधीत सेवाभावी संस्थेस करावा लागेल.

१२) कायदेरशिर बाब उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र राहाता, कोपरगांव व औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

१३) संस्थान अनुदानातुन खरेदी केलेली रुग्णवाहिका स्वयंसेवी संस्थेला पुढील १० वर्ष इतर कोणासही चालविण्यास देता येणार नाही अथवा हस्तांतरीत करता येणार नाही.

उपरोक्त निर्णयानुसार, सदर फेर प्रस्तावास व त्या सुधारीत नियमावलीस मान्यता मिळणेस बाबतचा प्रस्ताव दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

दि.२६/०७/२०१८ व दि.२२/०८/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२० निर्णय क्र.४८०व विषय क्र.२१ निर्णय क्र.४८१ नुसार, फेर प्रस्तावास व त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुधारित नियमावलीस मान्यता मिळणेस तसेच सदरचा सुधारित नियमावलीस मान्यता मिळणे बाबतचा दि.२२/०८/२०१८ रोजीचे मा.छाननी समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होते.

दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार,यावर सविस्तर चर्चा होऊन, विषय नं.६ वर प्रशासकीय अडचणी पाहिल्यानंतर पुढे येणाऱ्या अडचणी व कायदेशीर बाबी लक्षात घेता, शिर्डी संस्थानतर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील नोंदणीकृत प्रत्येकी एक  या प्रमाणे ५०० सामाजीक संस्थाना (मुंबई सार्वजनिक संस्था कायदा १९५०किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकासाठी संस्थानतर्फे रु.५.०० लक्ष कायमस्वरुपी अनुदान म्हणून देण्यात यावी. अशी रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणाऱ्या संस्थेने महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे आगाऊ रक्कम (५ लक्ष वजा करुन) भरावी व कागदोपत्री पुर्तता करावी अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानतर्फे रु.५लक्ष अनुदान परस्पर डिलरला / कंपनीला देण्यात यावे. रुग्णवाहिकेची मालकीही स्वयंसेवी संस्थेची राहील. मात्र त्यांना संस्थानच्या नावाने हमी पत्र द्यावे लागेल,की ते सदर रुग्णवाहिका विकणार नाही व सर्व कार्यवाही संस्थानचे नियमा प्रमाणे करतील, सदर छाननी समितीची शिफारस व्यवस्थापन समितीपुढे ठेवून तदनंतर शासनाकडे पाठवावी, असे ठरले.

तसेच दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतील विषय क्र.०७ निर्णय क्र.४१ नुसार,“सविस्तर चर्चा होऊन,५०० रुग्णवाहिका प्रकल्पाला शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर रुग्णवाहिका नियमावलीबाबत शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर निर्णय घ्यावा असे एकमताने ठरले. व हा प्रस्ताव व्यवस्थापन समितीकडे पाठविण्यात यावा”. असे ठरले.

दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार, “५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रु.५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणे करीता रु.२५ कोटी येणारे खर्चास मान्यता मिळणेस तसेच मा.छाननी समितीने शिफारस केलेनुसार सदर प्रस्तावास मान्यता मिळणे कामी व त्यानंतर विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यता मिळणेस सादर करणे कामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेपुढे मान्यता मिळणे कामी सादर करण्यात आला होता.

या सभेत विषय क्र.१४ व निर्णय क्र.५४९ नुसार, दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार, ५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रु.५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणे करीता रु.२५ कोटी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविणेस मान्यतेसाठी पाठविण्यात यावा”, असे ठरले.

त्यानुसार मा.प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना इकडील जा.नं.एसएसएस/ वाहन/३१११/२०१८ दि.२७/०९/२०१८ नुसार, सुधारीत साई रुग्णवाहिका योजनेचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर करण्यात आला होता.

यावर,विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/ प्र.क्र.२०/ का.१६, दि.२८/१२/२०१८ अन्वये, खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

“श्री साईबाबा संस्थन विश्वस्तव्यवस्था, अधिनियम, २००४ कलम १७(२-ण) मध्ये मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्याला चालना देण्यात येईल, अशी तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत महाराष्ट्र राज्यातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रुपये ५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणेकरीता रुपये २५ कोटी येणा-या खर्चास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात यावे. अशी रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणा-या संस्थेने महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीकडे आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वजा करुन) भरावी व कागदोपत्री पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानातर्फे रु.५ लक्ष इतकी रक्कम स्वयंसेवी संस्थेनी भरल्यानंतर संस्थेतर्फे रु.५ लक्ष अनुदान परस्पर डिलरला / कंपनीला देण्यात यावी.

२) संबंधित संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.

३) रुग्णवाहिकेसाठी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा बोलेरो BS-IV हे मॉडेल निश्चित करण्यात यावे.

४) प्रत्येक रुग्णवाहिकेस GPSSystem बसवून घेण्यात यावी.

५) रुग्णवाहिकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल.

६) रुग्णवाहिकेवर श्री साई रुग्णवाहिका असे नमूद करण्यात यावे.

७) रुग्णवाहिका नियमावली अंतिम करुन शासन मान्यतेस्तव तात्काळ सादर करण्यात यावी. सदर नियमावलीस शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर नियमावलीमध्ये नमूद अटी व शर्तीनुसार महाराष्ट्रातील नोंदणीकृत संस्थांना प्रत्येकी एक याप्रमाणे रुग्णवाहिके करीता अनुदान देण्यात यावे.

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संजय भास्कर काळे यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचीकेत मा.व्यवस्थापन

समितीचे दि.३१/०८/२०१६ व दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाची मा.कोर्टाचा पुढील आदेश होईपावेतो स्थगीत ठेवणेची मागणी केलेली आहे. या करीता संस्थानचे विधी विभागामार्फत दि.०९/०९/२०१७ चे टिपणीनुसार ॲड. नितीन भवर यांना वकीलपत्र दिलेले आहे. सदर जनहित याचिकेचा नंबर ८६/२०१८ असुन पुढील सुनावणी दि.१०/०१/२०१९ रोजी आहे.

उपरोक्त शासन मान्यतेनुसार व यापुर्वीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार श्री साई रुग्णवाहिके करीता सुधारीत नियमावली खालील प्रमाणे राहील.

१) शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात /रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत)प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात येईल.नोंदणीकृत संस्था ही कमीत कमी ०३ वर्षा पुर्वीची असावी.

२) अनुदान रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणा-या संस्थेने कंपनी / डिलरकडे आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वाज करुन) भरावी व कागदोपत्री पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानतर्फे रु. ५ लक्ष अनुदान परस्पर डिलरला/ कंपनीला देण्यात येईल.

३) संस्थान मार्फत पात्र झालेल्या संस्थेचे नाव प्रसिध्द झालेनंतर कंपनी / डिलरकडे आगाऊ रक्कम भरुन त्याबाबतचा पुरावा संस्थानकडे सादर करावा लागेल.

४) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत अटी व शर्तीचा स्वतंत्र करारनामा रु.६००/- चे गैरन्यायीक स्टॅम्प पेपरवर करुन द्यावा लागेल. या करीताचा खर्च संबंधीत सेवाभावी संस्थेस करावा लागेल.

५) प्रत्येक रुग्णवाहिकेस संस्थानने निश्चित करुन दिलेल्या कंपनीची GPSSystem बसविणे बंधनकारक राहील. तसेच या बाबतचा रिपोर्ट दरमहा अथवा संस्थानने मागणी केल्यास सादर करावा लागेल. या कामी येणारा खर्च संबंधीत संस्थेस करावा लागेल.

६) रुग्णवाहिकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल. रुग्णवाहिकेचा काही अपघात अगर काही कायदेशिर बाब उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या संस्थेची राहील.

७) रुग्णवाहिकेवर श्री साई रुग्णवाहिका असे चार बाजुने ठळक अक्षरात व दोन रंगामध्ये नमूद करण्यात यावे.

८) संस्थेच्या कार्यकारणीची निवड ही लोकशाही पध्दतीने व कायद्याप्रमाणे झालेली असावी व तशी स्पष्ट तरतुद संस्थेच्या घटनेत व उपनिधीमध्ये असावी.

९) संस्थेचे पॅनकार्ड व रजिस्टेशन प्रमापणपत्र आवश्यक आहे. संस्थेबद्दल विश्वस्तांचे कुठल्याही न्यायालयात वाद असु नयेत.

१०) सदस्य व पदाधिका-यांची नांवे व दुरुध्वनी / मोबाईल क्रमांकाची संस्थेच्या अध्यक्षांनी साक्षांकित केलेली यादी सादर करणे आवश्यक आहे.

११) संस्थेने रुग्णवाहिकेची आवश्यकता असलेबाबत तसेच त्यांची संस्था आरोग्य क्षेत्रात / रुग्ण सेवेच्या कार्यरत असलेचे संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांचे प्रमाणपत्र द्यावे लागेल. व खालील प्रमाणे कागदपत्रे मागणी अर्जा सोबत द्यावी लागतील.

अ) आयकर खात्याचे आयकर अधिनियम कलम ८० (जी) खाली आयकरातुन सुट मिळाल्याचे प्रमाणपत्र (असल्यास)

ब) संस्थेला शासनाकडून अनुदान मिळते किंवा नाही याबाबतचे प्रमाणपत्र.

क) संस्थेच्या मालमत्तेविषयी किंमतीसह यादी, याबाबत धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदवहीचा साक्षांकित उतारा.

ड) संस्थेचे बॅंकेत नाव, पत्ता, व खाते नंबर (संस्थेच्या बाबतीत)

१२) सेवाभावी संस्थेचे लेखापरिक्षण नियमित (प्रति वर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३ (तिन) वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

१३) सेवाभावी संस्थेची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) किमान १०(दहा) लाख रुपये असावी.

१४) सेवाभावी संस्थेवर कोणतेही आर्थिक गैरव्यवहारातील गुन्हे नोंदविलेले नसावेत. या बाबत संस्थेने रु.१००/- चे गैरन्यायीक स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्र द्यावे.

१५) स्वयंसेवी संस्थेला देण्यात येणा-या अनुदानातुन घेतलेली रुग्णवाहिका ही फक्त रुग्णांना सेवा देणेकरीताच ना नफा ना तोटा या तत्वावर वापरावी लागेल. यात कोणत्याही प्रकारची प्रवासी अगर अवैध वाहतुक करता येणार नाही.

१६) सदर रुग्णवाहिकेच्या चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध अधिकृत परवाना असणे बंधनकारक राहील.

१७) सदर रुग्णवाहिकेचे पीयुसी, फिटणेस,टॅक्स इत्यादी कामे व त्याकरीता येणारा अनुशंगीक खर्च संबधीत संस्थेस करावा लागेल.

१८) या बाबत कायदेरशिर बाब उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र फक्त राहाता,जिल्हा न्यायालय कोपरगांव वमा.उच्च न्यायालय औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

१९) संस्थान अनुदानातुन खरेदी केलेली रुग्णवाहिका स्वयंसेवी संस्थेला पुढील १० वर्ष इतर कोणासही चालविण्यास देता येणार नाही अथवा हस्तांतरीत करता येणार नाही.

उपरोक्त शासन निर्णयानुसार संस्थानने करावयाची अनुशंगिक कामेः-

१) उपरोक्त शासन निर्णयानुसार अनुदान देणेचे नियमावलीस शासन मान्यता मिळालेनंतर अनुदान देणेची कार्यवाही करावयाची आहे. अशी मान्यता मिळालेनंतर अनुदान मागणी करीता विहित नमुन्यात फॉर्म तयार करुन अर्ज मागवावे लागतील. या अर्जाचा नमुना संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर ठरावीक कालावधीसाठी प्रसिध्द करावा लागेल.

२) रुग्णवाहिकाकरीता अनुदान देणे संबधीत सुधारीत नियमावलीस मान्यता मिळालेनंतर त्यास छाननी समितीची मान्यता घेऊन ती शासन मान्यतेस सादर करावी लागेल.

मागणीः- तरी विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१८१६/ प्र.क्र.२०/का.१६, दि.२८/१२/२०१८ नुसार उपरोक्त प्रमाणे सुधारीत नियमावलीस मान्यता मिळणेस तसेच वरील बाबींवर निर्णय होणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन मान्यतेनुसार श्री साई रुग्णवाहिकेकरीता खालील सुधारीत नियमावलीस मान्यता देण्यात आली.**

**१) शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात/रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंदणीकृत)प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात येईल.नोंदणीकृत संस्था ही कमीत कमी ०३ वर्षा पुर्वीची असावी.**

**२) अनुदान रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणा-या संस्थेने कंपनी / डिलरकडे आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वाज करुन) भरावी व कागदोपत्री पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानतर्फे रु. ५ लक्ष अनुदान परस्पर डिलरला/ कंपनीला देण्यात येईल.**

**३) संस्थान मार्फत पात्र झालेल्या संस्थेचे नाव प्रसिध्द झालेनंतर कंपनी / डिलरकडे आगाऊ रक्कम भरुन त्याबाबतचा पुरावा संस्थानकडे सादर करावा लागेल.**

**४) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत अटी व शर्तीचा स्वतंत्र करारनामा रु.६००/- चे गैरन्यायीक स्टॅम्प पेपरवर करुन द्यावा लागेल. या करीताचा खर्च संबंधीत सेवाभावी संस्थेस करावा लागेल.**

**५) प्रत्येक रुग्णवाहिकेस संस्थानने निश्चित करुन दिलेल्या कंपनीची GPSSystem बसविणे बंधनकारक राहील. तसेच या बाबतचा रिपोर्ट दरमहा अथवा संस्थानने मागणी केल्यास सादर करावा लागेल. या कामी येणारा खर्च संबंधीत संस्थेस करावा लागेल.**

**६) रुग्णवाहिकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल. रुग्णवाहिकेचा काही अपघात अगर काही कायदेशिर बाब उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या संस्थेची राहील.**

**७) रुग्णवाहिकेवर श्री साई रुग्णवाहिका असे चार बाजुने ठळक अक्षरात व दोन रंगामध्ये नमूद करण्यात यावे.**

**८) संस्थेच्या कार्यकारणीची निवड ही लोकशाही पध्दतीने व कायद्याप्रमाणे झालेली असावी व तशी स्पष्ट तरतुद संस्थेच्या घटनेत व उपनिधीमध्ये असावी.**

**९) संस्थेचे पॅनकार्ड व रजिस्टेशन प्रमापणपत्र आवश्यक आहे. संस्थेबद्दल विश्वस्तांचे कुठल्याही न्यायालयात वाद असु नयेत.**

**१०) सदस्य व पदाधिका-यांची नांवे व दुरुध्वनी / मोबाईल क्रमांकाची संस्थेच्या अध्यक्षांनी साक्षांकित केलेली यादी सादर करणे आवश्यक आहे.**

**११) संस्थेने रुग्णवाहिकेची आवश्यकता असलेबाबत तसेच त्यांची संस्था आरोग्य क्षेत्रात / रुग्ण सेवेच्या कार्यरत असलेचे संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांचे प्रमाणपत्र द्यावे लागेल. व खालील प्रमाणे कागदपत्रे मागणी अर्जा सोबत द्यावी लागतील.**

**अ) आयकर खात्याचे आयकर अधिनियम कलम ८० (जी) खाली आयकरातुन सुट मिळाल्याचे प्रमाणपत्र (असल्यास)**

**ब) संस्थेला शासनाकडून अनुदान मिळते किंवा नाही याबाबतचे प्रमाणपत्र.**

**क) संस्थेच्या मालमत्तेविषयी किंमतीसह यादी, याबाबत धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदवहीचा साक्षांकित उतारा.**

ड) संस्थेचे बॅंकेत नाव, पत्ता, व खाते नंबर (संस्थेच्या बाबतीत)

१२) सेवाभावी संस्थेचे लेखापरिक्षण नियमित (प्रति वर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३ (तिन) वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

१३) सेवाभावी संस्थेची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) किमान १०(दहा) लाख रुपये असावी.

१४) सेवाभावी संस्थेवर कोणतेही आर्थिक गैरव्यवहारातील गुन्हे नोंदविलेले नसावेत. या बाबत संस्थेने रु.१००/- चे गैरन्यायीक स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्र द्यावे.

१५) स्वयंसेवी संस्थेला देण्यात येणा-या अनुदानातुन घेतलेली रुग्णवाहिका ही फक्त रुग्णांना सेवा देणेकरीताच ना नफा ना तोटा या तत्वावर वापरावी लागेल. यात कोणत्याही प्रकारची प्रवासी अगर अवैध वाहतुक करता येणार नाही.

१६) सदर रुग्णवाहिकेच्या चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध अधिकृत परवाना असणे बंधनकारक राहील.

१७) सदर रुग्णवाहिकेचे पीयुसी, फिटणेस,टॅक्स इत्यादी कामे व त्याकरीता येणारा अनुशंगीक खर्च संबधीत संस्थेस करावा लागेल.

१८) या बाबत कायदेशिर बाब उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र फक्त राहाता,जिल्हा न्यायालय कोपरगांव वमा.उच्च न्यायालय औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

१९) संस्थान अनुदानातुन खरेदी केलेली रुग्णवाहिका स्वयंसेवी संस्थेला पुढील १० वर्ष इतर कोणासही चालविण्यास देता येणार नाही अथवा हस्तांतरीत करता येणार नाही.

रुग्णवाहिकांकरीता अनुदान देणे संबधीत सुधारीत नियमावलीस मान्यता मिळालेनंतर त्यास छाननी समितीची मान्यता घेऊन ती शासन मान्यतेसाठी सादर करावी, असे ठरले.

शासन निर्णयानुसार अनुदान देणेचे नियमावलीस शासन मान्यता मिळालेनंतर अनुदान देणेची कार्यवाही करण्यात यावी. शासन मान्यता मिळालेनंतर अनुदान मागणी करीता विहित नमुन्यात फॉर्म तयार करुन अर्ज मागविण्यात यावे. या अर्जाचा नमुना संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर ठरावीक कालावधीसाठी प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.२१** **हिन्दू स्पिरिच्युअल ॲण्ड सर्व्हिस फौंडेशन– चाप्टर मुंबई आयोजित मुंबई येथील हिन्दू आध्यात्मीक आणि सेवा प्रदर्शनात सहभागी होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान अधिनियमातील तरतूद- कलम नं.१७ (२) ठ अन्वये- “श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील ”

प्रास्तविक- हिन्दू स्पिरिच्युअल ॲण्ड सर्व्हिस फौंडेशन-चाप्टर मुंबई यांचेकडून उपरोक्त संदर्भिय पत्र संस्थानला प्राप्त झाले आहे. सदर संस्थेच्या मार्फत समाजातील निर्धन, पददलित, मागास समाजीची सेवा करण्याच्या महत्वपूर्ण उद्देशाने चेन्नई येथे गल्या आठ वर्षांपासून सेवा मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. यासंदर्भात आपल्या पत्रात त्यांनी लिहिले आहे की,

“आपल्या देशाव्या इतिहासात मठ-मंदिरे, साधुसंत आणि विविध समाजघटकांच्या संस्था यांनी देशाची आध्यात्मीक धारणा तर संपन्न केलीच परंतु समाजातील निर्धन,पददलित, मागास समाजाची सेवा करण्याचे महत्वपूर्ण कार्यही आवर्जून केले आहे. आजही ते कार्य मोठ्या प्रमाणावर चालू आहे.

- त्यातूनच आम्हाला नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण न करता विकास साधण्याची शिकवण मिळते.
- चिरंतन मानवीय मूल्यांवरील आमची श्रद्धा अबाधित राहते, अक्षय राहते.
- स्त्रीजातीचा सन्मान हा आमचे राज्यकर्ते, धर्माचार्य आणि आमच्या कुटुंबव्यवस्थेचा केंद्रबिंदू राहिला आहे.
- आमच्या संतांच्या मांदियाळीने सतत आमच्या मनात आपला देश-धर्म आणि समाज यांच्याविषयी समर्पणाचा भाव जागवला.

गेली आठ वर्षे चेन्नई येथे सेवा मेळाव्याचे यशस्वी आयोजन होत आहे.त्याला मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता या धर्तीचे मेळावे देशभरात आयोजित करण्याचे योजिले आहे.

आपल्या महानगरी मुंबईत पहिल्यांदाच हिंदू आध्यात्मीक आणि सेवा प्रदर्शनाचे आयोजन होत आहे दिनांक शुक्रवार ११ ते रविवार १३ जानेवारी २०१९ रोजी संपन्न होणा-या या अनोख्या सेवा मेळाव्यात सहभागी होण्यासाठी आम्ही आपल्या संस्थेला सादर निमंत्रण देत आहोत. हे प्रदर्शन मुंबईतील कोराकेंद्र मैदान -१,

बोरीवली (पश्चिम), मुंबई येथील एका विशाल मैदानावर आयोजित केले जाणार आहे. या प्रदर्शनात आपल्या संस्थेला एक स्टॉल विनामूल्य दिला जाईल "  असें नमूद केले असून सदर पत्रात त्यांनी पुढे म्हटले आहे की, "मुंबईतील या सेवा प्रदर्शनात आम्ही अशा सर्व प्रकारच्या हिंदू संस्थांना निमंत्रित करतो आहोत ज्या धार्मिक-आध्यात्मीक कार्याच्या जोडीनेच सेवाकार्यही करीत आहेत. पर्यावरण, मानवी मूल्ये, महिला सन्मान-सक्षमीकरण, देशभक्ती तसेच या संदर्भात सेवाकार्य करणा-या हिंदू संस्था या प्रदर्शनात सहभागी होऊ शकतात." सदर प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी –"कृपया हिंदू स्पिरिच्युअल अॅण्ड सर्व्हिस फेयर तर्फे आयोजित हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, ही विनंती" असें आवाहन त्यांनी सदरच्या पत्राद्वारे केले आहे.

विभागाचा अभिप्राय- सदंर्भिय पत्रावर मा.अध्यक्ष महोदय यांनी पुढील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत- CEO, We shd participate in this. It's free. Pl. do needful.

सदरच्या सेवा प्रदर्शनात सहभागी होणेसाठी संबंधित संस्थेकडून (Hindu Spiritual And Service Foundation-Chapter Mumbai) हिंदू संस्थाना आवाहन करण्यात आल्याचे आढळते. या पार्श्वभुमीवर श्री साईबाबा संस्थान हे परंपरागत सर्वधर्मियांचे देवस्थान म्हणून ओळखले जाते. हिंदुसह  अन्य धर्मिय लोकही साईबाबांना पूज्य मानतात. त्यामुळेच शिर्डी येथे हिंदु भक्तांबरोबर अन्य धर्मिय भाविकही दर्शनासाठी हजेरी लावतात. त्यामुळे सदर प्रदर्शनात संस्थान सहभागी झाल्यास चूकीचा संदेश समाजात जाऊ शकतो.

तथापि, सदर संस्थेने केलेल्या आवाहनानुसार उपरोक्त प्रदर्शनात सहभागी व्हायचे झाल्यास संस्थानमार्फत प्रकाशित करण्यात आलेल्या विविध भाषेतील श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ तसेच दैनंदिनी, दिनदर्शिका व श्रीसाईबाबांवरील अनुषंगिक साहित्य विक्रीचा तसेच प्रसादलाडू विक्रीचा स्टॉल सदरील हिंदू आध्यात्मीक आणि सेवा प्रदर्शनात लावता येईल.

त्या अनुषंगाने हिन्दू स्पिरिच्युअल अॅण्ड सर्व्हिस फेयर-मुंबई चे कार्यवाह श्री. सुशील जाजू तसेच श्री.नायर व श्री.कलगुटकर यांच्याशी सदर प्रदर्शनात स्टॉल लावणेसाठी आवश्यक माहिती घेतली आहे. त्यानुसार सदर स्टॉलचा आकार १०फूट बाय १०फूट असा राहाणार असून प्रदर्शनाची वेळ सकाळी ९ ते रात्री ९ अशी असणार आहे. श्री साईबाबा संस्थानसाठी त्यांनी १०फूट बाय १०फूट या आकाराचे२ स्टॉल देण्याची तयारी दर्शविली असून सदर स्टॉलच्या अंतर्गत प्रसाद लाडू विक्रीस्टॉल व संस्थान प्रकाशित पुस्तकांचा विक्री स्टॉल लावता येतील.

प्रस्ताव- तरी हिन्दू स्पिरिच्युअल अॅण्ड सर्व्हिस फौंडेशन-चाप्टर मुंबई यांनी आवाहन केलेप्रमाणे तसेच मा.अध्यक्ष यांचे निर्देशाप्रमाणे  कोराकेंद्र मैदान -१, बोरीवली (पश्चिम), मुंबई येथे पुस्तक विक्री व प्रसादलाडू विक्रीचा स्टॉल लावणेस व सदर स्टॉलसाठी येणा-या अनुषंगिक खर्चाबाबत निर्णय होणेसाठी सदरचा सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, हिन्दू स्पिरिच्युअल अॅण्ड सर्व्हिस फौंडेशन–चाप्टर मुंबई आयोजित मुंबई येथील हिन्दू आध्यात्मीक आणि सेवा प्रदर्शनात पुस्तक विक्री व प्रसादलाडू विक्रीचा स्टॉल दि.११.०१.२०१९ ते दि.१३.०१.२०१९ या कालावधीकरीता लावणेस व त्याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **कनिष्ठ महाविद्यालय, श्री साईबाबा महाविद्यालयास संलग्न करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- अधिनियम २००४ मधील तरतुद  क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – निरंक

प्रस्ताविकः- संस्थानमार्फत श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ही मुलींची शाळा सन १९९० पासून चालविण्यात येते. सन २००० मध्ये कन्या शाळेस जोडून फक्त मुलींकरिता कनिष्ठ महाविद्यालय (इ.११वी व १२ वी.) सुरु करण्यात आले. त्यानंतर शिक्षण उपसंचालक , पुणे विभाग यांचेकडील जा.क्र.उमाशि-१/पुवि/१/१४१०५/२००५-०६ दि.१६ जुलै, २००५ चे पत्रान्वये सन २००५-०६पासून कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मुले व मुलींसाठी सहशिक्षण (Co-Education) प्रवेश देणेस मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सन २००५-०६पासून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मुले व मुली दोघेही सहशिक्षण (Co-Education) घेत आहेत. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयाच्या तीन्ही अभ्यासशाखांमध्ये (कला, वाणिज्य व विज्ञान) एकुण १२६७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शासन आदेश क्रमांक एनजीसी २०१८/(१००/१८)/ मशि-४, दि.१५ जून, २०१८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा महाविद्यालय या नावाने नवीन महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता मिळालेली आहे.  त्यानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/९४४/२०१८ दि.०२ जुलै, २०१८ अन्वये श्री साईबाबा महाविद्यालय हा स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आलेला असून, त्याचा शुभारंभ दि.१७.०७.२०१८

रोजी पासून झालेला आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये श्री साईबाबा महाविद्यालयाच्या तीन्ही अभ्यासशाखांमध्ये (कला, वाणिज्य व विज्ञान) एकुण ३१६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

श्री साईबाबा महाविद्यालयाचे शैक्षणिक कामकाजासाठी नियुक्ती सल्लागार डॉ.अरुण कुंभारे यांनी दि.०७.०१.२०१९ रोजी दुरध्वनीद्वारे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, यांचे कार्यालयात झालेल्या चर्चेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी हे श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीशी सलंग्न करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. दोन्ही महाविद्यालयाचे एकत्रीकरण केल्यास महाविद्यालयांचे कामकाजामध्ये सुसुत्रता येईल, असे नम्र मत आहे.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डीचे श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीशी संलग्नीकरण करणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन, सदरचा प्रस्ताव शासनाच्या मा.शिक्षण उपसंचालक/संचालक यांचेकडे मान्यतेसाठी पाठविता येईल.

मागणी– तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील, कनिष्ठ महाविद्यालय, श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीशी संलग्न करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील, कनिष्ठ महाविद्यालय, श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीशी संलग्न करण्यास मान्यता देण्यात आली. व तसा प्रस्ताव मा.शिक्षण संचालक/उपसंचालक यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय / श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३, निर्णय क्र.३८ राज्यातुन तसेच इतर राज्यातुन वर्षभर पदयात्री पायी चालत श्रींच्या दर्शनासाठी येत असतात. दि.२२.१२.२०१८ रोजी मुंबई येथील साईराम पालखी मंडळ, कांदीवली, मुंबई या मंडळातील पायी चालणाऱ्या साईभक्तांना नाशिक-शिर्डी मार्गावर पांगरी गावाजवळ सायं.६.३० वा. मारुती स्विप्ट या वाहनाने धडक दिल्याने १९ साईभक्त जखमी झाले होते. जखमीमधील दोन भक्तांना सिन्नर येथे व एका भक्तास मुंबई येथे उपचारासाठी पाठविण्यात आले होते. परंतु सदरचे तीनही साईभक्त मयत झाल्याचे समजते. उर्वरीत जखमीनां संस्थानचे साईबाबा हॉस्पिटल मध्ये ॲडमिट करण्यात आले होते. त्यापैकी अविनाश अशोक पवार व अनिकेत दिपक मेहत्रे , रा.कांदिवली, मुंबई हे दोन साईभक्त रुग्णालयात दाखल करण्यापुर्वीच मयत झालेले होते.**

**अपघातात मयत झालेल्या साईभक्तांच्या अधिकृत वारसास संस्थानतर्फे विशेष बाब म्हणून प्रत्येकी रु.१ लाख मदत शासनाचे मान्यतेनंतर देण्यासाठी सविस्तर प्रस्ताव पुढील व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- लेखाशाखा)**

---

वरील निर्णय क्र.०१ ते ३८ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०३.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.